# शब्द रुची

एप्रिल २०२१
मूल्य १० रुपये
पृष्ठे ४४


पर्यावरण विशेषांक



विवेक सावंत



नंदा खरे



रंगनाथ पठारे



सुमती लांडे



आबा महाजन



विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्द रुची

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची

**एप्रिल २०२१, वर्ष आठवे**
**अंक बारावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
अतिथी संपादक : **रविराज गंधे**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, सहकारी – सुमेधा कुवळेकर**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवार पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४५

## अनुक्रम

**वासंती फडके** / ७
मानवी उत्क्रांती आणि पर्यावरणातील बदल

**सुजाता बाबर** / ९
घातक रसायने आणि पर्यावरण हानी अनुत्तरीत प्रश्न!

**डॉ. नागेश टेकाळे** / १२
पर्यावरणऱ्हासामध्ये हरवलेला स्वाद-सुगंध

**अ.पां. देशपांडे** / १५
नैसर्गिक संकटे

•

**ग्लोबल इंग्रजी ग्रंथ परिचय**
**राजीव श्रीखंडे** / १८
द स्ट्रेंज केस ऑफ डॉ. जेकिल ॲण्ड मिस्टर हाईड

•

**दिनकर गांगल** / २१
विवेक सावंत यांची हाक ज्ञाननिष्ठ समाजासाठी!

**अतुल देऊळगावकर** / २५
नंदा खरे : मूल्यप्रधान लेखनप्रवास

**दीपक करंजीकर** / २८
रंगनाथ पठारे : एक अद्वैताचे झाड

**श्रद्धा बेलसरे खारकर** / ३१
सुमती लांडे : एक अफलातून व्यक्तिमत्त्व

**नरेंद्र लाजेवार** / ३३
सानेगुरुजींच्या भूमीतला बालसाहित्यिक

**अरविंद हाटे** / ३६
प्रवास

**ग्रंथाली ग्रंथपाने**
**चांगदेव काळे** / ३९

# संपादकीय...



रविराज गंधे

नंदा खरे, रंगनाथ पाठारे, आबा महाजन यांच्या साहित्यानं समाजाला विवेकाचं भान दिलं. विवेक सावंत यांनी संगणकाद्वारे ज्ञानजाल उभारलं, तर 'शब्दालय' प्रकाशनाच्या सुमती लांडे यांनी प्रकाशक म्हणून उत्तम साहित्य प्रसिद्ध केलं. सामाजिक पर्यावरणाला सुदृढ करणाऱ्या या साऱ्यांना लाभलेल्या वेगवेगळ्या पुरस्कारांबद्दल त्यांचं अभिनंदन. नंदा खरे यांनी पुरस्कार नाकारला तरी त्यांच्या 'उद्या'ची दखल घेणं महत्त्वाचं आहे. या साऱ्यांवर दिनकर गांगल, अतुल देऊळगावकर, दीपक करंजीकर, श्रद्धा बेलसरे आणि नरेंद्र लांजेवार यांनी लेख लिहिले आहेत.

'शब्द रुची' मासिकाचा एप्रिल महिन्याचा अंक पर्यावरण विशेषांक म्हणून वाचकांच्या भेटीस येत आहे. नेमेची येतो मग पावसाळा ह्या उक्तीनुसार दरवर्षी २३ मार्च हा जागतिक हवामान दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. ह्या दिवशी सर्व माध्यमांतून पर्यावरण संवर्धनविषयक जनजागृती भरभरून वाहायला लागते. पुन्हा हा महापूर ५ जून जागतिक वसुंधरादिन साजरा होताना पाहायला मिळतो. एरवी पर्यावरणाचा आणि आपला काही संबंध आहे असं लोकांना, सरकारला आणि माध्यमांना फारसे काही वाटत नाही. मुळात मदर्स डे, फादर्स डे, विमेन्स डे यासारखा ढोंगी पद्धतीने हा दिवस साजरं करण्याची गरज नाही. आपल्या मनात प्रियजनांच्या नात्याची सुंदर वेल सदैव हिरवीगार बहरलेली असते, त्यातील क्लोरोफिल आपण जिवापाड जपत असतो. नेमकं निसर्गाचं आणि आपलं हेच नातं आहे. ते जेव्हा आपण जपायला शिकू तेव्हा आपल्याला असे कुठलेच दिवस साजरे करण्याची गरज उरणार नाही. कारण पर्यावरणसंवर्धन हा एक संस्कार आहे. ती एक जीवनशैली आहे. दुर्दैवानं आज आपण चंगळवादी जीवनशैली अनुसरून अति हव्यासापायी जीवसृष्टीचा आणि आपला विनाश ओढवून घेत आहोत.

मुळात पर्यावरणसंवर्धन असा काही विषय असू शकतो याची जाणीवच फार उशिरानं आपल्याला झाली. १९६२ साली जीवशास्त्रज्ञ राशेल कार्सन यांनी आपल्या 'सायलेंट स्प्रिंग' ह्या पुस्तकातून पर्यावरणविषयक धोक्याची पहिली घंटा वाजवली. पुढच्या काळात लगेचच त्याचे दृश्य-अदृश्य परिणाम जाणवायला लागले आणि या विषयी विचारमंथन सुरू झालं. ज्या अमेरिकेत ह्या महिला पर्यावरणतज्ज्ञानं ही घंटा वाजविली त्या अमेरिकेचे भूतपूर्व अध्यक्ष ५५ वर्षं उलटून गेल्यानंतरदेखील पर्यावरण असंतुलन ही एक अफवा आहे असं मानतात ह्यातच अमेरिकेचा ह्या विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन लक्षात येतो. कमी-अधिक प्रमाणात जगभर हीच स्थिती आहे. आपल्याकडे साधारण १९८० च्या दशकानंतर वेगानं पर्यावरणाचा ऱ्हास होऊ लागला. नेमका कसा कसा आणि कुठे कुठे तो होत आहे याची आणि त्याच्या सर्वश्रुत कारणांची पुन्हा पुन्हा चर्चा करण्यात अर्थ नाही. आपल्या देशात अजूनही हा विषय बऱ्याचशा प्रमाणात वैचारिक अन् वादग्रस्त पातळीवर रेंगाळतो आहे. खरं तर आपल्या देशातील पर्यावरणविषयक ऱ्हासाची सामाजिक, राजकीय, भौगोलिक, आर्थिक अशा विविध पातळीवर कारणमीमांसा करण्याची वेळ आता जवळ-जवळ निघून गेली आहे. कारण गेल्या अनेक दशकांपासून जंगल, जमीन, पाणी, रेती, खाणीचे साठे, फळे-फुले, पशू-पक्षी आदी नानाविध नैसर्गिक संपत्ती इतक्या मोठ्या प्रमाणावर ओरबाडून आपण संपवली की आता हे सारं निसर्गचक्र आणी त्यावर आधरित परिसंस्था पुन्हा जीवित करणे हे मोठं आव्हान आपल्यासमोर उभं ठाकलं आहे.

भोवतालच्या परिसंस्थाना, निसर्गाला जर काही काळ माणसाचा उपद्रव आणि उत्सर्ग झाला नाही तर निसर्ग कसा फुलून येतो याचा अनुभव आपण लॉकडाऊनच्या काळात घेतला. कामकाज-उद्योगधंदे थंडावल्यानं हवेतील प्रदूषणाची पातळी एकदम

घसरली. २५० ते ३०० पी.पी.एम. इतकी असणारी हवेची दूषित प्रत १०० पी.पी.एम.वर आली. आकाश निळेभोर दिसू लागलं. चिमण्या आणि अन्य पक्षी झाडावर दिसू लागले. मोर-लांडोर रस्त्यावर फिरताना दिसले. मुंबईच्या समुद्राचं पाणी निळं होऊन त्यात डॉल्फिन जलक्रीडा करू लागले. सर्व स्तरांवर आपण उद्योग आणि वाहतुकीसाठी इतक्या मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारच्या ऊर्जा वापरून प्रदूषण करतो की ही स्थिती टाळेबंदी संपल्यावर लगेच पूर्वपदावर आली. कमीत कमी किवा ऊजेचे नैसर्गिक स्रोत वापरून आपल्याला विकास साधता येणार नाही का? लाखो वर्षांपूर्वी अन्नाच्या शोधात माणूस स्थलांतरित होत जगभर पसरला. आजच्या पर्यावरणाच्या ऱ्हासाला माणसाचं स्थलांतर आणि त्यासाठी निर्माण केल्या जाणाऱ्या अवाढव्य सेवासुविधा, त्यातून निर्माण होणारं अनियंत्रित प्रदूषण हे आहे. ह्या व्यवस्थेचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. त्यासाठी गरजा आणि सुखसोयींनी युक्त चंगळवादी जीवनशैली यात निवड करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. माणसाचं आरोग्य आणि त्याची प्रतिकारशक्ती ही तो कशा प्रकारच्या हवा-पाण्यावर आणि अन्नावर जगतो यावर अवलंबून असते. हे महत्त्वाचे नैसर्गिक स्रोत मोठ्या प्रमाणावर प्रदूषित आणि निकृष्ट दर्जाचे झाल्यानं सर्वसाधारण भारतीय माणसाची प्रतिकारशक्ती जुन्या पिढ्यांच्या तुलनेत ढासळत चालली आहे. प्रदूषित हवेमुळे निर्माण होणारे फुप्फुसांचे क्षय आणि कर्करोगाचा लहान वयातच प्रादुर्भाव होताना दिसत आहे. शुद्ध हवेत केल्या जाणाऱ्या श्वसनाची गुणवत्ता आणि प्रत वाढवणं हा प्रतिकारशक्ती वाढवण्याचा एक महत्त्वाचा उपाय आहे. नेमका त्याचा अभाव असल्यानं श्वसनाचे विकार बळावत आहेत. माणसाच्या जिवाला धोका निर्माण करणाऱ्या कोरोनानं ती गरज आता अधोरेखित केली इतकंच. माणूस सर्वसाधारणपणे रोज ५०० किलोलीटर ऑक्सिजन श्वासावाटे घेत असतो. त्याची बाजारभावानं किंमत ८००० रुपयांच्या आसपास आहे. ह्या पार्श्वभूमीवर ऑक्सिजानचं सिलिंडर घेऊन फिरण्याची वेळ आल्यास काय परिस्थिती ओढावेल ह्याची कल्पना न केलेली बरी! जगातल्या सर्वाधिक प्रदूषित अशा एकूण ३० शहरांपैकी २२ शहरं भारतातील आहेत. दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून ओळखलं जातं. गेल्या काही वर्षांपासून जगातल्या मोठ्या शहरांत मोठ्या प्रमाणावर कार्बनचं उत्सर्जन होतं आहे. कोरोनाची साथ बळावल्यानं गेल्या वर्षभरापासून आपण मास्कचा वापर सुरू केला आहे. वास्तविक निकृष्ट दर्जाच्या प्रदूषित हवेपासून प्रतिबंध करण्यासाठी कायम मास्क वापरणं गरजेचं आहे, अशी हवेची स्थिती आहे. जपानमधील लोक कोरोना साथीच्या आधीपासून सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर करीत आहेत. नजीकच्या काळात आपल्या दैनंदिन वापराच्या गोष्टीत मास्कची कायमस्वरूपी भर पडली तर नवल वाटायला नको. वाहनामुळे होणारं हानिकारक प्रदूषण टाळण्यासाठी इलेक्ट्रिकवर चालणारी वाहनं बाजारात आली आहेत. वाहनामध्ये हायड्रोजनचा इंधन म्हणून वापर करण्यासंदर्भातील संशोधन अंतिम टप्प्यात आहे. ह्या पर्यायी ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्यावर वाहनामुळे होणाऱ्या प्रदूषणाची पातळी निश्चितच कमी व्हायला मदत होणार आहे.

बेसुमार जंगलतोड, प्लास्टिकचा कचरा, उद्योग-कारखान्यांच्या सांडपाण्याचं प्रदूषण, झपाट्यानं कमी होणारं वन्यजीवन, वितळणारे हिमनग, समुद्रकिनाऱ्यांच्या पाण्याच्या पातळीतील वाढ, जमिनीची धूप अशा अनेकविध पातळ्यांवर जीवसृष्टीचा ऱ्हास होतो आहे. अतिवृष्टी, अनावृष्टी, वादळ, महापूर अशा हवामानातील बदलामुळे आपल्या देशाचे उद्योगक्षेत्राचे आणि शेतीव्यवसायाचे अतोनात नुकसान होत आहे. उत्पादनामध्ये मोठी घट आल्यानं सरकारच्या महसुलात सातत्यानं तूट येत आहे. शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानापोटी हजारो कोटी मोजावे लागत आहेत. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानाची आणि त्यांनी ढाळलेल्या अश्रूंची तर मोजदादच करता येत नाही. असंच सुरू राहिलं तर सर्व समाजाचे आर्थिक जीवनच संकटात येईल याचं किमान भान आपण बाळगणं गरजेचं आहे. पर्यावरणाचं असंतुलन ही निसर्गानं माणसाला दिलेली सर्वात मोठी आणि कायमस्वरूपी धमकी आणि शिक्षा आहे हे समजून वाटचाल करणं हिताचं ठरेल अन्यथा विनाश अटळ आहे.

पर्यावरण असंतुलनाचा आणखी एक पैलू आहे जो सामाजिक आणि आर्थिक स्वरूपाचा आहे. जगातील सारी जनता आज 'आहे रे आणि नाही रे' या वर्गांत मोडली आहे. काही देश, प्रदेश आणि भूभागाला पर्यावरणसमृद्धीचं वरदान लाभलं आहे. तिथे सुपीक जमीन, पाणी, अन्नधान्य, फळफळावळ, खनिज मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. दुसरीकडे जगाच्या असंख्य भूभागात काहीच पिकत नाही. पाणी, सुपीक जमीन, अन्नधान्य पिकवण्यासाठी अनुकूल हवामानाचे वरदान नाही आणि म्हणून रोजगार व्यवसाय नाही. दोन्ही प्रदेशांतील लोकांना भूक आणि तहान सारखीच लागते. ती न भागल्यानं निर्माण होणारी अस्वस्थता, हिंसा ही नकळत दहशतवादामध्ये परिवर्तीत होत जाते. समृद्ध देशांवर हल्ले होऊ लागतात. अन्न आणि रोजगाराच्या शोधात स्थलांतर होऊ लागतं. पर्यावरणअसंतुलानाशी देशाचं समाजकारण आणि अर्थकारण निगडित आहे. आज हे असंतुलन देशाच्या

विकासातील मोठीच धोंड बनून अर्थकारण प्रभावित करत आहे. म्हणून येणाऱ्या भविष्यकाळात पर्यावरणाचा ऱ्हास आणि दहशतवाद हे दोन मोठे शत्रू मानवजातीसमोर उभे ठाकणार आहेत. धार्मिक कट्टरता, जात-वंशभेदाच्या बुरख्याआड चालणाऱ्या दहशतवादाचं गरिबी आणि बेरोजगारी हे एक महत्त्वपूर्ण कारण आहे. येणाऱ्या काही दशकांत दोन देशांमध्ये होणारी युद्धं ही शेतीयोग्य जमीन आणि पाण्याच्या साठ्यासाठी लढली जातील अस भविष्य हवामानतज्ञांनी वर्तवलं आहे.

अशा अनेक पर्यावरणविषयक मुद्यांवर प्रसारमाध्यमांनी लोकांचं जनजागरण करणं, सरकारला जाब विचारणं अपेक्षित आहे. परंतु काही वृत्तपत्रं, सरकारी प्रसारमाध्यमे वगळता खाजगी वृत्तवाहिन्या यात फारसा रस घेताना दिसत नाही. जनतेला ह्या विषयाचे गांभीर्य पटवून देण्याची आणि पर्यावरणदृष्ट्या लोकांना साक्षर करण्याची सरकारबरोबरच माध्यमांचीदेखील जबाबदारी आहे. आज आपल्या देशात सरकार, विविध स्वयंसेवी संस्था, अभ्यासक, उद्योगसमूह आणि व्यक्तिगत पातळीवर मोठ्या प्रमाणावर पर्यावरणसंवर्धनाच्या संदर्भात महत्त्वाचं काम केलं जात आहे. माध्यमांनी त्यांना आणि त्यांच्या अथक प्रयत्नांना बळ देण्याची गरज आहे. शासनाला आणि पर्यावरणविषयक जनजागृती करणाऱ्या संस्थाना मनोभावे सहकार्य करणं ही जनतेची जबाबदारी आहे.

पर्यावरण या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे. विषयाला अनेकविध पैलू आहेत. त्या सर्व विषयांचा एका अंकात आढावा घेणं शक्य नाही. असं असलं तरी पर्यावरणसंवर्धनाच्या दृष्टीनं काही महत्त्वाच्या प्रश्न आणि समस्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न अंकात केला आहे. त्या दृष्टीनं सुप्रसिद्ध विज्ञानलेखक अ.पा. देशपांडे यांनी नैसर्गिक संकटाविषयी माहितीपूर्ण विवेचन केलं आहे. वासंती फडके, सुजाता बाबर, डॉ. नागेश टेकाळे आदी तज्ज्ञमंडळींचे पर्यावरणसंवर्धनविषयक विविध समस्यांबाबत अभ्यासपूर्ण विचारमंथन करणारे लेख वाचकांचं उद्‌बोधन करतील, अशी आशा आहे. ह्या जागतिक हवामान दिनाच्या निमित्तानं पानांची हिरवाई अन आकाशाची निळाई जपण्याचा आपण सारे निश्चय करूया!

या व्यतिरिक्त चित्र-शिल्पकला कलाकाराची ओळख करून देणारा अरविंद हाटे यांचा लेख आणि ग्रंथपाने आहेतच.

आपण ग्लोबल खेड्यात राहतो. त्यामुळे वैश्विक साहित्याची माहिती असावी यासाठी या अंकापासून राजीव श्रीखंडे एका उत्तम इंग्रजी पुस्तकाची ओळख 'ग्लोबल इंग्रजी ग्रंथपरिचय'मधून करून देणार आहेत. याच महिन्यापासून ग्रंथाली दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी 'ग्लोबल साहित्यसफर' हा ध्वनिचित्रमुद्रित कार्यक्रम सादर करणार आहे. राजीव श्रीखंडे यात दर कार्यक्रमात एका इंग्रजी पुस्तकाचं विवेचन करणार आहेत. www.granthali.com या वेबसाइटवर आपण तो नक्की पाहावा. 'ग्रंथाली'च्या Granthali Watch या यूट्यूब चॅनेलला सबस्क्राइब करून पुढेही घडणाऱ्या कार्यक्रमांचा विनामूल्य आस्वाद घ्यावा आणि 'ग्रंथाली'शी जोडलं राहावं, ही अपेक्षा आहे.

पुढील अंक 'नाटक विशेषांक'!

भ्रमणध्वनी : ९८२०३७८४४८
ravirajgandhe@gmail.com

## ❋ उद्याचे मराठी नाटक ❋

महाराष्ट्राला कलेची समृद्ध परंपरा आहे. त्यात नाटक हा मराठी माणसाच्या जगण्याचा अविभाज्य घटक आहे. पुरोगामी महाराष्ट्र नाटकांतही कालसापेक्ष बदलत आला, परंपरा आणि प्रगती यातून नवीन प्रवाह आले. ढोबळ ते ॲब्सर्ड अशा प्रवासाचे पुढचे पाऊल कसे असेल हे जाणणे रोचक व कालसुसंगत ठरेल. नुकतीच **'आविष्कार'** नाट्यसंस्थेच्या स्थापनेला ५० वर्षे झाली. तिच्या सुवर्णमहोत्सवाचे औचित्य साधत, भविष्यवेध हा गाभा ठेवून **'शब्द रुची'** हा ग्रंथालीचा मे महिन्याचा अंक **नाटक विशेषांक** म्हणून प्रसिद्ध करीत आहोत. **दीपक राजाध्यक्ष** या अंकाचे **अतिथी संपादक** आहेत. यात मराठी नाटकाचे सारेच पैलू असतील. संगीत नाटकापासून साऱ्या नाट्यचळवळी, नाट्यस्पर्धा, नाट्यशिबिरे, विविध रंगभूमी, लोकनाट्य, नाट्यसंस्था, नाट्यसंमेलन ते आताचे ऑनलाइन प्रवेश.. हे 'प्रयोग' उद्या काय वळण घेतील हे पाहणे उद्‌बोधक होईल.



# मानवी उत्क्रांती आणि पर्यावरणातील बदल

**वासंती फडके**

**वी**स लाख वर्षांपूर्वी आजच्या मानवाचे पूर्वज पृथ्वीवर विविध भागांत पसरले. त्यावेळी मानव आणि अन्य प्राणी यांत फरक नव्हता. हा फरक सुमारे सत्तर हजार वर्षांपूर्वी नैसर्गिकरीत्या झालेल्या बोधात्मक क्रांतीमुळे घडून आला. या बोधात्मक क्रांतीमुळे मानवाला विचार व कल्पना करता येऊ लागल्या. भूत, भविष्य आणि वर्तमान यांचे म्हणजेच स्थळकाळाचे भान आले. निसर्गातल्या अनेक बाबींचा परस्परसंबंध तो जोडू लागला. भाषा बोलू लागला. विविध ठिकाणचे मानव भिन्न भाषा बोलू लागले. विचारांची देवाणघेवाण होऊ लागली. असे असले तरी मानव अद्याप भटकाच होता. मुख्यत्वे तो जंगलातील फळे-कंदमुळे गोळा करणे व शिकार यावरच गुजराण करत होता. आज भूतलावरील मानवी वस्ती जवळपास आठ अब्ज आहे. वर्ल्ड वाइल्ड फंडच्या एका अहवालानुसार आजही जगातल्या एक अब्ज मानवांचे आयुष्य प्रत्यक्ष जंगलांवर अवलंबून आहे. उरलेले मानवही अप्रत्यक्षरीत्या जंगालांवर अवलंबून आहेत ही आजची वस्तुस्थिती आहे. जंगले हाच सर्वांचा जीवनाधार आहे.

भटक्या अवस्थेत मानव जेथे जेथे गेला तेथील पर्यावरणाचा तोल तो नकळत बिघडवत होता. परंतु त्यावेळी लोकसंख्या कमी असल्यामुळे; तसेच त्याबाबतची जाणीव नसल्यामुळे ती बाब लक्षात आली नाही. (आज ती बाब लक्षात येऊनही मानवाच्या आचरणात बदल झालेला नाही असे म्हणावेसे वाटते.) जमिनीची धूप रोखणे, प्राणी-पक्षी यांचा अधिवास अबाधित राखणे, जैवविविधता सांभाळणे इत्यादी फायदे जंगलांचे आहेतच, शिवाय हवेतील कार्बन वायूचे प्रमाण कमी करण्यात जंगलांचा महासागरांच्या खालोखाल मोठा वाटा आहे.

जंगले ही आसपासच्या परिसराची फफ्फुसे असतात. प्रत्येक देशाला ३३ टक्के हरित आवरणाची-जंगलांची गरज आहे. मात्र अशी परिस्थिती फारच थोड्या ठिकाणी राहिलेली आहे. इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्टच्या अहवालानुसार सध्या भारतात जेमतेम २१.६७ टक्के इतकीच जागा जंगलांनी व्यापलेली आहे. सध्या पृथ्वीवरील घनदाट अरण्यांपैकी ॲमेझॉनच्या अरण्याने बराच मोठा भूभाग व्यापलेला आहे. मात्र गेल्या सुमारे १५ वर्षांत अंदाजे साडेचार कोटी हेक्टर प्रदेशात वणवे लागल्यामुळे, मोठी जंगलतोड झाल्यामुळे हे जंगल कार्बन शोषून घेणारा मोठा घटक असण्याऐवजी कार्बनचा मोठा स्रोत बनत चालले आहे असे 'नेचर'च्या संशोधन अहवालाचे म्हणणे आहे. हे असेच होत राहिले तर भूतलावरील तापमानात वाढ होईल आणि कार्बनच्या अतिउत्सर्जनामुळे पृथ्वीवर हाहाकार माजेल. तसे होऊ नये म्हणून अद्याप शिल्लक राहिलेली अरण्ये तशीच अबाधित ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी जगभरच्या सर्वच मानवांना आपल्या चंगळवादाला आवर घालावा लागेल. (वरचेवर फर्निचर बदलणे, कपडे आणि अन्य जीवनावश्यक वस्तूंची घरोघरची रेलचेल यावर बंधने घालावी लागतील.) ह्या बाबी कायदे करून नव्हे तर लोकांची मानसिकता बदलली तरच घडू शकतील.

शेतीचा शोध लागला व भटका मानव स्थिर आयुष्य जगू लागला त्याला उणीपुरी पंधरा हजार वर्षे लोटली आहेत. कृषिक्रांतीला युवाल नोव्हा हरारी यांनी मोठी फसवेगिरी असे म्हटले आहे. शेतीसाठी, मानवी वस्तीसाठी, कारखाने, धरणे यासाठी जंगले साफसूफ करून जागा मोकळ्या केल्या गेल्या. शेतीमुळे ठिकठिकाणच्या मानवांच्या आहारातील विविधता संपुष्टात आली. स्थिर आयुष्याची सवय नसलेल्या मानवाला शेतीच्या विविध कामांत अहोरात्र जुंपून घ्यावे लागले. तसेच, पाळीव प्राण्यांच्या सहवासात राहू लागल्यामुळे मानवही अनेक रोगांची शिकार बनू लागला. निसर्गचक्रात येणारे पूर, अवर्षण, टोळधाड, पिकांवर येणारे रोग यामुळे शेतीही बेभरवशाची होऊ लागली. मात्र हे लक्षात आले तेव्हा खूप उशीर झाला होता. शिकार करणे व फळे-कंदमुळे गोळा करणे यावर मोठ्या लोकसंख्येचा उदरनिर्वाह होणे तसेच मानवाला पुन्हा भटके आयुष्य जगणे शक्य नव्हते.

इसवी सन १९६७-६८ ते १९७७-७८ हे दशक भारतात हरितक्रांतीचे म्हणून ओळखले जाते. नॉर्मन बोरलॉग त्याचे प्रणेते होते. भारतात हरितक्रांतीचा पुरस्कार एम.एस. स्वामीनाथन या

कृषिवैज्ञानिकाने केला. यात यांत्रिक शेतीवर, रासायनिक खतांवर व कीटकनाशकांवर प्रामुख्याने भर दिला गेला होता. प्रारंभी काही काळ शेतीचे उत्पादन वाढले; पण रासायनिक खतांच्या व कीटकनाशकांच्या वारेमाप वापराने मातीचा कस कमी होऊ लागला. ही समस्या फक्त भारतातच नाही तर जगभर आहे. शिवाय पिकांवर एखादा रोग पडला की संपूर्ण पीक उद्ध्वस्त होऊन जात असे. कीटकनाशकांच्या वाढत्या वापरामुळे अतिरिक्त कीटकनाशके जमिनीत मुरतात किंवा पाण्याबरोबर वाहत जाऊन नदीनाले, महासागरांचे पाणी दूषित करतात. त्यामुळे जलचरांचे अस्तित्व धोक्यात येते. त्यांची संख्याही कमी होऊ लागते. तसाच प्लास्टिकचा अतिवापर होऊ लागला. महासागरांचे तळ प्लास्टिकने भरून गेले आहेत. ज्युलिएट ग्लेगर यांनी मानवी वारेतील (प्लासेंटा) मायक्रोप्लास्टिकचे अस्तित्व निदर्शनास आणून शहाण्या (सेपिअन्स) मानवजातीची झोप उडवली आहे. प्लास्टिक किती हानिकारक आहे त्याबाबत सतत कानीकपाळी सांगितले गेले तरीही त्याच्या वापराबद्दल अद्याप सजगता आलेली दिसत नाही.

उद्योगीकरणामुळे शहरे बकाल होऊ लागली. राहण्याच्या व कामाच्या अस्वच्छ जागांमुळे, पुरेसा वायुवीजनाच्या अभावी लोकांचे प्रकृतिस्वास्थ्य बिघडू लागले. रशियन राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांतीनंतर जगभरचे समाज ढवळून निघाले. कुटुंबसंस्था विस्कटू लागल्या. व्यक्तीला महत्त्व प्राप्त झाले. सामाजिक स्वास्थ्य बिघडू लागले. औद्योगिक क्रांतीमुळे वस्तूंची विपुलता निर्माण झाली. यंत्रांवर बनवलेल्या वस्तू स्वस्त मिळू लागल्या. प्रारंभी लोकांना त्यातून रोजगार मिळालाही; पण दुष्परिणामही जाणवू लागले. तरीही यंत्रांची कास सोडणे शक्य नव्हते. वाहनांचा वापर वाढला. त्यातून व कारखाने-गिरण्या यातून हानिकारक, विषारी व कर्करोगकारक वायूंचे उत्सर्जन होऊ लागले. या सगळ्यामुळे हवेच्या प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली. त्यातूनच श्वसनाच्या विविध रोगांना मानव बळी पडू लागला.

जैविक साखळीतील प्रत्येक जीव महत्त्वाचा असतो. म्हणूनच पक्षिअभयारण्ये, व्याघ्रप्रकल्प इत्यादी निर्माण केले गेले. युनेस्कोने जागतिक स्तरावर, चिमणी दिवस, फुलपाखरू दिवस वगैरे विविध दिवस पाळायचे आवाहन केले. त्याद्वारे त्या त्या प्राण्याचे महत्त्व सांगितले जाऊ लागले. काँक्रीटच्या अरण्यात वृक्ष, पक्षी जसे दुर्मिळ झाले तसेच पावसाळ्यात पाणी तुंबून, जनजीवन विस्कळीत होणे असे प्रकार हल्ली आपण पावसाळ्यात वारंवार अनुभवतो आहोत. पुरामुळे शेती, बागायतीसह मनुष्यहानीही होऊ लागली. गावाच्या गावं पाण्याखाली जाऊ लागली. आर्थिक नुकसान व मानवी हानी अशा दुहेरी संकटाला मानवाला सध्या तोंड द्यावे लागत आहे. कारखान्यातील प्रदूषित पाणी प्रक्रिया करून समुद्रात वा नदीनाल्यात सोडावे असा कायदा असूनदेखील त्याची नीटशी अंमलबजावणी होत नाही. परिणामी दरवर्षी गंगा व अन्य नद्यांच्या साफसफाईसाठी खर्च करूनही फारसा उपयोग होत नाही. मात्र असे असले तरी आता हे सर्व कारखाने-गिरण्या बंद करणे शक्य आहे का? त्यासाठी अस्तित्वात असणाऱ्या यंत्रणा पूर्ण क्षमतेनिशी चालवल्या गेल्या पाहिजेत.

वैज्ञानिक क्रांतीने मानवाच्या हातात अमोघ शक्ती दिली. नवनवीन बी-बियाणांचा शोध लावून धान्याचे उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न केला. खडकाळ व कमी पावसाच्या प्रदेशात तग धरून राहणाऱ्या व अधिक उत्पादन देणाऱ्या धान्याच्या जाती व फळफळावळ विकसित केली. विज्ञानाने मानवाचे कष्ट कमी झाले. जलद गतीची वाहने उपलब्ध झाली. मानवाने पंचमहाभूतांना आपल्या कह्यात ठेवण्याचा प्रयत्न केला त्यालाही बराच काळ लोटला. पण, हे करत असताना सारासार विचार करून निर्णय घेतले नाहीत तर दुर्घटना घडतात. त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत विचारात घ्यावे लागते. फेब्रुवारी २०२१ मध्ये उत्तराखंड येथे हिमनग फूटून प्रलयकारी महापूर आला त्यात दोन विद्युतप्रकल्प नष्ट झाले. त्या प्रकल्पाबात धोक्याचा इशारा अनेक तज्ज्ञांनी दिला होता.

विज्ञानामुळेच मानवाला चंद्रावर पाऊल ठेवता आले. अनेक रोगांवर मात करता आली. मानवाचे आयुर्मान वाढले. विज्ञानाने स्वच्छता आणि व्यायामाचे महत्त्व पटवून दिले. जगाच्या कानाकोपऱ्यांत कुठेही खुट्ट झाले तरी ती घटना घरबसल्या पाहता येऊ लागली. डिजिटल क्रांतीमुळे मनोरंजनाची विविध साधने उपलब्ध झाली. (त्यामुळेच लॉकडाऊनच्या काळात अनेकांना जीवन सुसह्य झाले.) विज्ञानाने अज्ञान स्वीकारायला शिकवले. विज्ञानाने शोधाच्या रूपाने विविध शक्ती मानवाला बहाल केल्या. पण विज्ञानाने दिलेली ही शक्ती मानव विधायक कार्यासाठी वापरून थांबला नाही. त्यातून त्याने विविध प्रकारचे संहारक बाँब (साधे, नापाम, अणू, हायड्रोजन इत्यादी बनवून त्याद्वारे शहरेच्या शहरे बेचिराख करून टाकली.) बनवले. जैविक युद्ध काय असते आणि त्याचे परिणाम काय होतात हे गिरीश कुबेरांनी 'युद्ध जिवांचे' या पुस्तकामध्ये सोदाहरण सांगितले आहे. (कोरोनाचं संकट हे एक प्रकारचे जैविक युद्धच म्हणायला हवे. कोरोनाचा जंतू मुद्दाम सोडला वा प्रयोगशाळेतून निसटून जगभर पसरला तरी परिणाम तोच!)

या सर्व गोष्टींना प्रामुख्याने मानवच जबाबदार आहे. मानसिक आरोग्यावरही या सगळ्याचा परिणाम होतो. उष्णतेने महासागरांच्या पाण्याची पातळी वाढते आहे. संशोधक यावर उपाय शोधत आहेत, काही उपाय शोधलेही आहेत. गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ गाभा घटक म्हणून अभ्यासक्रमात पर्यावरण ह्या विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. (व्यावहारिक स्तरावर त्याचे परिणाम मात्र दिसत नाहीत.) सांडपाण्यावर जंगलनिर्मितीचा प्रयोग कसा करता योईल याबाबत डॉ. हेमंत बेडेकर यांनी २३ फेब्रुवारी २०२१ रोजी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये लिहिले आहे. जगभरात वर्षाकाठी सुमारे ९३१ दशलक्ष टन अन्न वाया जाते. ते कुजते. त्यातून वायू बाहेर पडून हवा दूषित होते. भारतात दरवर्षी अंदाजे ६८ दशलक्ष टन अन्नपदार्थांची नासाडी होते. हे थांबवायला हवे. तसे घडताना दिसत नाही. जागतिक स्तरावर पर्यावरणविषयक विविध करार केले

**पान १४ वर...**



# घातक रसायने आणि पर्यावरणहानी अनुत्तरीत प्रश्न!

सुजाता बाबर

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे। पक्षीही सुस्वरे। आळविती।।
येणे सुख रुचे एकांताचा वास। नाही गुणदोष। अंगी येत।।

संत तुकारामांचा हा अभंग आपण किती वेळा ऐकला असेल, त्याचे दाखले दिले असतील. पर्यावरणाचा मानवी जीवनावर होणारा प्रभाव इतक्या समर्पक शब्दांमध्ये मांडलेला क्वचितच दिसतो. अनेक संतांनी निसर्ग आणि पर्यावरण व त्याचा मानवी जीवनाशी असलेला संबंध त्यांच्या अभंगांतून, ओव्यांमधून मांडला आहे. पण आपण सामान्य जन! आपल्याला मात्र हे कधी समजले नाही, कधीही जाणवले नाही!

मानवामध्ये उपभोगवाद आणि निसर्गाला ओरबाडून घेण्याची वृत्ती यामुळे त्याने अनेक गैरमार्गांनी पर्यावरणाचा ऱ्हास केला. पेरावे ते उगवते हा तर निसर्गनियम! आपण जे पेरू, तेच उगवेल आणि खावे लागेल. अनेक संशोधने आणि अभ्यास सांगतात की पर्यावरणाचा इतक्या मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होण्याची कारणे ही मानवनिर्मित आहेत. पर्यावरणात आपण घातक रसायने अनेक रूपांमध्ये, अनेक पद्धतींनी मिसळत आहोत. घातक कचरा म्हणजे ज्यांच्या भौतिक, रासायनिक किंवा जैविक रचनांमुळे ते एकटे किंवा इतर कचऱ्याच्या किंवा पदार्थांच्या संपर्कात आल्यामुळे आरोग्य किंवा पर्यावरणाला हानी पोहचण्याची शक्यता असते असे रासायनिक पदार्थ!

संपूर्ण विश्व हे अनेक मूलभूत विज्ञानाच्या नियमांनी बांधले गेलेले आहे. विश्वाचा कितीही लहानसा भाग घेतला तरी तो रसायनांनी भरलेला आहे. मानवी शरीर असो की दूरच्या दीर्घिका किंवा कृष्णविवरे, सगळ्या पदार्थांमध्ये रसायन आहे. विश्वातील अगदी सूक्ष्म कण असला तरी तो कोणत्या ना कोणत्या रसायनाचा अंश अणू-रेणूंच्या रूपामध्ये अस्तित्वात असतो. रसायने दुधारी शस्त्रासारखी आहेत. त्यांचे गुणधर्म त्यांच्या विशिष्ट रचनेमुळे असतात. त्यांना आपण वापरू तसे परिणाम ते देतात. आपण केवळ घातक रसायनांविषयी विचार करूया.

घातक रसायनांचे पर्यावरण आणि मानवी आरोग्यावर परिणाम होतात. विशेषतः पर्यावरणात सोडली जाणारी रसायने ही सर्वात समस्याप्रधान असतात. कारण ती नैसर्गिक अन्नासाखळी आणि माती, हवा आणि पिण्याच्या पाण्यामध्ये मिसळतात, त्याद्वारे आपल्या शरीरात साठवली जातात. पॉलिक्लोरिनेटेड बायफिनल्स (पीसीबी), जड धातू आणि कीटकनाशकांसह घातक रसायने वातावरणाला दूषित करतात. यामुळे मानव, प्राणी, वनस्पती, सागरी जीवन आणि आपल्या ग्रहाच्या आरोग्याची अपरिवर्तनीय हानी होते. बरेच विषारी पदार्थ अन्नप्रणालीमध्ये आढळतात. आपण जे अन्न सध्या खातो त्यामध्ये संभाव्य दीर्घकालीन हानिकारक परिणाम असू शकतात. २०१७ च्या अभ्यासानुसार जागतिक रसायन उद्योगातील गुंतवणूक पाच हजार अब्ज रुपयांपेक्षा जास्त होती आणि २०३० मध्ये ती किमान दुप्पट वाढेल. यामध्ये विशेषतः महिला, गर्भवती महिला, लहान मुले अत्यंत धोक्यामध्ये आहेत. यात सर्वात मोठ्या प्रमाणात जे आजार बळावतील त्यात प्रामुख्याने कॅन्सर, तीव्र विषबाधा, आतड्यांचे आजार, मज्जासंस्थांचे विकार, प्रजननविकार आहेत.

घातक रसायनांमुळे प्रामुख्याने जैवविविधता आणि नाजूक परिसंस्थांना धोके आहेत. समुद्रात गेलेल्या प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे जवळपास सातशेहून अधिक प्रजातींना धोका संभवतो. प्रतिजैविक प्रतिरोधाला गती मिळते. मातीचा दर्जा घसरतो आणि समुद्रातील प्रवाळ खडकांवर दाब वाढतो. नर माशांचे स्त्रीलिंगीकरण होते आणि यामुळे माशांच्या प्रजननसंस्थेवर परिणाम होऊन माशांच्या अनेक जाती नष्ट होत आहेत. घातक रसायने हे हरितगृहवायू उत्सर्जित करणारा तिसरा मोठा उद्योग आहे. घातक रसायनांमुळे महासागरांमध्ये 'मृत क्षेत्र' मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. लहान मुलांच्या बाबतीत त्यांचे वजन आणि घातक रसायनांचा संपर्क यांचे गुणोत्तर अधिक असल्यामुळे मुले प्रौढांपेक्षा अधिक असुरक्षित आहेत. लहानपणीच घातक रसायने आणि प्रदूषणाच्या संपर्कात आल्याने त्याच्याशी निगडित अपंगत्व आणि आजार यांचे 'अव्यक्त साथीचे रोग' पसरताना दिसत आहेत. हे प्रमाण वाढत जाणार आहे. जागतिक पुरवठासाखळी आणि रसायने व उत्पादनांचा व्यापार दिवसेंदिवस गुंतागुंतीचा होत आहे. यामुळे जागतिक पातळीवरील रसायनांचे जमीन किंवा पाण्यात सोडून देण्याचे प्रमाण, संपर्क, घनता, आणि आरोग्य व पर्यावरणीय प्रभावांवर परिणाम होईल. ते वाढतच जातील.





भारतामध्ये विशेषतः पेट्रोकेमिकल्स, औषधे, रसायने, खते, कापड आणि सामान्य अभियांत्रिकी उत्पादनांचे उद्योग आहेत. यामधून बाहेर सोडला जाणारा औद्योगिक टाकाऊ कचरा प्रामुख्याने अत्यंत घातक रसायनांच्या स्वरूपात असतो, जो सहजासहजी नष्ट होत नाही आणि माती व पाण्यामधून संपूर्ण पर्यावरणाचा ऱ्हास करतो.

भारतामध्ये २०१६ सालापूर्वी घातक कचऱ्यामध्ये घरगुती आणि किरणोत्सर्गी कचरा समाविष्ट केलेला नव्हता. याचे मुख्य कारण म्हणजे त्याचे प्रमाण इतर घातक कचऱ्याच्या तुलनेत कमी आहे. घातक रासायनिक कचऱ्याचे अनेक प्रकार असतात. ज्वलनशील किंवा स्फोटक कचरा प्रामुख्याने बायोमेडिकल संशोधन, महाविद्यालये आणि विद्यापीठ प्रयोगशाळा, कार्यालये, रुग्णालये, अणुऊर्जा प्रकल्प यांमधून तयार होतो. यामध्ये अमोनिया, सल्फाइड्स, मिथेन, कार्बन डाय ऑक्साइड, अमोनिया आणि हायड्रोजन सल्फाइड यासारखे घातक वायू निर्माण होतात आणि यातून हवेचे प्रदूषण होते. आगी लागतात आणि अनेक ठिकाणी स्फोटदेखील होतात. रासायनिक उद्योग, प्रयोगशाळा, कीटकनाशके आणि ऊर्जाप्रकल्पांमधून मोठ्या प्रमाणावर आगी लागून ऑक्सिजन आणि ऑक्सिडायझिंग पदार्थ जसे अमोनियम नायट्रेट, पोटॅशियम नायट्रेट, नायट्रिक ॲसिड बाहेर पडतात आणि यांनी मोठ्या प्रमाणावर पाणीप्रदूषण वाढते. पिके नष्ट होतात. मुख्य म्हणजे जलजीवन नाश पावते. रासायनिक उद्योग, किरणोत्सर्गी आणि आण्विक प्रकल्पांमधून युरेनियम टेलिंग्ज, ट्रान्सयूरेनिक, सायनाईड्ससारखी विषारी रसायने बाहेर पडतात. या रसायनांमुळे मोठ्या प्रमाणात विषबाधा, गंभीर आजार, मृत्यू होतात. यामुळे जमिनीची उत्पादकता कमी होते. अनेक प्रकारच्या मानवी वर्तनविकृती, कर्करोग, शारीरिक विकृती निर्माण होतात. आपल्याला नागासाकी आणि हिरोशिमा, भोपाळ वायुगळती ही मोठी उदाहरणे ज्ञात आहेत. संशोधन आणि विकाससंस्था, आरोग्यसेवा संस्था, जैवतंत्रज्ञान प्रयोगशाळा, औषधेनिर्मिती कारखाने यामधून सायटोटॉक्झिक्ससारखी संसर्गजन्य रसायने बाहेर पडतात. यांच्यामुळे पर्यावरण अनेक विषारी पदार्थांच्या संपर्कात येते. जमीन नापीक होते, पाण्यात ही दूषिते मिसळतात, तसेच साथीचे अनेक रोग पसरतात. सामान्य उत्पादन कारखान्यांमधून अनेक प्रकारची क्षारके बाहेर पडतात. उदाहरणार्थ, मर्क्युरिक क्लोराईड. हा कचरा अगदी सक्रिय कचरा असतो. यामुळे झाडे आणि प्राण्यांचे नुकसान होते. उत्पादन/प्रजननक्षमता कमी होते. पाणी दूषित होते. जैवतंत्रज्ञानउद्योग आणि संशोधन व विकास प्रयोगशाळांमधून पर्यावरणीय विषारी पदार्थ जसे- पारा, आर्सेनिक, पेट्रोलियम, हायड्रोजन सल्फाइड, क्लोरिन वायू बाहेर पडतात. यांचे पर्यावरणावर तत्काळ किंवा दीर्घकालीन परिणाम असतात. मुख्य म्हणजे जैविक प्रणालींमध्ये ते साठून राहतात. यामुळे प्रामुख्याने जनुकीय फेरफार होतात. रसायने आणि औषधांच्या कारखान्यांमधून, खतकारखाने, चामड्याचे कारखाने यांमधून दीर्घकालीन परिणाम करणारे विषारी पदार्थ बाहेर पडतात. यांची यादी सर्वात मोठी आहे. प्रामुख्याने हवेचे प्रदूषण करतात आणि यातून कॅन्सरसारखे गंभीर आजार होतात. ते मातीमधून पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करतात. प्लास्टिक आणि रबर उद्योग हे सर्वात घातक रासायनिक दूषिते निर्माण करतात. यात प्रामुख्याने कर्ब पेरॉक्साईड असतात. यांच्यामध्ये स्वतःच कुजण्याची क्षमता असते आणि ते मोठ्या प्रमाणावर पाणी प्रदूषित करतात.

हरितक्रांतीनंतर एकच पीक घेणे सुरू झाले. उत्पादनवाढीसाठी भरमसाठ पोटॅशियम-युरिया खतांचा वापर, जनुकीय फेरफार केलेली बियाणी आणि केवळ अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांचा वापर यांचा मारा होत गेला. अवघ्या दशकामध्ये जमिनीची पत नष्ट झाली. ती अधिक खते मागू लागली. खर्च वाढला. पारंपरिक आणि स्थानिक शेतीपद्धती, ज्ञान लयास गेले. संमिश्र पीक पद्धती दूर फेकली गेली. एक बोलके उदाहरण पुरेसे आहे – भारतीय उपखंडात भातांची ७०,००० हून अधिक वाणे आढळून आली होती. १९७० नंतर हरितक्रांतीमुळे ही वाणे नाहीशी झाली. आज केवळ ७,००० स्थानिक वाणे अस्तित्वात आहेत. त्यापैकी केवळ मूठभर प्रकारांची शेती केली जाते. ही भाताची अवस्था तर इतर पिकांविषयी विचारदेखील नको.

भारतामध्ये पेट्रोकेमिकल्स, औषधउद्योग, कीटकनाशके, रंग उद्योग, पेट्रोलियम, खते, ॲस्बेस्टॉस, कॉस्टिक सोडा, अजैविक रसायने आणि सामान्य अभियांत्रिकी उद्योग यांच्याद्वारे घातक रासायनिक

कचरा निर्माण होतो. दुसरा मार्ग म्हणजे भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर बाहेरील देशांमधून पुनर्वापर आणि पुनर्प्रक्रिया करण्यासाठी कचरा आणला जातो. कायद्याने यावर निर्बंध असले तरी नुकतेच सामाजिक संस्थांनी यावर लक्ष ठेवून ओडिशामध्ये अशा प्रकारे आणलेला कचरा पकडला आहे.

नाणार प्रकल्पामधून सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील १७ गावांना धोका आहे. या प्रकल्पातून सोडल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे सागरी परिसंस्थेचे तसेच आंबा, कोकम यासारख्या अनेक पिकांचे प्रचंड नुकसान होणार आहे. मच्छीमारांनाही याची झळ पोहोचणार आहे. तरीही हा प्रकल्प विचाराधीन आहे. सल्फर ऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साइड यांसारख्या प्रदूषकांनी राष्ट्रीय परवानगी मर्यादेचे उल्लंघन केल्याने कोपरखैरणे आणि तुर्भे भागांमध्ये श्वास घेणे कठीण झाले आहे. दरवर्षी भारतात औष्णिक ऊर्जाप्रकल्पांमधून हवेत राख पसरण्याचे प्रमाण वाढते. त्याची विल्हेवाट साधारणत: तलावामध्ये, नद्यांमध्ये केली जाते. त्यामुळे पाण्यात त्याची स्लरी तयार होते. कोराडी व खापरखेडा औष्णिक ऊर्जाप्रकल्पांमुळे (नागपूर) येथील आसपासच्या अनेक लहान गावांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते आहे. उडणारी राख पाण्यामध्ये, पिकांवर जाऊन पडते. या पाण्यामध्ये मॅग्नेशियम, कॅल्शियम, नायट्रोजन, सल्फर यांची ऑक्साइड्स तसेच अर्सेनिक, मॉलिब्डेनम, व्हॅनॅडियम आणि युरेनियम यांसारखी घातक रसायने मोठ्या प्रमाणात सापडली आहेत.

घातक रसायनांमधील प्लास्टिक हे तर आपल्या श्वासातही सापडते. प्लास्टिक हे रसायन नैसर्गिक आणि कृत्रिम अशा दोन्ही स्वरूपांत आढळते. प्लास्टिकने आपले आरोग्य, सुरक्षा आणि मानसिक शांती यावर परिणाम केला आहे. अलेक्झांडर पारकस याने प्रथम मानवनिर्मित प्लास्टिकचा शोध लावला. १८६२ मध्ये लंडन येथे एका आंतरराष्ट्रीय प्रदर्शनामध्ये त्याने हा शोध औपचारिकरीत्या जाहीर केला. सेल्युलोज या जैविक रसायनाला उष्णता दिल्यानंतर कोणताही आकार देता येईल असा लवचीक पदार्थ त्याने निर्माण केला होता. पुढे यावर अनेक शास्त्रज्ञांनी विविध प्रक्रिया करून अनेक प्रकारचे कृत्रिम प्लास्टिक तयार केले. आज आपण प्लास्टिकच्या अनेक वस्तू वापरतो. प्लास्टिकच्या पिशव्या व वस्तू आपण टाकून देतो, जनावरे ती खातात आणि त्यात दगावतातही.

माऊंट एव्हरेस्टसह जगातील सर्वात दुर्गम ठिकाणीही प्लास्टिक दिसू लागले आहे. प्लास्टिकच्या छोट्या तुकड्यांनी, तंतूंनी खोल समुद्रात आणि सर्वोच्च शिखरावर प्रवेश केला आहे. माऊंट एव्हरेस्ट हे सर्वात लांबचे व उंच ठिकाण आहे जेथे नुकतेच लहान प्लास्टिकचे तुकडे आणि तंतू सापडले आहेत. हे सगळे बहुतेक पॉलिस्टर तंतू आहेत. बहुधा हे गिर्यारोहकांच्या उपकरणे आणि कपड्यांद्वारे सांडले किंवा फेकले गेले असावेत. प्लास्टिक खोल समुद्रात तळाशीदेखील आहे हे माहीत होतेच, पण आता ते पृथ्वीच्या सर्वात उंच पर्वतावरही आहे. इंग्लंडमधील प्लाइमाउथ विद्यापीठाचे सागरी वैज्ञानिक आणि संशोधक इमोजेन नॅपर यांच्या मते ते आता आपल्या वातावरणात सर्वव्यापी झाले आहे.

आपल्या जीवनशैलीत प्लास्टिकची भूमिका वाढत चालली आहे. जागतिक पातळीवर, प्लास्टिकचा वापर १९५० मध्ये सुमारे पाच दशलक्ष मेट्रिक टनांवरून २०२० मध्ये ३३० दशलक्ष मेट्रिक टनांवर गेला आहे. प्लास्टिक वापरताना किंवा फेकून दिल्यावर त्यातील बारीक कण हवेत टाकले, पसरलेले जातात. पाच मिलीमीटरपेक्षा कमी जाडीचे प्लास्टिक अत्यंत घातक असते. ते समुद्रातील खेकड्यांच्या श्वसनअवयवांमध्ये अडकून बसते. माशांच्या कल्ल्यांमध्ये अडकून बसते. हे सूक्ष्म तंतू आणि तुकडे संपूर्ण परिसंस्थेला हानी पोहचवू शकतात. इतकेच नाही तर हे सूक्ष्म प्लास्टिक आपल्या आतड्यामध्येदेखील सापडते. प्लास्टिकच्या कचऱ्यात मोठ्या प्रमाणावर भर पडली आहे ती इलेक्ट्रॉनिक कचऱ्याची. आज आपण जी इलेक्ट्रॉनिक वस्तू वापरतो, त्यामध्ये नवनवीन तंत्रज्ञानाची भर पडत जाते आणि जुन्या वस्तू तशाच फेकल्या जातात. साधा मोबाइल फोन खराब झाला तर दुरुस्त करण्यापेक्षा नवीन फोन त्याच किमतीत मिळतो. जुना विकला जात नाही आणि मग तो कचऱ्यात फेकला जातो. अशा अनेक वस्तू, जसे, कॉम्प्युटर, पेनड्राइव्ह, केबल, प्रिंटर कचऱ्यात असतात. हेसुद्धा एक प्रकारचे प्लास्टिक आहे. त्याचे ढीग रोज वाढत आहेत. डम्पिंग ग्राउंडवर या कचऱ्याला आगी लागतात, ज्यातून विषारी वायू बाहेर पडतात. यातून पर्यावरणाचा ऱ्हास वाढतच जातो.

या सगळ्या समस्या पाहिल्या की आपण घातक रसायने म्हणून सगळा आरोप रसायनांवर करतो. रसायने कुठे वापरली जात नाहीत? सगळीच रसायने घातक नसतात. रसायने घातक असली तरी त्यांचा वापर तर माणसाच्या हातात आहे? साखर, मीठ हीदेखील (घातक) रसायनेच आहे. किती खायची हे प्रत्येकाच्या हातात आहे. हा विवेक सर्वत्र लागू होतो.

जागतिक पातळीवर आता हरित रसायनांचा विचार होत आहे. अनेक देशांमध्ये घातक रसायने निर्माण करणाऱ्या उद्योगांवर बंदी आहे. स्वीडनसारख्या देशात जैवविविधता जपण्यासाठी आणि प्रदूषणविरहीत पर्यावरणासाठी संपूर्ण देश आणि नागरिक कार्यरत असतात. तेथे खाणकाम जवळपास बंद झाले आहे. आपल्याकडे हे शक्य आहे का? यासाठी राजकीय इच्छाशक्ती हवी. प्रत्येक माणसामध्ये कचरानिर्मिती न करण्याचे व्रत हवे. आंतरराष्ट्रीय स्तरावर धोरणे आखली पाहिजेत. मोठ्या स्तरावर उद्योगांनी स्व-नियंत्रणाचा विचार केला पाहिजे. अनेक कायदे, निर्बंध असूनही आज आपण पर्यावरणात संपूर्ण सजीवसृष्टीची हानी पाहत आहोत. केवळ पक्षी, प्राणी, वृक्ष, पिके यांचीच नाही तर अनेक मानवजाती नष्ट होताना दिसत आहेत. परिसंस्थेतील प्रत्येक घटकाची भूमिका महत्त्वाची आहे. निसर्गाने ती ठरवून दिलेली आहे. या साखळीत कोणतीही ढवळाढवळ ही संपूर्ण विश्वाला धोका निर्माण करते. किमान आपल्याच पुढच्या पिढ्यांसाठी तरी ही ढवळाढवळ आपण थांबवायला हवी!

**– सुजाता बाबर**
भ्रमणध्वनी : +९१ ९२८४३७२३२२
sumiba_r@yahoo.com



# पर्यावरण-ऱ्हासामध्ये हरवलेला स्वाद-सुगंध

**डॉ. नागेश टेकाळे**

अवघे विश्व २०२० या प्रकाशमय नववर्षाच्या स्वागतास सज्ज असताना अंधाऱ्या जगतात चीनमधील वुहान शहरापासून चार हजार कि.मी दूर अंधाऱ्या गुहांमधील छताला लटकलेल्या वटवाघुळांना प्रयोगशाळेत आणून त्यांच्या शरीरात तेवढेच शांत, सुखी, पोषक जीवन जगणाऱ्या कोविड विषाणूंना आम्ही त्यांच्या मूळ परिसंस्थामधून बाहेर काढले आणि त्याची शिक्षा अवघ्या विश्वामधील मानवजातीला वेदनादायी मृत्यूला सामोरे जात वर्षभर भोगावी लागली. आजही ती सुरूच आहे. गेले एक वर्ष पृथ्वीवरचा एकही देश अपवाद राहिला नाही की जेथे कोरोनाने फुले वाहिलेल्या मानवी स्मशानयात्रा निघाल्या नाहीत, एवढेच काय, स्मशानाबाहेर रांग नाही असा एकही दिवस गेला नाही. लाखो मानवी जीव गेले याचे प्रत्येकालाच वाईट वाटले पण गेली पाच दशके अशाच जैवविविधतेच्या स्मशानयात्रा आपण काढत आहोत याबद्दल आम्हाला आजही ना खंत ना दु:खाचा आवेग. 'यूएनडीपी'चा २०२०चा अहवाल सांगतो की मानवाच्या अनियंत्रित विकासगाथेमुळे या वसुंधरेच्या भूपृष्ठावरील ५० टक्के जैवविविधता संपूर्णपणे नष्ट झाली आहे, जी आपणास यापुढे कधीही परत मिळू शकणार नाही. यात कितीतरी असे वनस्पती आणि प्राणिजन्य जीव होते, जे शास्त्रज्ञांनी कधीही कुठेही पाहिलेले नव्हते. विज्ञानाची ही अपरिमित हानी झाली आहे. प्राणी, पक्षी, जीवजंतूंशी सकारात्मक संशोधनाव्यतिरिक्त विनाकारण छेडछाड करू नका असे विज्ञान सांगते, पण आपण ते कटाक्षाने पाळतो का? सिडने विद्यापिठामधील एक संशोधन सांगते की आपण एक वृक्ष तोडतो तेव्हा लाखो जीव निराधार होतात आणि त्यातील अर्धे तर नष्ट होऊन जातात. एका वृक्षाने सांभाळलेले हे सुदृढ पर्यावरण आणि तेथील जैवविविधता कायमची नष्ट करण्यासाठी मानवाच्या हातामधील एक कुऱ्हाडीचा दांडा पुरेसा असतो.

ढासळलेल्या पर्यावरणामुळे आज जीवसृष्टीची फार मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. ढासळलेले पर्यावरण म्हणजे वातावरणामध्ये सतत वाढणारा कर्बवायू. वास्तविक कर्ब वायू हा आपला मित्र आहे. पृथ्वीच्या भूपृष्ठावर पडणारी सूर्याची उष्णता किरणांच्या माध्यमातून परावर्तित होते आणि वातावरणामधील कर्बवायू तिला अडवतो. त्यामुळे पृथ्वी उबदार आणि जगण्यास सुसह्य होते, मात्र हे शक्य होते कर्बवायू योग्य प्रमाणात असतो तेव्हाच. अनियंत्रित जीवाष्मइंधनाचे ज्वलन चालू होते, उघड्यावरील ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन बिघडते तेव्हा मोठ्या प्रमाणावर कर्बवायू तयार होऊन तो वातावरणात साठू लागतो आणि पृथ्वी उष्ण होऊ लागते. वातानुकूलित यंत्रणा अथवा सुसज्ज निवारा यांचा वापर करून मनुष्यप्राणी आपल्या घरात, कार्यालयात, वाहनात सुरक्षित राहू शकतो. उष्णतेचा त्रास झालाच तर त्यांना उपचारासाठी सुसज्ज रुग्णालये असतात, पण जैवविविधतेचे काय? आज अनेक लहान पक्षी, कीटक उष्णतेच्या दाहाने क्षणार्धात गतप्राण होतात, त्यांना सुरक्षित निवारा मिळावा म्हणून दाट पर्णसंभार असलेली झाडेही आम्ही तोडली, नद्यांना एक थेंबसुद्धा पाणी नाही, या पक्ष्यांना, किटकांना जगण्याचा अधिकार नाही काय? विकास मग तो जैविक असो अथवा अजैविक, आम्ही फक्त आमचाच स्वार्थ पाहिला. हजारो वर्षांपासूनची आमची पारंपरिक सेंद्रिय शेती आणि बियाणे आम्हीच संकरित पिके आणि वाणांच्या हव्यासापोटी नष्ट केले. फळांचा, फुलांचा आकार वाढला, विविध रंग आले, मात्र त्यांचा मधुर स्वाद गेला आणि दरवळणारा सुगंधही. केवड्याचा मंद सुवास, पावसाळ्यामधील जाई, जुई, चमेली, मोगरा आज पर्यावरणऱ्हासात पूर्णपणे हरवला आहे. कुठे आहे आमची सुरंगी, जव्हारच्या दुर्गम अदिवासी भागात समाजसेवा करत असताना आरोग्यसेवेपासून वंचित असणाऱ्या पाड्यांचा शोध घेण्यासाठी डोंगरदऱ्यांमधून सुरंगीच्या सहवासात मी दिवसाकाठी १५-२० कि.मी सहज चालत असे. सुरंगीचा तो सुगंध माझ्या अदिवासी सेवेतील उत्साहाचा प्रेरणास्रोत होता. या गोष्टीला तीन दशके होऊन गेली. आजही मी त्या भागात जातो मात्र सुरंगीच्या विरहाने मन व्याकूळ होते, मन व शरीर थोडे फिरले तरी थकून जाते. १९८०-८२ चा काळ, ठाणे महाविद्यालयात वनस्पतिशास्त्राचा प्राध्यापक असताना सकाळच्या साडेआठच्या तासाला हजर राहण्यासाठी मी ठाणे स्थानकाच्या फलाट क्रमांक



सुरंगी



केळी

१च्या बाहेर सकाळी ७ वाजताच हजर असे, तो केवळ सुरंगीच्या सुवासासाठीच. त्यावेळी बस स्टँन्डला लागूनच कितीतरी अदिवासी स्त्रिया या फुलांचे गजरे विकत बसलेल्या आढळत. एका तासात बाजार संपत असे मात्र आसमंतामधील सुरंगीचा सुवास दुपारपर्यंत तिच्या अस्तित्वाची जाणीव करून देत असे. आज तेथे बाकी सर्व आहे तसेच आहे, फक्त सुरंगी सोडून, कारण आज ती अदिवासींच्या जंगलामधूनच हद्दपार झाली आहे. फुलांचा सुगंध हा कीटक आणि फुलांच्या भेटीमधून होणाऱ्या परागसिंचनासाठी असतो, यातूनच फळधारणा आणि वंशवृद्धी होते. लालस आणि हव्यासापोटी सुरंगीची फुले कळ्यांसह खुडली गेली, कीटकांचा मधू रस हरवला आणि रोपांची प्रभावळ तयार करता येत नाही म्हणून सुरंगीची झाडेही वठून गेली. चाणक्याच्या कौटिल्यशास्त्रात म्हटले आहे की वनस्पतींची फुले आवश्यक तेव्हाच आणि मोजकीच तोडावी कारण फूल हे प्रजोत्पादनामधील एक महत्त्वाचा घटक आहे. दुर्दैवाने गेल्या चार-पाच दशकांत चाणाक्यनीतीकडे आम्ही पूर्ण दुर्लक्ष केले आणि पर्यावरणाच्या ऱ्हासास एक सुंदर सुगंधी फुल हरवून गेले.

गेल्या २५ वर्षांतच जास्तीत जास्त ऱ्हास झालेली पिवळी जाई, लहान चमेली, रान मोगरा, सोटई मोगरा, रजनीगंधा, मुचकुंद, भूमिचंपक, काटेकोरांटी, रातराणी एकच प्रश्न विचारतात, आमचे हे सुगंधी विश्व का नष्ट झाले? खरेच! काय चूक आहे या प्रश्नामध्ये? मोगरा फुलला! फुले वेचिता बहरू कळियांसी आला या माऊलींच्या ज्ञानेश्वरीमधील शब्दांची उधळण आम्हाला यापुढे प्रत्यक्षात कधीच पाहावयास मिळणारच नाही का? हवेमधील मानवनिर्मित कर्बवायू आणि मिथेनवायूचे वाढते प्रमाण हवामानबदलास आणि जागतिक तापमान वाढीस जबाबदार ठरत आहे. या वाढत्या तापमानात अनेक मित्र कीटकांचा ऱ्हास झाला, कितीतरी रंगीबेरंगी नाजूक फुलपाखरे केव्हाच आमच्या दृष्टिआड झाली त्याचबरोबर मधमाश्या, भ्रमर आणि इतर कीटकसुद्धा. यांच्या ऱ्हासामुळे सुगंधी फुलांच्या पराग सिचंनामध्ये अडथळे आले आणि फलधारणा मंदावली म्हणण्यपेक्षा थांबली गेली. हवेमधील वाढत्या प्रदूषणामुळे अनेक मित्र कीटकांची उडण्याची कार्यक्षमता कमी झाली आहे. अनेक सुगंधी फुले त्यांच्या गंधकुपी उघड्या ठेवून या अतिथींची वाट पहात असतात. त्याचवेळी हवाप्रदूषणामुळे संभ्रमित झालेले कीटक त्याच त्या फुलांना 'या फुलांच्या गंधकोषी सांग तू आहेस का?' असे गुणगुणत फुलावर न बसता अवतीभोवती भटकताना आढळतात अशा वेळी 'का रे दुरावा! का रे अबोला!' म्हणत फुलांना खाली गळून पडण्याशिवाय पर्यायच उरत नाही. सोनचाफ्याला खालच्या बाजूला फलधारणा होते मात्र वरच्या बाजूस शेंड्याकडे अनेक फुले असूनही केव्हातरी एखादेच फळ दिसते याचा अर्थ प्रदूषणामुळे कीटक एवढे उंच उडू शकत नाहीत अथवा उंच उडणारे मित्र कीटक हवाप्रदूषणामुळे काळाच्या पडद्याआड गेले असणार. सुगंध हा नैसर्गिक रसायनाचा अर्क असतो आणि त्याच्या निर्मितीस वनस्पतींना प्रचंड मोठी ऊर्जा खर्च करावी लागते, एवढी ऊर्जा खर्च करून निर्माण केलेला गंध स्वीकारण्यासाठी कीटकांचा सहभाग अथवा अस्तित्वच नसेल तर ऊर्जेचा एवढा अपव्यय कशासाठी? म्हणूनच फुलांचा गंध हळुहळू कमी झाला असावा. हवेमधील कर्ब, मिथेन आणि नत्र वायूंचा अस्वीकारणीय वास सुगंधी फुलांच्या हवेत पसरणाऱ्या सुगंधामध्ये अडथळा निर्माण करून कीटकांना संभ्रमित करत आहे. अनेक किटकांच्या गंध ओळखणाऱ्या ग्रंथीवर प्रदूषकांचा पातळ थर शास्त्रज्ञांना आढळला आहे. नवीन संशोधन असेही सांगते, की सुगंधी फुलांचे परागसिंचन रात्रीच्या अंधारात नीरव शांततेमध्ये जास्त यशस्वी होते, पण यामध्येसुद्धा वाढते प्रकाशप्रदूषण अडथळा निर्माण करत आहे. सुगंधी फुले फुललेली असतात तेव्हा परागसिंचन करणारे कीटक प्रकाशमान दिव्यांना धडका देऊन मृत्यूला सामोरे जात असतात. सुदृढ पर्यावरणाची यापेक्षा वेगळी शोकांतिका आणखी काय असणार!

फुलांना आपण थोडे बाजूला ठेवून कृषीकडे पाहिले तर पुन्हा सुगंधाकडेच लक्ष जाते. पहिल्या मृगामधील धरतीवरचा पाऊस पूर्वी केवढातरी सुगंध निर्माण करत असे, तो मातीमधील विशिष्ट जिवाणूंमुळेच. रासायनिक खते आणि किडनाशकांमुळे हे सुगंध निर्माण करणारे जिवाणू मातीतून कायमचे नष्ट झाले. पहिला पाऊस म्हणजे मनसोक्त भिजणे, बागडणे, ती रिमझिम, तो सुगंध आणि तो पाऊस आता राहिलाच नाही. पडतो तेव्हा भीती वाटते. पावसाचा हा आनंद कुणी हरवला? मातीचा सुगंध गेला आणि सोबत



**सोनचाफा**

'कस'सुद्धा. जेवणाच्या ताटामधील प्रत्येक पदार्थाला स्वत:चा एक स्वाद होता, आता ताट तेवढेच भरलेले असते मात्र त्या अन्नाला ना नैसर्गिक स्वाद ना चव. उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म हे जाऊन, आता फक्त उदरभरणच शिल्लक राहिले आहे आणि यास कारणीभूत आहे पर्यावरणाचा ऱ्हास. पूर्वी एप्रिल, मे महिन्यांमधील आंब्याची बाग म्हणजे अत्तराची कुपीच असे. 'पाड' लागून फळ झाडावरच पिवळे होऊ लागले की परिसरात सुगंध दरवळत असे आणि नंतरच आंबे खाली उतरले जात असत. माझे आजोबा म्हणत, शंभर पाड जोपर्यंत खाली पडत नाहीत तोपर्यंत झाड उतरावयाचे नाही. आता 'पाडाची' कोण वाट पाहतो! फळ मोठे, वजनदार झाले की उतरावयाचे आणि 'इथेरॉल'चा धूर दिला की आंबा पिवळाधमक. असे रासायनिक आंबे प्रकृतीस अपायकारक असतात हे माहीत असूनही आम्ही ठरवले आहे की निसर्गाला वेळ द्यायचा नाही म्हणजे नाही. नैसर्गिक अन्नामुळे शरीराची प्रतिकारशक्ती वाढते, पण यासाठी तुम्ही निसर्गास अन्नावर योग्य प्रक्रिया करण्यास वेळ देणे गरजेचे आहे. केळीचेच उदाहरण घ्या ना! नैसर्गिक पद्धतीने पिकलेली केळी स्वादिष्ट, पचावयास सहज आणि बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी असतात. याउलट कृत्रिम पिकवलेली पचावयास जड सोबत मधुमेह आणि अपचनास आमंत्रण देणारी असतात. पिवळा रंग येण्यासाठी वापरलेले कार्बाइड हे रसायन केळ्यांच्या गरात जाऊन कर्करोगाला आमंत्रित करू शकते हे संशोधनामधून सिद्ध झाले आहे. या पार्श्वभूमीवर फळांचा राजा आंबा यास अपवाद कसा असू शकेल?

अपरिपक्व, संकरित, सत्त्वहीन आहार प्रतिकारशक्ती कमी करतो, म्हणूनच कोरोनासारखा विषाणू शरीरात आपले आसन पक्के करतो. विविध प्रकारच्या नैसर्गिक अन्नास दूर ठेवून प्रक्रियायुक्त शिजवलेले पदार्थ जास्त वापरल्यामुळेच आज उच्चमध्यमवर्गामध्ये कोरोनाचे प्रमाण जास्त वाढलेले आहे. पूर्वीचे पारंपरिक पर्यावरणस्नेही स्वयंपाकघर, तो हरवलेला सोळा वाट्यांचा मसाल्याचा डबा आणि माजघरातील आजीबाईच्या बटव्याची आज आम्हास गरज आहे. पर्यावरण स्नेही वातावरण, मातीचा सुगंध, वृक्षवेली, पशुपक्ष्यांवर प्रेम, पाणी, विज आणि जीवाष्मइंधनाचा कमीत कमी वापर, ओला कचरा, प्लास्टिकला नकार आणि चविष्ट नैसर्गिक अन्नच तुम्हाला हरवलेल्या सुगंधाच्या आणि जैवविविधतेच्या शोधामध्ये संवर्धनाचा कंदील घेऊन चालताना मदत करेल. ही भारतभूमीच मुळी सुगंधी आहे. फुलाला सुगंध मातीचा या उक्तींप्रमाणे भूमीमधील सुगंधच फुलात आणि अन्नामध्ये स्वादाच्या रूपात परत येतो. मला खात्री आहे, पर्यावरणऱ्हासामध्ये हरवलेली सुगंधी फुले आणि रसदार फळांची स्वादिष्ट चव या संवर्धनाच्या वाटेवरील प्रवासात एके दिवशी आपणा सर्वांस नक्कीच परत भेटेल, मात्र तोपर्यंत ही शोधयात्रा अशीच चालू राहावयास हवी.


**– डॉ. नागेश टेकाळे**

भ्रमणध्वनी : +९१ ९८६९६१२५३१

nstekale@gmail.com


---

**पान ८ वरून...**

## मानवी उत्क्रांती आणि पर्यावरणातील बदल

जातात, परिषदा भरवल्या जातात. इलेक्ट्रॉनिक वस्तू निरुपयोगी झाल्यावरही त्यांची योग्य विल्हेवाट लावली नाही तर त्यांतून बाहेर पडणारे किरण घातक ठरतात. अनेक पैलू असलेला हा विषय आहे. उपलब्ध असलेले उपाय जरी मानवाने कसोशीने अमलात आणले तरी बरेच काही साधता येईल.

सध्याचेच कोरोनाप्रतिबंधात्मक उपाय म्हणून मास्कचे उदाहरण घेतले तर काय दिसते? इतकी साधी गोष्ट सर्व प्रसारमाध्यमांवरून सतत सांगितली जाऊनसुद्धा नेत्यांपासून सर्वसामान्य माणसांपर्यंत ती बाब आचरणात आणलेली दिसत नाही. खरे म्हणजे केवळ कोरोना नव्हे तर श्वसनावाटे संसर्ग होतो असे रोगही मास्कमुळे टाळता येतील. भारतात काही जण हे उपाय अमलात आणतात, पण त्यांची संख्या नगण्य असल्याने त्याचा प्रभाव पडलेला दिसत नाही. जपानमधील लोक तर गेली काही वर्षे जगभर मास्क लावून फिरताहेत. मानसिकता बदलली की हे सगळे अमलात आणले जाईल. ती बदलावी अशी अपेक्षा आपण नक्कीच करू शकतो.

संदर्भ


युवाल नोव्हा हरारी : सेपिअन्स

मेघक्षी दळवी : दैनिक प्रभात, ॲमेझॉन जंगल वाचवण्यासाठी; हवामानाचे संकट; अनुक्रमे २१ व २८ फेब्रुवारी २०२१

डॉ. हेमंत बेडेकर : महाराष्ट्र टाइम्स, २३ फेब्रुवारी २०२१

डॉ. किशोर पवार : महाराष्ट्र टाइम्स, ६ मार्च २०२१



**– वासंती फडके**

दूरध्वनी : २६५९१४१२

phadkevasanti4236@yahoo.co.in



# नैसर्गिक संकटे

अ.पां. देशपांडे

पृथ्वीचा जन्म साडेचार अब्ज वर्षापूर्वीचा आहे. तेव्हापासून आजपर्यंत नैसर्गिक संकटे आली नाहीत असा दिवस शोधून सापडणार नाही. याचा अर्थ पृथ्वीवर सगळीकडे रोज संकटे येतात असे नसून, रोज कुठे ना कुठे संकटे येत असतात. ती पूर्वी माहीत होत नसत कारण बातम्या एका ठिकाणाहून दुसरीकडे पोहोचण्याची साधने उपलब्ध नव्हती. गुजरातमधील २००० सालच्या भूकंपाची बातमी अमेरिकेत प्रथम समजली कारण उपग्रहामार्फत मिळालेली माहिती मोबाइल, इ-मेल अशा साधनांमार्फत जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचते. जुन्या काळी ढग गडगडायला लागले की आदिमानव घाबरून इतस्तत: पळत असे. वीज पडताना दिसली की तो झाडाखाली जाऊन उभा राही. आणि ती जर तो उभा असलेल्या झाडावर पडली तर तो त्यात बळी पडत असे. आता मानवाला असे वाटते की त्याने सर्व प्रकारच्या संकटांवर मात करणारे उपाय शोधून काढले आहेत. मात्र हा त्याचा अहंकारच आहे म्हणायचा, अन्यथा अत्यंत पुढारलेले देश धरून सगळीकडे माणसे विविध प्रकारच्या संकटात बळी पडली नसती. याचा एकच अर्थ सगळ्यांनी लक्षात घ्यायला हवा की माणूस कितीही आधुनिक झाला तरी निसर्ग सर्वश्रेष्ठ आहे. निसर्गाने झोडपले आणि राजाने मारले तर तक्रार कोणाकडे करणार अशी जुनी म्हण आहे. आता राजा राहिला नाही, त्या जागी सरकारे आली, पण निसर्ग जसाच्या तसा आहेच ना?

संकटे तरी किती प्रकारची? हवामानबदल आहे, त्सुनामी आहे, भूकंप आहेत, पूर आणि वादळे आहेत, हिमनद्या आहेत, ढगफुटी आहे.

मुंबईकर २६ जुलै २००५ रोजी झालेली ढगफुटी कधी विसरणार नाहीत. त्या दिवशी मुंबईच्या उपनगरात बारा तासांत ९४३ मिलीमीटर एवढा प्रचंड पाऊस झाला. मुंबईतील घरे पक्की असल्याने घरे पडली नाहीत. मात्र रुळावर पाणी साठल्याने लोकल ट्रेन बंद पडल्या आणि रस्त्यावरून नदीसारखे पाणी वाहू लागल्याने रस्त्यावरची वाहतूकही कोलमडली. अशीच ढगफुटी ६ ऑगस्ट २०१० रोजी रात्री १२ वाजता लडाखमधील लेह आणि साबू या भागांत झाली. तेथे एका मिनिटात ४८.२६ मिलीमीटर पाऊस झाला. एका मिनिटातील हा एवढा पाऊस म्हणजे ताशी २८९५ मिलीमीटर अथवा ३ मीटर पाऊस झाला. लडाखमधील घरे मातीची असल्याने सर्व घरे या एक मिनिटाच्या पावसाने जमीनदोस्त झाली आणि रस्त्यावरून पाणी वाहून जाण्याऐवजी चिखल वाहत होता. रात्री १२ वाजता लोक गाढ झोपेत असल्याने जेमतेम जे घराबाहेर पडले ते चिखलात अडकले आणि घरात राहिले ते गाडले गेले.

एरवीचा पाऊस शॉवरमधून पाणी पडल्यासारखा असतो, तर ढगफुटीत तो डोक्यावर बादली ओतल्यासारखा बदाबदा पडतो. असे ढग जमिनीपासून पंधरा किलोमीटरच्या वर असतात. त्यांना क्युम्युलोनिम्बस म्हणतात. क्युम्युलस म्हणजे एकत्र आणणे आणि निम्बस म्हणजे ढग. अशी ढगफुटी पावसाळ्यात होते. गरम हवा आणि हवेतील आर्द्रता यामुळे ढगातील पाण्याचे प्रमाण वाढत जाते. या ढगात वेगाने हवेचा स्तंभ वरच्या दिशेने जात असतो. हा वारा पाण्याच्या थेंबांना वरवर घेऊन जातो. त्यामुळे पाण्याच्या थेंबांचा आकार वाढत जातो. तो ३.५ मिलीमीटर व्यासाएवढा प्रचंडही होऊ शकतो. वाऱ्यामुळे वरच्या उंचीवर वादळही निर्माण होऊ शकते. मग एखाद्या क्षणाला वर जाणारे हवेचे झोत एकदम थांबतात. हेच झोत तर त्या थेंबांना आधार देत असतात. पण, हे झोत थांबल्याने ढगांचा आधार सुटतो आणि मग ढग फुटल्यासारखा पाऊस पडतो, तेव्हा त्याला ढगफुटी म्हणतात. ढगफुटीत फार थोड्या वेळात थोडक्या प्रदेशावर प्रचंड पाऊस पडतो. अशा वेळी पडणाऱ्या पावसाचा वेग ताशी ८० ते १०० किलोमीटर एवढा प्रचंड असतो. हिमाचलप्रदेशात जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत अशा ढगफुटी नेहमीच होत राहतात. परंतु ६ ऑगस्ट २०१० रोजीची ढगफुटी प्रचंड होती.

त्सुनामी – त्सुनामी हा जपानी शब्द आहे. त्सु म्हणजे समुद्रकिनारा. नामी म्हणजे लाट. (उच्चार – सु-नाह-मी) आगगाडीचे डबे जसे एकामागे एक असतात तसे एकामागे एक येत जाणाऱ्या लाटा. यामुळे पाण्याची उलथापालथ होऊन पाणी उंच उसळते. भूकंप, जमिनीची उलथापालथ, ज्वालामुखी, बॉम्बस्फोट यामुळेही

त्सुनामी लाटा उठतात. भूकंप ८ रिश्टर स्केलपेक्षा जास्त असेल तर त्सुनामी उठतात. २६ डिसेंबर २००४ रोजी इंडोनेशियातील सुमात्रा येथे सकाळी ६ वाजून ३८ मिनिटांनी ८.९ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. हा भूकंप जमिनीखाली चाळीस किलोमीटर खोलीवर तर झालाच, पण या जमिनीच्या डोक्यावर हिंदी महासागर होता. त्यामुळे तेथील जमिनीचा सांधा उभ्या दिशेने हलला व त्यावर असलेला पाण्याचा स्तंभही हालला. त्यावेळी तो फक्त काही सेंटिमीटरने हलला आणि लाट उसळली. स्थिर असलेले पाणी विचलीत झाल्याने उसळलेली लाट पुढच्या पाण्याला लाटेच्या स्वरूपात गती देऊ लागली. अशा लाटांना त्सुनामी लाटा म्हणतात. हा भूकंप ८.९ रिश्टर स्केलचा असल्याने, १००० हायड्रोजन बॉम्बचा स्फोट झाल्यावर बसेल एवढा त्याचा धक्का होता. भरतीची लाट दर दहा सेकंदांनी उठते व ती १५० मीटर तरंगलांबीची असते. उलट त्सुनामी लाटांची तरंगलांबी १००-१०० किलोमीटर एवढी प्रचंड असते. शिवाय त्या दर सेकंदाला एक अशा उठू शकतात. या लाटा उथळ समुद्रातील लाटांप्रमाणे वागतात. उथळ समुद्रात लाटा जेव्हा उठतात तेव्हा लाटांची उंची आणि लांबी यांचा गुणाकार छोटा असतो. या लाटा प्रवेग (ॲक्सिलरेशन) आणि गुरुत्वाकर्षण यांच्या गुणाकाराचे वर्गमूळ काढले तर जी संख्या येईल त्या वेगाने वाहत जातात. या लाटा ताशी ७००-७५० किलोमीटरच्या वेगाने वाहतात. सुमात्रा ते भारताचा किनारा हे अंतर ३००० किलोमीटर असून तेथून निघालेल्या या लाटा भारतात चार तासांत येऊन पोहोचल्या. भौतिकशास्त्राच्या नियमाप्रमाणे हळूहळू या लाटांचा वेग कमी व्हायला हवा, पण त्सुनामी लाटा असा नियम पाळत नाहीत. १९६० साली दक्षिण अमेरिकेतल्या चिली येथे झालेल्या भूकंपामुळे उठलेल्या त्सुनामी लाटा १७००० किलोमीटरचे अंतर २४ तासांत पार करून जपानला पोहोचल्या होत्या, त्या ताशी ७०० किलोमीटरच्या वेगाने. १९५८ मध्ये अलास्का या अमेरिकेच्या वायव्येकडील भागात असलेल्या लिटू या उपसागरात उठलेल्या त्सुनामीची लाट विक्रमी उंचीची म्हणजे ५२४ मीटर होती. ५२४ मीटर म्हणजे १७५ मजली इमारतीच्या उंचीची अथवा कुतुबमिनारच्या सातपट उंचीची. त्सुनामी लाटांमुळे समुद्रकिनाऱ्यालगतची घरे, पूल, विजेचे खांब, झाडे यांचा समूळ नाश होतो. असा नाश होऊ नये म्हणून समुद्रकिनारी मॅनग्रोव्ह ऊर्फ तिवराच्या झाडांची लागवड करतात आणि किनाऱ्यापासून ५०० मीटरच्या अंतरात बांधकामे करू देत नाहीत. यालाच कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) म्हणतात.

वादळे - वादळे ऊर्फ टोर्नाडो ही अमेरिकेच्या मध्यभागाची खासियत आहे. याला मराटीत चक्रावर्त म्हणायचे. भन्नाट वेगाने भिरभिरणाऱ्या आणि आकाश पाताळ अक्षरश: जोडून टाकणाऱ्या चक्रावर्तात अख्खी इमारत भिरकावून देण्याची ताकद असते. अमेरिकेत असा चक्रावर्त येऊ घातल्यावर भोंगा वाजवून लोकांना सावध केले जाते. मग लोकांनी घरातल्या मध्यवर्ती भागाकडे अथवा तळघराकडे किंवा टेबलाखाली जायचे, शाळेतल्या विद्यार्थ्यांनी सभागृहाकडे जायचे असे प्रशिक्षण दिले जाते. सिंगापुरात सहसा चक्रावर्त येत नाही, कारण त्यासाठी लागणारी अतिशय कोरडी हवा तेथे कधीच नसते. जमिनीला चिकटून असलेली अतिशय कोरडी हवा वेगाने तापली की वरवर जाण्यासाठी धडपडू लागते. वरचा हवेचा थर त्यामानाने थंड असतो. त्या दोन थरांची भेट झाली की त्यातून मुसंडी मारून वाट काढण्यासाठी धडपडणारा गरम हवेचा स्रोत भिरभिरू लागतो. तिला थंड हवेतून वरची वाट धरणे सोपे जाते. ती वाट मिळाली की मग हे भिरभिरे वरवर चढत जाते. तेथल्या हवेचा दाब एकदम खालावलेला असला की तेथून खाली लोंबकळणाऱ्या ढगांशी हातमिळवणी करत तो हवेचा भोवरा वेगाने पुढे पुढे सरकू लागतो. त्या भोवऱ्यातल्या वाऱ्याचा वेग ताशी २५० ते ३०० किलोमीटर इतकाही असू शकतो. सरकण्याचा वेग तितका नसला तरी तुफान या विशेषणाला साजेसा तो नक्की असू शकतो.

अशाच चक्रावर्तातील एक प्रकार म्हणजे जलशुंड. जलशुंड हा पाण्यावरचा चक्रावर्त. मात्र तो बऱ्याच बाबतीत वेगळा असतो. हवेत मोठ्या प्रमाणात दमटपणा असल्याशिवाय जलशुंडाची निर्मिती होत नाही. जमिनीच्या मानाने तसे पाणी लवकर तापत नाही. शिवाय समुद्राचे पाणी फार खोल असल्याने त्याची उष्णता शोषून घेण्याची क्षमता जास्त असते. तरीही चक्रावर्ताच्या निर्मितीसाठी पोषक ठरणारे वातावरणातले बदलच जलशुंडाला जन्म देतात. येथे वरवर चढणाऱ्या गरम हवेच्या झोतात भरपूर प्रमाणात बाष्प असते. वरच्या




**भूकंप आणि भूस्खलन**

कमी दाबाच्या प्रदेशाकडे तो झोत ओढला गेला की तेथल्या थंड हवेच्या प्रभावात वाफेच्या रूपात असलेले ते बाष्प येते. परिणामी, परत त्याचे द्रवाच्या थेंबात रूपांतर होते. हे तरंगणारे पाण्याचे थेंब एकत्र येत त्यांचा एक स्तंभच तयार होतो. समुद्राच्या पाण्याच्या पृष्ठभागापासून तो गरम हवेचा थर वर चढत गेल्यामुळे, समुद्राचे पाणी वर खेचले जाते, असा भास निर्माण होतो.

पुण्याच्या सृष्टिज्ञान मासिकात १९७५ च्या सुमारास त्यावेळचे पुणे विद्यापीठातील भौतिक शास्त्रविभाग प्रमुख प्रा. मो.वा. चिपळोणकार यांनी जलशुंडावर एक लेख लिहिला होता. त्यात त्यांनी म्हटले होते की कोलकात्यातील काम आटोपून ते डमडम विमानतळावर विमानाची वाट पाहत असताना त्यांना समुद्राच्या पाण्यावर एक ढग हत्तीच्या सोंडेचा आकार घेऊन पाण्याच्या पृष्ठभागापर्यंत खाली आलेला दिसला आणि काही वेळाने तो वर उचलला जाऊन आकाशात गेला. नंतर विमानतळापासून शंभर किलोमीटरवरच्या एका गावात पडलेल्या पावसाच्या पाण्यात माशांचा प्रचंड वर्षाव झाला. याचा अर्थ त्या सोंडेने पाणी आणि त्याबरोबर पाण्यातले मासे ओढून घेतले व त्याचा वर्षाव अन्यत्र झाला होता.

हिमनद्या – दक्षिण ध्रुवावर एक भूखंड असून त्यावर एक कायम स्वरूपी हिमटोप आहे. उत्तरध्रुवावरचा बर्फ हा उथळ समुद्र आहे. फक्त त्या समुद्राचा वरचा भाग वर्षभर गोठलेल्या पाण्याच्या स्वरूपात असतो. यामुळेच उत्तरध्रुवीय प्रदेशात आढळणारी एक गोष्ट दक्षिणध्रुवीय प्रदेशात वेगळ्या स्वरूपात मिळते, ती म्हणजे हिमनद्या. यालाच इंग्रजीत ग्लेशियर्स म्हणतात.

पाण्याचे बर्फ होते तेव्हा स्थित्यंतर झाले. बर्फ घन असला तरी तो आकार्य म्हणजे प्लास्टिक असतो. आणि दाबाखाली असलेला बर्फ वाहू लागतो. हे वाहणे गतिमान नसते तर ते उताराच्या दिशेने पसरणे या स्वरूपातील मंदगती वाहणे असते. वरच्या बर्फाचे वजन आणि गुरुत्वाकर्षण यांचा सुटासुटा किंवा एकत्रित जोर बर्फास हळूहळू प्रवाही बनवतो. वरच्या बर्फासकट हे खालचे बर्फ उतारावर हळूहळू घसरू लागते तेव्हा या मंदगती प्रवाहास हिमनदी असे म्हणतात. उत्तरध्रुवीय प्रदेशात ग्रीनलंड किंवा अलास्का यांचा बराच भाग हा उत्तरधृवीय वर्तुळात येतो आणि येथल्या पर्वतांवरून हिमनद्या वाहतात. यातल्या बऱ्याच हिमनद्यांचे पुढे पाण्याच्या प्रवाहात म्हणजे नद्यात रूपांतर होत असते. काही ठिकाणी मात्र या हिमनद्या सरळ सागरापर्यंत पोहोचतात आणि मग त्यांचे तुकडे प्रचंड गर्जना करत सागरात कोसळतात. ते पाण्यावर आपटूनही खूप मोठा आवाज होतो. हिमनद्यांचा आकार खूप वेडावाकडा असतो. त्या अतिशय अस्थिर असतात. त्यांचा ९/१० भाग पाण्यात बुडालेला असतो. तो पाण्याशी घर्षण झाल्यावर वितळतो. मग या हिमनद्यांचे बूड हलके तर शीर जड होऊन त्या कलंडतात.

तापमान बदल – १९४७ साली भारताची लोकसंख्या ३५ कोटी होती, ती आता २०२१ साली १३० कोटी आहे. म्हणजे गेल्या ७४ वर्षात लोकसंख्या चौपट झाली. हीच गती जगाची लोकसंख्या वाढण्यात झाली आहे. त्यामुळे आहे त्याच जमिनीवर मानवाला आहे तेवढ्याच पावसाच्या पाण्यावर आपली गुजराण करावी लागत आहे. पूर्वी शेतीतून मिळणारा कापूस कपडे बनवण्यासाठी पुरा पडत होता. जमिनीखाली मिळणारी खनिजे मानवाच्या गरजा भागवण्यासाठी पुऱ्या पडत. परंतु लोकसंख्या वाढू लागली तसतशी यांची चणचण भासू लागली आणि शास्त्रज्ञांनी एकेक शोध लावायला सुरुवात केली. त्यातून नायलॉन, टेरिलीन, प्लास्टिक या व इतर अशा कित्येक वस्तू शोधल्या ज्या पुढे कारखान्यात बनू लागल्या. कारखान्यांसाठी वीज लागू लागल्याने कोळसा अधिक प्रमाणावर जाळला जाऊ लागला. अशा पद्धतीने हवाप्रदूषण, पाणीप्रदूषण, ध्वनिप्रदूषण वाढत जाऊन त्याने हळूहळू पर्यावरण बिघडले. वातावरणातील गरम हवेमुळे मग अन्न टिकवण्यासाठी रेफ्रिजरेटी लागू लागले आणि वातानुकूलन लागू लागल्याने वातावरणात वाढलेल्या क्लोरोफ्लुरोकार्बनने ओझोन थराला भोक पडले. वाढलेल्या तापमानाने हिमनग वितळू लागले. वादळे वाढली, वणवे लागू लागले, पाऊसमान बिघडले. मानवी वस्तीच्या गरजा वाढू लागल्या तशी जंगले कमी कमी होऊ लागली. त्यामुळे त्याचा परिणाम पुन्हा तापमानवाढ आणि पाऊसमानावर झाला. वाढत्या तापमानामुळे समुद्राचे पाणी किनारे सोडून जवळच्या जमिनीवर पसरू लागते. त्यामुळे समुद्रालगतची जगभरची शहरे आणि गावे धोक्यात येणार आहेत.

अशा या निसर्गसंकटांना मानवाला तोंड देत राहावे लागणार आहे. कारण कितीही नियंत्रणे आणली तरी लोकसंख्या वाढत राहणार, छानछोकी वाढत गेल्याने वस्तूंच्या गरजा वाढत जाणार, त्यासाठी कारखाने चालू राहणार आणि पर्यावरणाचा तोल अधिकाधिक बिघडत जाणार, ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

संदर्भ

१) हाच तो प्रलय का? – लेखक – अ.पां. देशपांडे, मराठी विज्ञान परिषद पत्रिका, फेब्रुवारी, २००५, पृष्ठे क्र. ४ ते ८

२) लेहची ढगफुटी – लेखक – अ.पां.देशपांडे, मराठी विज्ञान परिषद पत्रिका, सप्टेंबर, २०१०, पृष्ठे ११–१२

३) जलशुंड – लेखक – डॉ. बाळ फोंडके, मराठी विज्ञान परिषद पत्रिका, ऑगस्ट, २००७, पृष्ठे ४ ते ६

४) अंटार्क्टिका – लेखक – निरंजन घाटे, प्रकाशक – दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे ४११ ०३०, पृष्ठे ५७–५८

**– अ.पां. देशपांडे**

भ्रमणध्वनी : ९९६७८४१२९६

apd1942@gmail.com



# द स्ट्रेंज केस ऑफ डॉ. जेकील ॲण्ड मिस्टर हाईड - रॉबर्ट लुई स्टीव्हनसन

**(The Strange case of Dr. Jekyll and Mr. Hyde By Robert Louis Stevenson)**

**राजीव श्रीखंडे**


**रॉ**बर्ट लुई स्टीव्हनसन हा जगप्रसिद्ध स्कॉटिश लेखक! त्याचा जन्म १८५० मध्ये एडिंबरा शहरात झाला. त्याचे सगळे शिक्षण तिथेच झाले. एडिंबरा युनिव्हर्सिटीमधून बाहेर पडल्यानंतर तो लंडनला गेला. वाचन-लेखनाच्या आवडीमुळे लंडनमध्ये त्याची वाङ्‌मयीन वर्तुळात ऊठबस सुरू झाली आणि अँड्र्यू लँग, एडमंड गॉस, लेस्ली स्टीफन आणि डब्ल्यू इ. हेन्ले अशा दिग्गजांकडून त्याला उत्तम उत्तेजन मिळत गेले. दम्याच्या आणि इतर विकारांमुळे त्याची प्रकृती लहानपणापासून तोळामासाच होती. प्रकृतीची साथ नसतानादेखील स्टीव्हनसनने आयुष्यात खूप प्रवास केला आणि भरपूर लेखनही केले. प्रकृतीला हवामानबदल आवश्यक आहे म्हणून १८९० साली तो साऊथ सीमधील (पॅसिफिक महासागर) हवाईपलीकडील सॅमोआ बेटावर आपल्या पत्नीसह कायमचा राहायला गेला. तेथेच त्याचा १८९४ साली मृत्यू झाला. सॅमोआमधल्या लोकांचे या जगप्रसिद्ध लेखकावर खूप प्रेम होते. स्टीव्हनसनच्या थडग्यावर ज्या ओळी लिहिलेल्या आहेत त्या ओळींचे सॅमोअन लोकांनी आपल्या भाषेत एक शोकगीत तयार केले आहे.


अवघ्या ४४ वर्षांच्या आयुष्यात स्टीव्हनसनने कायम स्मरणात राहतील अशी काही पुस्तके जगाला दिलेली आहेत. Treasure Island (लाँग जॉन सिल्व्हरला कोण विसरू शकतो? लहानपणी आईबरोबर वाचलेली ही १८८३ साली प्रसिद्ध झालेली कादंबरी इतक्या वर्षांनंतरही माझ्या पक्की लक्षात आहे), Kidnapped, The Black Arrow या कादंबऱ्यांनी स्टीव्हनसनला आयुष्यात भरपूर प्रसिद्धी मिळवून दिली आणि यश दिले, पण ज्या नव्वद पानी लघु कादंबरीने त्याला एका अत्युच्च पातळीवर नेऊन ठेवले ती म्हणजे The Strange Case of Dr. Jekyll and Mr. Hyde! या कादंबरीचे नाव इतके चर्चेत आहे की अजूनही दुहेरी व्यक्तिमत्त्वाबद्दल बोलताना सगळे जग या कादंबरीचाच संदर्भ देते.

स्टीव्हनसन प्रकृतीच्या कारणास्तव सॅमोआ बेटावर कायमचे वास्तव्य करण्यास गेला खरा, पण साऊथ सी बेटामध्ये अमेरिका आणि ब्रिटनचे वाढत जाणारे वसाहतीकरणाचे धोरण त्याला फार अस्वस्थ करत होते. बऱ्याच जाणकारांच्या मते याच बाबींचा त्याच्या लेखनावर परिणाम झाला असावा आणि म्हणूनच प्रारंभी साहसकथा आणि अद्‌भुतरम्य कथा अतिशय उत्साहाने लिहिणारा स्टीव्हनसन पुढे मात्र विदारक वास्तववादाकडे (Dark Realism) झुकलेला आपल्याला दिसतो.

त्याच्या हयातीत स्टीव्हनसन अतिशय लोकप्रिय होता आणि त्याच्या लेखनाचे बरेच मान्यवर चाहते होते. तरीही विसाव्या शतकाच्या सुरुवातीला बऱ्याच लेखकांनी त्याला अडगळीत टाकायचा प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही आणि आज जगातल्या सर्वोत्तम लेखकांमध्ये त्याची गणना केली जाते. टीकाकारांची मते काहीही असोत, पण स्टीव्हनसनची लोकप्रियता आजही कमी झालेली नाही. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तर टीकाकारांनी त्याचे नाव जोसेफ कॉन्रॅड आणि हेन्री जेम्स यांसारख्या मातब्बर लेखकांच्या श्रेणीत जोडून या लेखकांवर स्टीव्हनसनचा कसा प्रभाव आहे हेही नमूद केलेले आहे. २०१८ साली झालेल्या एका पाहणीनुसार स्टीव्हनसन हा जगातील २६ व्या क्रमांकाचा भाषांतरित झालेला लेखक आहे. यावरूनच त्याच्या लेखनाची महती आपल्याला कळते.

त्याची The Strange Case of Dr. Jekyll and Mr. Hyde ही लघुकादंबरी (Novella) प्रसिद्ध झाली जानेवारी १८८६ साली. (तिचे नारायण धारप यांनी मराठीत 'द्वैत' या नावाने भाषांतर केलेले आहे.) लंडनमधल्या डॉ. जेकील या एका प्रतिष्ठित डॉक्टरची ही कथा आहे. कथानक फार उलगडून सांगितले तर रसभंग होईल, म्हणून मी फक्त रूपरेषाच सांगतो. डॉ. जेकीलचा मित्र गॅब्रिअल जॉन उटरसन हे या लघुकादंबरीतले खरे तर प्रमुख व्यक्तिमत्त्व. तो एक वकील आहे. एकदा अपरात्री आपल्या एका लांबच्या भावाबरोबर घरी परतताना तो एक विलक्षण प्रसंग बघतो. ते चालत असताना त्यांच्यापासून काही अंतरावर एक छोटी मुलगी आणि एक माणूस यांची टक्कर होते आणि ती मुलगी खाली पडते. हा माणूस बिनदिक्कत त्या छोटीला पायदळी तुडवून पुढे






रॉबर्ट लुईस स्टीव्हनसन

चालायला लागतो. त्या मुलीच्या किंकाळ्या आणि रडणे ऐकून अशा रात्रीदेखील त्या मुलीच्या कुटुंबासह काही माणसे तेथे जमतात. नशिबाने त्या मुलीला प्राणांतिक अशी दुखापत झालेली नसते. उटरसन संतापून त्या माणसाला अडवतो आणि छोटीच्या कुटुंबीयांशी सल्लामसलत करून त्या माणसाकडे शंभर पौंडांची भरपाई मागतो. ज्या ठिकाणी ही घटना होते तिथे जवळच एका घराचे जुनाट दिसणारे मागील दार असते. हा माणूस ही मागणी चटकन मान्य करतो, परवानगी घेऊन त्या दारातून आत जातो आणि थोड्याच वेळात शंभर पौंडांचा चेक घेऊन येतो. त्या चेकवर आपल्या मित्राची म्हणजेच डॉ. जेकीलची सही बघून उटरसन चक्रावतो आणि यात त्याला काहीतरी काळेबेरे असल्याचा संशय येतो. त्यातच त्या माणसाबद्दल त्याच्या मनात घृणा निर्माण झालेली असते आणि ती या सगळ्या प्रकरणात वाढत जाते. परंतु उटरसनला असे का ते कळत नाही, कारण त्या माणसाच्या बाह्यरूपात आक्षेपार्ह असे काहीच नसते. ही फक्त त्याच्या त्या कृत्याबद्दल वाटणारी घृणा नसते, ती असते त्या माणसामध्ये काहीतरी विचित्र आहे अशा विनाकारण वाटणाऱ्या जाणिवेमुळे! हा चेक दुसऱ्या दिवशी बँकेत विनासायास वटला जातो. आपल्या मित्राला म्हणजे डॉ. जेकीलला हा माणूस ब्लॅकमेल करतो आहे की काय अशी शंका उटरसनला भेडसावू लागते, म्हणून तो हा विषय जेकीलकडे काढतो. तेव्हा जेकील तसे काही नसल्याचे सांगतो आणि वर असेही म्हणतो, की तो त्या माणसाचा केव्हाही बंदोबस्त करायला समर्थ आहे. या माणसाचे नाव असते हाईड. हा विषय मग तेवढ्यावरच थांबतो.

पुढे काही महिन्यांनी समाजात प्रतिष्ठित असलेल्या उटरसनच्या एका अशिलाचा अतिशय निर्घृण पद्धतीने खून होतो, आणि या खुनाची साक्षीदार असलेली नोकर आपल्या जबानीत खुन्याचे जे वर्णन करते ते हाईडशी जुळणारे असते. उटरसन जेकीलला गाठून हाईडविषयी विचारतो तेव्हा त्याला उडवाउडवीची उत्तरे मिळतात. दुसरीकडे पोलिसही त्याचा शोध घ्यायला आपली सर्व शक्ती एकवटतात. हाईड तर फरारच झालेला असतो. त्यानंतर पुढे काय होते, हा हाईड कोण असतो, त्याचा आणि डॉ. जेकीलचा काय संबंध असतो, तो खून का करतो, याची सगळी उत्तरे या लघुकादंबरीत मिळतात.

जगभर ही लघुकादंबरी पुष्कळच प्रसिद्ध असल्याने तिच्या कथानकाचा मूळ गाभा बऱ्याच लोकांना माहीत आहे. मानवी मन आणि त्यातल्या दुष्ट आणि सुष्ट शक्तींचा झगडा हाच कथानकाचा मूळ विषय आहे. एखाद्या स्विस घड्याळ्यातली यंत्रे जितक्या कुशलतेने एकमेकांशी जोडलेली असतात, त्याच कुशलपणे हे कथानक विणले गेलेले आहे. एखाद्या कोर्टात खटला चालताना ज्याप्रमाणे वेगवेगळ्या साक्षीदारांच्या जबानीतून नक्की काय घडले हे उलगडत जाते, त्याचप्रमाणे वेगवेगळ्या लोकांच्या अनुभवांतून डॉ. जेकीलची ही भयावह कथा आपल्यासमोर उलगडत जाते. स्टीव्हनसनचं लघुकादंबरी बांधण्याचे कौशल्य ती वाचताना आपल्याला पदोपदी जाणवत राहते.

हेन्री जेम्स या जगप्रसिद्ध अमेरिकन लेखकाने असे म्हटले आहे, की ही लघुकादंबरी म्हणजे a master-piece of concision (आदर्श संक्षेपण)! मोजक्या शब्दांत फार मोठे सांगण्याची किमया ही लघुकादंबरी विनासायास साधते. स्टीव्हनसन एकही अनावश्यक शब्द वापरत नाही किंवा मूळ कथानकापासून कधी भरकटत नाही. थोडक्या शब्दांत उभ्या केलेल्या व्यक्तिरेखाही जिवंत वाटतात. हे कथानक घडत असताना काहीतरी गूढ, अगम्य, काहीसे भयावह, अस्वस्थ करणारे असे कुठेतरी आसपासच आहे ही जाणीव सतत आपल्या मनात राहते. जे पटकन शब्दात मांडता येत नाही, ते मोजक्याच शब्दांत अतिशय परिणामकारकरीत्या उभे करायला किती ताकदीचा लेखक लागतो हे वेगळे सांगायची गरज नाही. कथानकाला नुसताच वेग नाही तर त्याला जबरदस्त प्रभावी कथनशैली देखील आहे. स्टीव्हनसनचे सगळे यश यातच सामावलेले आहे.

लक्षात घेण्यासारखी एक गोष्ट म्हणजे या लघुकादंबरीच्या प्रकाशनानंतर सुमारे पंधरा-वीस वर्षांनी सिग्मंड फ्रॉईड या विश्वविख्यात मानसशास्त्रज्ञाचे मानसशास्त्रात क्रांती घडवणारे लेख प्रसिद्ध होऊ लागले आणि त्यात त्याने जे विषय मांडायला सुरुवात केली, म्हणजेच जागृत (conscious) आणि सुप्त (subconscious) मन, ego, super ego and id आणि यांचा एकमेकांशी असलेला संबंध- हेच सगळे विषय एका अर्थी स्टीव्हनसनने आपल्या या लघुकादंबरीत प्रभावीपणे हाताळलेले आपल्याला दिसतात आणि मग स्टीव्हनसनच्या द्रष्टेपणाविषयी आश्चर्ययुक्त आदर वाटतो.

या लघुकादंबरीचे वर्गीकरण कसे आणि काय करावे हाही एक मोठा प्रश्नच आहे. याला रहस्यकथा म्हणता येईल, किंवा गॉथिक (Gothic) कथा असेही म्हणता येईल. बरेच मान्यवर तिला भयकथा समजतात. (स्टीफन किंग या आजच्या युगातल्या सर्वश्रेष्ठ भयकथा लेखकाच्या मते गेल्या शतकातल्या सर्वोत्कृष्ट तीन भयकथा / कादंबऱ्यांपैकी ही एक आहे). मानसशास्त्रीय कथाही म्हणू शकतो, नीतीकथा किंवा रूपककथाही म्हणू शकतो. (काही जाणकारांच्या मते स्टीव्हनसन ज्या समाजात राहत होता

त्या व्हिक्टोरियन समाजाच्या दांभिकपणावर या लघुकादंबरीने अतिशय जहाल अशी टीका केलेली आहे.) पण, खरे सांगू का, कुठल्याही अशा संकुचित वर्गवारीत न बसणारी, या सगळ्याच्या पलीकडे जाणारी, मानवी मनाचा तळ गाठून त्याच्या वेगवेगळ्या विकारांचा माणसांच्या वागण्यावर, व्यक्तिमत्त्वावर आणि अखेर त्याच्या मनावरच होणारा परिणाम याचा शोध घेणारी ही एक अत्यंत श्रेष्ठ कलाकृती आहे.

या लघुकादंबरीच्या जन्माची एक विलक्षण कथा सांगितली जाते. स्टीव्हनसनच्याच पुतण्याने ही सांगितलेली आहे. एके दिवशी पहाटे स्टीव्हनसन किंचाळतच झोपेतून उठला. सगळे कुटुंबीय घाबरून चौकशी करायला गेले तेव्हा स्टीव्हनसनने त्यांना एवढेच सांगितलं की त्याला एक अत्यंत वाईट, भीतिदायक स्वप्न पडले होते. लगेचच तो लिखाणाला बसला आणि तीन दिवसांत तहानभूक विसरून, झपाटल्यासारखे लिहून त्याने या लघुकादंबरीचा मसुदा तयार केला. तो मसुदा वाचून त्याची पत्नी इतकी घाबरली की तिने त्याला तो जाळून खाक करण्यास भाग पाडले. मग थोड्या दिवसांनी स्टीव्हनसनने परत लेखनाला सुरुवात केली आणि थोडक्या वेळातच नवीन मसुदा बनवला. पहिल्यापेक्षा तो बराच सौम्य असल्यामुळे त्याला पत्नीने आडकाठी केली नाही आणि याच मसुद्यावर थोडे पुढे काम करून त्याने ही लघुकादंबरी पूर्ण करून प्रकाशकांकडे प्रसिद्धीसाठी पाठवून दिली. म्हणजे लक्षात ठेवा की आपण जी लघुकादंबरी वाचतो ती तिच्या मूळ स्वरूपापेक्षा अतिशय सौम्य असलेली अशी आहे. म्हणजे मूळ स्वरूप काय असेल याचा विचार न केलेला बरा!

प्रसिद्ध होताचक्षणी प्रचंड यश आणि लोकप्रियता लाभलेली ही कादंबरी! ती प्रसिद्ध होऊन आज १३५ वर्षे उलटून गेली असली तरी ती नेहमीच प्रकाशात राहिलेली आहे. तिच्या आवृत्त्या सतत निघत आहेत आणि तिची लोकप्रियता अजूनही तेवढीच टिकून आहे. तिच्यावर असंख्य चित्रपट निघाले (हॉलिवूडमध्येदेखील). बरीच नाटके लिहिली गेली. बऱ्याच संक्षिप्त आवृत्त्या निघाल्या आहेत, बरीच नभोवाणी नाटके झाली, तिच्यावर बऱ्याच टीव्हीमालिका लिहिल्या गेल्या, गाणी रचली गेली, इतर बऱ्याच लेखकांनी या लघुकादंबरीचा पुढचा भाग म्हणून बऱ्याच कथा/कादंबऱ्या लिहिल्या, या कादंबरीवर कॉमिक्स निघाली, कार्टून चित्रपट निघाले- काही विचारू नका. या लघुकादंबरीचे एका Cult Classic मध्ये रूपांतर झालेले आहे.

स्टीव्हनसनची ही छोटेखानी कादंबरी जागतिक वाङ्मयात क्लासिक म्हणून मान्यता पावलेली आहे. (क्लासिक म्हणजे काय यावर बऱ्याच मान्यवरांनी बरेच लिहिले आहे, अगदी मार्क ट्वेनपासून टी.एस. इलियट आणि इटालो काल्व्हिनोपर्यंत). माझ्या मते क्लासिक म्हणजे काल प्रवाहात तेवढ्याच ताकदीने टिकून राहणारी कलाकृती; जिच्यावर काळाच्या चढउतारांचा फारसा परिणाम होत नाही, तिची योग्यता कमी होत नाही. जी कालातीत आहे. स्टीव्हनसनची ही लघुकादंबरी या निकषावर पूर्णपणे उतरते हे मान्य करावेच लागेल.

एक नमूद करावेसे वाटते की क्लासिक पुस्तकांचे वाचन फक्त विरंगुळ्यासाठी होऊ शकत नाही. त्यासाठी आपण वेगळी मनोवृत्ती धारण करणे आवश्यक आहे, जाणिवा जरा प्रकर्षाने केंद्रित करायची गरज आहे, तरच मग या क्लासिक कलाकृतींचा पूर्ण रसास्वाद घेणे आपल्याला शक्य होते, त्यांच्या वाचनाचा खरा आनंद आपल्याला मिळू शकतो.

ही लघुकादंबरी वाचून झाल्यावर मानवाची मूळ प्रवृत्ती ही वाईटाकडेच झुकणारी आहे की काय असा अस्वस्थ विचार मनात येऊन जातो आणि मग अगणित लढाया, युद्धे, अपरिमित जुलूम, असामान्य क्रौर्य, अनिर्बंध हिंसा आणि रक्तपात यांनी भरलेला मानवाचा आतापर्यंतचा इतिहास पाहिला की स्टीव्हनसनचे म्हणणे योग्यच नाही का आणि तो या कादंबरीद्वारा संपूर्ण मानवजातीलाच एकप्रकारे धोक्याचा आणि सावधानतेचा इशारा देत नाही ना, अशी भावना निर्माण होणे अतिशय स्वाभाविक आहे. अर्थात उत्क्रांतीच्या प्रवासात नित्शेने किंवा अरविंद घोषांनी म्हटल्याप्रमाणे महामानव (Superman) ही काही नुसतीच कल्पना नाही, याचा विचार केल्यास सत्प्रवृत्ती आणि दुष्प्रवृत्ती यात कोण कोणावर मात करणार हे भविष्यकाळच ठरवेल, नाही का?

प्रत्येक वाचकाने एकदा तरी आवर्जून वाचावी (कदाचित बऱ्याच वाचकांना परत वाचण्याचे धारिष्ट्य होणार नाही!) अशी ही एक जबरदस्त कलाकृती, रॉबर्ट लुई स्टीव्हनसनच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेली. वादातीत क्लासिक!



**– राजीव श्रीखंडे**

भ्रमणध्वनी : +९१ ९८२१०१७४६२

rshrikhande@yahoo.com



**॥ग्रंथाली॥**




**व्हिस्कीत बर्फ वितळावा**

**सदानंद डबीर**

**गजल-काव्यसंग्रह**

**मूल्य १२५ रु.**

**सवलतीत ७५ रु.**



# विवेक सावंत यांची हाक ज्ञाननिष्ठ समाजासाठी!


**दिनकर गांगल**

**वि**वेक सावंत यांना पाच लाख रुपयांचा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार मिळाला ही महाराष्ट्राच्या सध्याच्या सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्या संदिग्ध काळात विलक्षण आनंदाची गोष्ट होय. तो समारंभ कोरोना परिस्थितीत आटोपशीर झाला, परंतु त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सावंत हे नेमस्त, संकोची व संयमी स्वभावाचे; पण तेवढाच आत्मविश्वास व कार्यावर पक्की श्रद्धा असलेले. सावंत यांनी त्या पुरस्कार समारंभात सत्काराला उत्तर देताना सांगितले, की ते तो पुरस्कार त्यांच्या गेल्या वीस वर्षांतील पन्नास हजार सहकाऱ्यांच्या एक लक्ष हातांनी स्वीकारत आहेत!... आणि त्यांनी पुरस्काराची पाच लाख रुपयांची रक्कम तेथल्या तेथे 'एमकेसीएल नॉलेज फाऊंडेशन'ला देणगी म्हणून देऊन टाकली आहे. फाऊंडेशनतर्फे नानाविध शैक्षणिक व सामाजिक ज्ञानाधिष्ठित उपक्रम चालू असतात. फाऊंडेशन तसे काम करणाऱ्या अन्य संस्थांनाही अर्थसाहाय्य देत असते. पन्नास हजार सहकारी ही संख्या 'एमकेसीएल'च्या महाराष्ट्रभर पसरलेल्या पाच हजार प्रशिक्षणकेंद्रांमध्ये गेली वीस वर्षे काम करणाऱ्या आजी-माजी सहकाऱ्यांची आहे. सावंत म्हणाले, ते खरेच आहे. ती केंद्रे म्हणजे 'एमकेसीएल'चे महाराष्ट्रभर पसरलेले बाहूच आहेत. त्यांनी अवघा महाराष्ट्र संगणकप्रशिक्षित करण्याचे कार्य गेली वीस वर्षे चालवले आहे. राज्याच्या कोणत्याही तालुक्यात जा, 'एमकेसीएल' हे संस्थेचे नाव आणि 'एमएससीआयटी' या त्यांच्या अभ्यासक्रमाची उद्घोषणा पाहण्या-वाचण्या-ऐकण्यास मिळेल आणि तेथे त्यांचे संगणकप्रशिक्षण देणारे एक केंद्र असेल. विवेक यांनी जनतेला संगणकसाक्षर करण्याचा असा ध्यास आयुष्यभर घेतला आहे आणि त्याचेच श्रेय त्यांना यशवंतराव चव्हाण पुरस्काराच्या रूपाने मिळाले आहे. त्या समारंभात शरद पवार म्हणाले तेही खरे आहे, की साठ वर्षांपूर्वी साक्षरता-निरक्षरता हे शब्द अक्षरलेखन-वाचन यांवरून प्रसृत झाले आणि समाज साक्षर करणे हे प्रत्येक शासनाचे ध्येय ठरले. पण काळ पालटून गेला. संगणकाची नवी भाषा आली. ती साक्षरता महत्त्वाची झाली आणि ती महाराष्ट्रभर नेण्याचे कार्य या एका माणसाने निष्ठेने व जिद्दीने केले

विवेक सावंत यांच्या बुद्धिकल्पकतेला ज्या माणसांनी तिच्या बीजरूपात खतपाणी घातले त्यांतील स्वत: शरद पवार, दिलीप वळसे-पाटील, अणुशास्त्रज्ञ अनिल काकोडकर हे तेथे, समारंभात हजर होते आणि विजय भटकर व शिक्षणतज्ज्ञ राम ताकवले यांच्या शुभेच्छा घेऊनच सावंत समारंभस्थळी पोचले होते. सावंत यांनी ज्येष्ठ सनदी अधिकारी कै. श्रीमती कुमुद बन्सल यांच्याकडून मिळालेल्या प्रशासकीय सहकार्याचे स्मरण समारंभात आवर्जून केले. या सहा ज्येष्ठांची साथ हे विवेक यांचे मोठेच भांडवल ठरले आहे. विवेक यांनी त्यांचे सद्गुण व सद्भाव यांच्या जिवावर ते भांडवल कमावले आहे. संगणकज्ञान राष्ट्रीय पातळीवर प्रमुख अजेंड्यावर आणण्याचे कार्य राजीव गांधी व सॅम पित्रोदा यांनी केले, ती त्यांची मोठी कामगिरी मानली जाते. तेच संगणकज्ञान राज्यपातळीवर रुजवण्याचे कार्य या मंडळींनी केले आणि विवेक सावंत हे त्यांच्या कार्याचा मेंदू व कणा, दोन्ही ठरले आहेत. लाखो मराठी तरुण देशपरदेशांत संगणकीय नोकऱ्या करत आहेत. त्यांचे एकमेव परात्पर गुरू विवेक सावंत हे आहेत. त्यांनी सॉफ्टवेअर इंजिनीयरिंगचे शिक्षण पंचवीस हजार तरुणांना 'सी डॅक'च्या माध्यमातून तर प्रत्यक्षच दिले आणि नंतर लाखो लोकांना संगणकाच्या 'गमभन'ची ओळख 'एमकेसीएल'च्या माध्यमातून करून दिली. विवेक सावंत यांनी ते कार्य ज्या बुद्धिकौशल्याने साधले आहे त्याची कथा ऐतिहासिक पराक्रमाची वा पुराणातील चमत्काराची वाटेल अशीच आहे. परंतु इतिहासातील रोमांच आणि पुराणातील अंधता यांमध्येच दिव्यत्व शोधणारा मराठी समाज वर्तमानातील विवेक यांच्यासारख्यांचे विक्रम काय, कसा अन् कधी जाणणार?

विवेक सावंत यांची ती कथा गेल्या पन्नास वर्षांतील संस्कारशील व ज्ञानोत्सुक व्यक्तीची आहे. म्हणून त्यांच्या संस्थेचे नाव महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) असे समर्पक आहे. त्यांचा जन्म २६ ऑक्टोबर १९५८ रोजीचा. त्यांच्या आईचे वडील शंकर दाजीबा मोरे हे हर्णे-मुरुडचे. ते कलावंत-शिल्पकार होते.

त्यांची महत्ता कळण्यासाठी उदाहरण सांगायचे तर त्यांनी बनवलेला लोकमान्य टिळक यांचा पुतळा पुण्याच्या त्यांच्या नावाच्या स्मारक मंदिरात आहे आणि त्यांनी रेखलेली 'हे राम' ही शिल्पाक्षरे दिल्लीच्या राजघाट येथील गांधी समाधीचे गांभीर्य व पावित्र्य जपत आहेत. विवेक यांच्या वडिलांचे वडील, लक्ष्मण हरी सावंत ऊर्फ भाऊ हेही कोकणातील, तेही सखोल विचारी आणि मोठे कर्तबगार गृहस्थ होते. ते नाशिकमध्ये स्थायिक झाले. त्यांनी स्वातंत्र्यआंदोलनात भाग घेतला, खादीचे कपडे वापरले. त्यांच्या जीवनावर गांधीजींचा प्रभाव. त्यांना देशातील पहिला आदर्श शिक्षक पुरस्कार १९६५ साली मिळाला. त्यांनी न्यू हायस्कूल नावाची शाळा काढली. विवेक सांगतात, की भाऊ नावाचे विद्यापीठच आमच्या घरात होते, एवढा त्यांचा लोकसंग्रह आणि ज्ञानसंग्रह! विवेक यांचे वडील रामचंद्र व आई सत्यशीला ही दोघेही शिक्षक होती. त्यांचेही जीवन कुष्ठरुग्णांच्या सेवेत वाहून घेतलेले, ध्येयप्रेरित होते. घरात वाचनाचा संस्कार मोठा होता. आई-वडील, दोघांनी त्यांच्या वडिलांचा शिक्षण व सेवा यांचा वसा पुढे नेला.



विवेक सावंत

विवेक हे त्यांच्या तीन भावंडांसह तो वारसा घेऊन आले. त्यांच्या भावाने मोरेआजोबांची कला घेतली आणि नाशिकला स्टुडिओ थाटला, दोन भगिनी लग्ने होऊन सासरी गेल्या तर विवेक हे सावंतआजोबांचा शैक्षणिक वारसा घेऊन एमएस्सी (फिजिक्स) झाले. त्यांनी फर्ग्युसन कॉलेजात प्राध्यापक म्हणून नोकरी सुरू केली. त्यांनी लोकविज्ञानसारख्या चळवळी चालवल्या, विज्ञानप्रसारार्थ लेखन केले. अनेक तरुण त्या काळात वेगवेगळ्या वैचारिक प्रभावांनी तसे भारलेले व घडलेले आढळतात, कारण समाजात सर्व तऱ्हेची जागृती होत होती, आंदोलनांचे वादळ सर्वत्र घोंगावत होते. तशा स्थितीतच संगणकाने जगाची दारे चहुदिशांनी उघडण्यास सुरुवात केली. विवेक सावंत या तरुणाने ते अचूक जाणले, पण ध्येयवृत्ती बाजूला सारली नाही. त्यांनी कॉलेजात काही शैक्षणिक प्रयोग केले. त्यातून त्यांच्या स्वयंशोध शिक्षणपद्धतीचा ध्यास निर्माण झाला आणि तेथेच त्यांचा शिक्षणातील रचनावादही घडला. म्हणजे मुलांनी स्वत: त्यांचे ज्ञान त्यांच्या पद्धतीने कमावायचे. तरी सावंत यांचे मन फर्ग्युसन कॉलेजच्या दीडशे मुलांच्या क्लासमध्ये आणि लॅबोरेटरीतील पंचवीस मुलांच्या 'डेमॉन्स्ट्रेशन्स'मध्ये रमेना. सावंत यांनी तो ध्यास त्या वेळेपुरता तेथे ठेवला आणि त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स व संगणकविद्या या भौतिकी विषयातील नव्या शाखांचा वेध घेणे आरंभले. त्यांनी शिक्षणातील रचनावाद पुढे विकसित केला आणि त्याची मांडणी व प्रयोगही केले, ही गोष्ट वेगळीच.

विवेक यांनी 'फर्ग्युसन'मध्ये आठ वर्षे शिकवले आणि ते संगणकाच्या क्षेत्रात आले. त्यांनी पुण्याच्या 'सिंबॉयसिस'ची 'इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर स्टडीज' उभी केली. माणूस काळाला घडवतो की काळ माणसाला? कोणीही पट्कन उत्तर देईल की काळ माणसाला घडवतो. विवेक तसेच घडले. परंतु त्यांनी काळाला दिशाही दिली. विचार करा की १९८५-८७ चा काळ आहे. पुण्याभोवतालच्या औद्योगिक कंपन्या भरभराट पावत आहेत. त्यांची कमिन्स, फोर्ज अशी नावे आहेत. तेथील मालकवर्ग व इंजिनीयर वगैरे मंडळींना नव्या युगाची चाहूल लागलेली आहे. अशा वेळी सिंबॉयसिसचे चतुर चालक शां.ब. मुझुमदार आणि जिज्ञासू वृत्तीचे बुद्धिकुशल तरुण विवेक सावंत एकत्र आले. त्यांचे अपत्य म्हणजे ती इन्स्टिट्यूट होती. लवकरच त्या बाळाने बाळसे धरले आणि सिंबॉयसिसची संगणकशिक्षण संस्था सर्वत्र नावाजली जाऊ लागली.

तो क्षण देशपातळीवरही नवी आव्हाने घेऊन उभा राहिला होता. भारताने जगासमोर नव्या क्षेत्रात ठाम उभे राहायचे म्हणून परम संगणक बनवण्याचे ठरवले. ती कामगिरी 'सीडॅक'चे विजय भटकर यांच्याकडे आली. त्यांना विवेक सावंत यांची साथ लाभली. त्यांच्या 'टीम'ची संशोधनबुद्धी पणाला लागली. परम संगणक सिद्ध झाला, भारताची मान अभिमानाने उंचावली. पुढे भारताचे राष्ट्रपती झालेले के.आर. नारायणन त्यावेळी केंद्रात विज्ञानतंत्रज्ञान खात्याचे मंत्री व 'सीडॅक'चे अध्यक्ष होते. त्यांनी भटकर-सावंत यांच्यापुढे एक प्रश्न टाकला, की तुम्ही परम महासंगणक तर बनवला, पण आपल्या देशासाठी भविष्यात यापेक्षा शक्तिशाली महासंगणक सातत्याने बनवत राहू शकतील अशी माणसे तयार व्हावीत यासाठी तुम्ही कोणते प्रयत्न करत आहात?

त्यामधून 'सीडॅक'च्या व विवेक सावंत यांच्याही कामाला नवी दिशा मिळाली ती प्रगत संगणन प्रशिक्षणाची. काळाने घडवलेल्या या माणसाने काळाच्या दिशा कशा अचूक ओळखल्या आहेत त्या पाहा. विवेक यांनी नुसते प्रगत संगणन शिक्षणाचे वर्ग सुरू केले नाहीत, तर त्यासाठी पुस्तके निर्माण केली- ती सतत, सहा सहा महिन्यांनी अद्यावत केली. संगणकाचे तंत्रज्ञान त्या वेगाने बदलत असते ना! त्या दोन-तीन वर्षांत त्यांनी वेगवेगळी पासष्ट पुस्तके तयार करवून घेतली. त्यांच्या प्रती भारतभर 'सीडॅक'च्या प्रशिक्षण केंद्रांतून लाखोंच्या संख्येने विकल्या गेल्या. संगणकाच्या नव्या शक्यतांचा वेध आता तर प्रत्येक सेकंदाला घेतला जात आहे. मात्र त्या शक्यतांचे ज्ञान संगणकावरच उपलब्ध असते. ते बाहेरून, पुस्तकांतून पुरवण्याची गरज राहत नाही!

विवेक सावंत यांच्या आयुष्यातील ती बारा-पंधरा वर्षे प्रगत संगणनक्षेत्रातील संशोधन व प्रशिक्षण अशी रोमांचकारी आहेत असे वाक्य मी लिहिणार; तेव्हाच लक्षात येत आहे, की सावंत यांनी त्यापुढील (म्हणजे गेल्या) वीस वर्षांत तर हिमालयाएवढ्या गोष्टी घडवल्या आहेत! त्यांतील सगळ्यात कल्पक गोष्ट आहे ती म्हणजे 'एमकेसीएल'ची स्थापना. 'माझ्या नवऱ्याची बायको' राधिका हिच्या तीनशे कोटींच्या मसाल्याच्या उद्योगधंद्याची यथेच्छ टिंगल सोशल मीडियावर झाली. त्या मालिकेच्या निर्मात्यांना ती हवीच होती. पण विवेक सावंत नावाच्या, मध्यमवर्गीय परिस्थितीतून आलेल्या तरुणाने कमालीच्या बुद्धिप्रतिभेने व अपार कष्टांनी वीस वर्षांच्या

कालावधीत दोनशे कोटी रुपयांची कंपनी उभी केली – तीसुद्धा स्वत:चे सत्त्व राखून, ध्येयवृत्ती कायम ठेवून, ही गोष्ट लोकांच्या लक्षात सहज येत नाही. विवेक सावंत त्यांच्या आजोबांचा व आईवडिलांचा राष्ट्रप्रेमाचा आणि शिक्षणप्रेमाचा वारसा सांगताना सद्गदित होतात. त्यांची स्वाभिमान वृत्ती व कर्तबगारी तिसऱ्या पिढीत तितक्याच समर्थपणे उतरली आहे हे मराठी जनतेतर्फे गौरवाने साजरे करण्याचे औचित्य यशवंतराव चव्हाण पुरस्काराने साधले गेले असे मला वाटते.

संगणकशिक्षणाची गरज राज्य सरकारच्या शिक्षण–व्यवस्थेपर्यंतही यथाकाल पोचली आणि सरकारने (म्हणजे त्या वेळचे राज्यकर्ते शरद पवार व दिलीप वळसे पाटील यांनी) त्याबाबत शिफारस करण्यासाठी 'राम ताकवले समिती' नेमली. त्या संबंधातील अनुभव असलेला व दृष्टी कमावलेला तरुण म्हणजे विवेक सावंतच त्या वेळी होता. 'ताकवले कमिटी'ने विवेक यांचे साहाय्य घेतले. त्यातून निर्माण झाली अभिनव कल्पना, ती 'एमकेसीएल'ची. त्या संस्थेची घडण फार उद्‌बोधक आहे. सरकार व खाजगी संस्था यांचे ते विधायक मिश्रण आहे. 'एमकेसीएल'च्या रचनेमध्ये सरकार (३७ टक्के), विद्यापीठे (२३ टक्के), हमाल व रिक्षा पंचायती आणि अन्य सामाजिक संस्था (२० टक्के), त्याशिवाय खासगी व्यक्ती–संस्था (बाकी टक्के) अशी भागिदारी आहे. ही दृष्टी व कर्तबगारी विवेक सावंत यांची. ताकवले व सावंत यांनी ही रचना सुचवताना असे म्हटले आहे, की अशा व्यवस्थेला सरकारची विश्वासार्हता व खाजगी व्यक्तींची उद्यमशीलता लाभेल आणि सामाजिक संस्थांकडून त्या व्यवस्थेवर नियंत्रण राहील. टोलनाक्यांवर प्रायव्हेट/पब्लिक पार्टिसिपेशनचे जे अभद्र दर्शन होते, त्याच्याशी या रचनेची तुलना करून पाहा! लोकशाही राजवटीमध्ये लोकहिताची कामे करताना शासन व जनता यांच्या सहभागाची अशी रचना ही आदर्श होय. राज्यात विविध पक्षांची सरकारे आली, तऱ्हतऱ्हेचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री आले, पण 'एमकेसीएल'ने गेल्या वीस वर्षांत सरकारी अनुदान आणि हस्तक्षेप याविना अनेक गोष्टी साधल्या, जनतेच्या फायद्याच्या विविध गोष्टी निर्वेध घडवल्या. सावंत यांच्या संकल्पनेचा विस्तार भारताच्या राजस्थान, बिहार, ओडिशा, हरियाणा, मध्य प्रदेश यांसारख्या अन्य राज्यांत आणि सौदी अरेबिया, इजिप्त यांसारख्या बाहेरदेशांत झाला आहे. तेथेही ज्ञानसंस्था उभ्या राहिल्या आहेत. त्यांचे 'एमकेसीएल'शी एका नाळेचे नाते आहे. 'एमकेसीएल'चे ऑनलाइन अभ्यासक्रम आता १७० देशांतील विद्यार्थ्यांच्या पसंतीस उतरले आहेत. 'एमकेसीएल'ची तज्ज्ञता व त्यांची कार्यक्षमता व्यावसायिकदृष्ट्या उच्च कोटीची असते. परंतु वर्तन साधे, संस्कारशील असते, ती छाप विवेक सावंत यांच्या व्यक्तिमत्त्वाची! त्यांनी 'एमकेसीएल'च्या कारभारातून सामाजिक महत्त्वाची अनेक मूल्ये रुजवली आहेत. एक कालानुरूप मूल्य संस्थेच्या कार्यपद्धतीत कसे आले आहे ते पाहा. त्यांनी गावोगावच्या 'एमकेसीएल' केंद्रांच्या मालकीत स्त्रीचा सहभाग समान असेल असे पाहिले आणि ते स्वत: निवृत्त होण्याची वेळ आली तेव्हा संस्थाप्रमुख म्हणून वीणा कामथ या महिलेची व्यवस्थापकीय संचालकपदी नेमणूक केली.

विवेक सावंत यांची बौद्धिक झेप मोठी आहे. त्यामुळे त्यांनी 'एमकेसीएल'ला 'कोचिंग क्लासेस'चे जाळे असे रूप तर येऊच नाही दिले. उलट, त्यांनी ते ज्ञानसंशोधनाचे व संकलनाचे व्यासपीठ तयार केले आणि म्हणून ते पुऱ्या आत्मविश्वासाने पाच हजार बाहूंच्या बळाचा उल्लेख करू शकले. 'एमकेसीएल'च्या वेबसाइटवर गेले तर ज्ञानसंशोधनाचा महासागर अक्षरश: प्रकट होतो. त्यामधून संगणकाच्या शक्यतांचा अंदाज येतो व अचंबित व्हायला होते. सावंत यांनी बारा लाख किलोमीटर लांबीची प्रधानमंत्री सडक योजना ते पंढरपूरच्या शाळेतील शिक्षकांचे प्रशिक्षण आणि दापोलीतून घडणाऱ्या तरुणांचे संघटन येथपर्यंतच्या अनेक प्रकल्पांना व उपक्रमांना संगणकज्ञानाचे सहाय्य पुरवले आहे. एकच उदाहरण देतो. खोपोलीच्या 'टाटा जलाशया'तील जादा पाणी सातारा जिल्ह्यातील माणच्या दुष्काळी प्रदेशात नेण्याची योजना एका कार्यकर्त्यास स्फुरली. त्या जलप्रवाहाची रचना संगणक कशी साधेल व शेताच्या प्रत्येक तुकड्यास पाणी कसे मिळेल याचे सादरीकरण 'एमकेसीएल'च्या संगणकतज्ज्ञांनी बनवलेले पाहिले आणि थक्क झालो. त्या साऱ्या प्रदेशातील डोंगर–दऱ्यांसहित नकाशा तयार होता आणि त्यातील शेतजमिनी निर्देशित केल्या होत्या. त्यांना पाणी छोट्या छोट्या ओढ्यांनी कसे पोचू शकेल हेही दाखवले होते. विवेक सावंत यांचा असा, महाराष्ट्रात घडणाऱ्या अनेक विधायक घटनांशी व विचारांशी संबंध येत असतो. हा सारे सामाजिक कार्य; त्यात पैशांचा, नफातोट्यांचा विचार नसतो. त्या साऱ्या कहाण्या त्यांच्या तोंडून ऐकाव्या. त्यांमध्ये ज्ञान, अभ्यास, निरीक्षणबुद्धी आणि कथेकऱ्याचा रसाळपणा असे सारे गुण असतात. त्यास नर्मविनोदाची हलकी फोडणी असते. ते सांस्कृतिक व कलाजगतातील घडामोडींबद्दल तेवढेच जागरूक असतात. त्यांनी अनिल काकोडकर यांचा अमृतमहोत्सव कसा साजरा करावा? तर 'कोपनहेगन' ही, अणुवैज्ञानिकांच्या समस्येवर आधारित, शरद नावरे अनुवादित नाट्यकृती पुणे व ठाणे येथे नाट्यगृहांमध्ये सादर करून. त्यांनी ती जबाबदारी कोल्हापूरच्या शरद भुताडिया यांच्या ग्रूपवर टाकली होती. असे कित्येक प्रसंग व घटना त्यांनी दहा–पंधरा वर्षांत साजरे केले आहेत आणि त्यामधून शेकडो माणसे व संस्था 'एमकेसीएल'शी जोडली गेली आहेत.

विवेक सावंत यांना पार्श्वभूमी स्वातंत्र्यलढ्याच्या काळातील मूल्यांची. ते स्वत: वाढले सामाजिक जागृतीच्या आंदोलनकाळात. तसे बहुसंख्य लोक सध्याच्या समाजजीवनात भरकटलेले दिसतात. त्यात राजकीय भ्रष्टता आढळते, एनजीओंचे खाजगीकरण जाणवते, व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा व लोभ त्रस्त करतो, वैफल्याची तिडीक बोचते... सावंत या साऱ्या अनाचारापासून दूर, स्वत:च्या कर्तृत्वावर ठाम उभे आहेत. सावंत यांचा स्वत:चाही तरुणपणापासून विविध राजकीय विचारधारांशी संबंध आला होता. त्यांना तशा विचारबद्ध जीवनातील विसंगती व फोलपणा दिसून आला. त्यामुळे ते कडवट वा विफल झाले नाहीत, उलट सावंत यांनी त्यांच्या जीवनव्यवहारात परंपराप्राप्त मूल्ये व आधुनिक मूल्ये यांची इष्ट अशी सांगड घातलेली

दिसते. सावंत शिक्षणाने व धारणेने वैज्ञानिक आहेत; विचारांनी गांधी व विनोबा यांच्या जवळचे आहेत. त्यांना अभय बंग, 'प्रयोग परिवार'वाले श्री.अ. दाभोलकर अशांची उपक्रमशीलता प्रिय आहे. श्रीकृष्णांनी महाभारतात अर्जुनाला घडवलेले विश्वरूपदर्शन सध्या सजग प्रत्येक व्यक्तीला क्षणोक्षणी होत असते. व्यक्तीने फक्त त्या प्रत्येक क्षणाचा अर्थ लावण्यास तयार असावे. विवेक सावंत तर या आधुनिक विश्वाच्या एका केंद्रस्थानी आहेत. ते स्वत:ही बऱ्याच गोष्टी घडवत असतात.

स्वाभाविकच, त्यांच्या विचारात व वर्तनात प्रगल्भता जाणवते. सामाजिक उपक्रमांचा व्यावसायिक विकास हे त्यांना आजच्या काळाचे उद्दिष्ट वाटते. समाजाने भांडवलशाही पाहिली, नफेखोरीतील विकृती अनुभवली, लोकशाहीचे तत्त्व जपले, पण त्या तत्त्वाचे संगोपन-संवर्धन व त्याचा विकास घडून येऊ शकला नाही. त्यामुळे माणसे विचित्र संघर्षात सापडलेली व म्हणून उदास बनलेली आढळतात. अशा स्थित्यंतरकालीन संभ्रमित परिस्थितीत तंत्रविज्ञानाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा राक्षस उभा केला आहे, त्यातून लोकशाहीतत्त्वालाच धोका निर्माण झाला आहे. ते म्हणतात, की लोकशाहीच्या रक्षणासाठी 'अँन्टिव्हायरस' किंवा 'अँन्टिरॅन्समवेअर' विकसित करणे ही आजच्या काळाची गरज आहे. त्यांना येणारा काळ गुंतागुंतीचा, तरीही योग्य खबरदारी घेतली तर मानवाच्या उत्तम प्रगतीचा असेल असे वाटते. ते म्हणतात, की औद्योगिक क्रांतीने कामगारवर्ग निर्माण केला, यापुढील क्रांतीत न-काम (नाकाम नव्हे) किंवा बेदखल वर्ग निर्माण होणार आहे. त्याचे व्यवस्थापन ही खरी समस्या आहे. नव्या तंत्रक्रांतीचा नफा कमावून झाला आहे. नफा अजूनही काही लोक लुटत आहेत व लुटत राहतील. मात्र सावत यांचा सगळा रोख सामाजिक महत्त्व जाणणारे व्यावसायिक उपक्रम आणि प्रकल्प यांवर आहे. त्यांत थोडाफार नफा असू शकेल, पण लाभांश नसेल. त्या दृष्टीने मला सावंत यांच्या दोन कृतींकडे लक्ष वेधावेसे वाटते. सावंत यांचे वेतन दुप्पट करावे असा ठराव 'एमकेसीएल'च्या संचालक मंडळाने काही वर्षांपूर्वी केला तर सावंत यांनी त्या वेतनवाढीस ठाम नकार दिला आणि दुसरी कृती म्हणजे पुरस्काराची पाच लाख रुपयांची रक्कम फाऊंडेशनला देऊन टाकली. त्यांना अर्थव्यवहार आणि व्यावसायिक विकास यांचा समाजावरील प्रभाव अधिक महत्त्वाचा वाटतो. ते म्हणतात, माणसाचे माणूसपण कशात आहे त्याचा शोध हा समाजापुढील अजेंडा असणार आहे. समाजजाणिवेतील काम हा तंत्रज्ञानाचा अजेंडा असू शकत नाही. माणसाचे मन माणसांनीच घडवायचे आहे. येथे ते डार्विनच्या उत्क्रांतितत्त्वाचा आधार घेऊन सुचवतात, की त्या जीवजातीच्या विकासक्रमातील 'सर्वोत्कृष्ट डिझाइन'साठी मुलांची तयारी करणे हे शिक्षणातील सर्वात मोठे आव्हान असणार आहे. ती जबाबदारी उत्क्रांतितत्त्वानेच मनुष्यमात्रावर सोपवली आहे हे ध्यानी घेतले पाहिजे.

विवेक सावंत गांधीजींचे एक वाक्य सांगतात, की वेदनाविहीन शस्त्रक्रिया करणारे शास्त्रज्ञ हे संतांपेक्षा श्रेष्ठ होत! सावंत यांना ते वाक्य महत्त्वाचे वाटते. त्यात माणसाची आध्यात्मिक विकासाची कांक्षा आहे आणि विज्ञानाची श्रेष्ठतादेखील मान्य केली आहे. ते म्हणतात, की अध्यात्म हेसुद्धा विज्ञानासारखे उत्क्रांत होत राहिले पाहिजे. खरे तर, विज्ञान आणि अध्यात्म एकच आहेत. त्याचे पुरावे 'ज्ञानेश्वरी'त मिळू शकतात. त्यामुळे विज्ञान आणि अध्यात्म यांची एकात्मताही कळू शकते. विवेक सावंत यांची वैचारिक झेप अशी सप्तरंग धारण करू शकते. मला बऱ्याच वेळा वाटते, की ती बुद्धी 'एमकेसीएल'च्या ग्राऊंडवरून चौकार व षटकार मारत असते. ती आता इडन गार्डन, चेपॉक ते लॉर्ड्सपर्यंतच्या विविध मैदानांत उतरली पाहिजे. त्यांनी वयाची साठी तीन वर्षांपूर्वी पार केली, 'एमकेसीएल'ची जबाबदारी दोन वर्षांपूर्वी सोडली. चव्हाण पुरस्काराने त्यांच्या कामगिरीवर लोकमान्यतेची व राजमान्यतेची मोहोर उमटली आहे. विवेक सावंत यांचा गृहस्थाश्रमही जमून गेला आहे. त्यांचा विवाह त्यांना लोकविज्ञान चळवळीत भेटलेल्या संगीता यांच्याशी झाला. संगीता या उच्चशिक्षित असून पुणे विद्यापीठाच्या बायोइन्फॉरमॅटिक्स विभागाच्या संचालक आहेत. त्या दरवर्षी सहा महिने पुणे येथे आणि सहा महिने नॉर्वेमध्ये शैक्षणिक कामानिमित्त असतात. त्यांचा मुलगा सन्मय हा जर्मनीमध्ये ऑटोमोबाइल क्षेत्रात नोकरी करतो. आता त्यांनी समाजसंस्कृती क्षेत्रात उतरावे. तेथे विचारांची, कार्यकर्त्यांची आणि नेतृत्वाचीही पोकळी गेल्या दोन दशकांहून अधिक काळ आहे. आंबेडकर यांच्यापर्यंतच्या काळात मुख्यत: सामाजिक हक्कांचे आणि जाणिवांचे काम झाले. तशा कार्याचा पाठपुरावा नंतर पाच-सात दशके चालू राहिला आहे. त्या कार्यातील सांस्कृतिक पदर त्या नंतरच्या काळात कुसुमाग्रज, पुल, तेंडुलकर यांनी उलगडून दाखवले आणि त्यांना समाजमान्यता मिळाली. समाजाचे नेतृत्व त्यांच्याकडे अनभिषिक्तपणे आले. त्यांच्या पश्चात नेतृत्वाची ती पोकळी समाजात गेली दोन दशके भेडसावत राहिली आहे. या काळात विज्ञानक्षेत्रात नारळीकर-गोवारीकर-देवधर यांच्यासारखे काही अतिरथी आले, पण त्यांनी विज्ञान आणि एकादे समाजक्षेत्र निवडले. जसे, की नारळीकर यांनी विज्ञान व साहित्य, गोवारीकर यांनी विज्ञान व शिक्षण, देवधर यांनी विज्ञान व विज्ञान. तिघांनी तसे तसे कार्य उभे केले. तसेच, शरद जोशी, भवरलाल जैन, एकनाथ ठाकूर यांनीही एकेक क्षेत्र निवडून महान कार्य उभे केले. परंतु एकूण समाजक्षेत्र कवेत घेण्याची आस बाळगली नाही. विवेक सावंत हे बहुधा तशा प्रकारची प्रज्ञा-प्रतिभा प्राप्त असलेले व्यक्ती आहेत. त्यांनी ज्ञानाकांक्षा सतत बाळगली आहे आणि समाजही ज्ञाननिष्ठ राहवा यासाठी ते प्रयत्नशील राहिले आहेत. त्यांनी त्यांच्या सर्वसामर्थ्यानिशी समाजक्षेत्री उतरावे आणि भांबावलेल्या व म्हणून एककल्ली झालेल्या मुख्यत: मध्यमवर्गीय जनसमूहांना मार्गदर्शन करावे - विवेक सावंत आगे बढो, हम तुम्हारे साथ है।

**- दिनकर गांगल**
**भ्रमणध्वनी :** ९८६७११८५१७
dinkargangal39@gmail.com



# नंदा खरे
# मूल्यप्रधान लेखनप्रवास

**अतुल देऊळगावकर**

अनंत यशवंत खरे ऊर्फ नंदा खरे यांनी मुंबईच्या आयआयटी मधून १९६१ या वर्षी सिव्हिल इंजिनीयरिंगची पदवी घेतली. त्यानंतर ते 'खरे-तारकुंडे असोसिएट्स' ह्या व्यावसायिक संस्थेतून बांधकाम क्षेत्रातील कामं करू लागले. उजनी व जायकवाडी धरण, अनेक पुलांची कामं त्यांनी केली आहेत. २००१ मध्ये त्यांनी निवृत्ती घेतली. या सगळ्या क्षेत्रांमधनं आणि ते म्हणत जरी नसतील, तरी ते विज्ञानप्रसाराच्या कामाला लागले, २००१ ला निवृत्त झाल्यानंतर त्यांनी सलग दहा वर्षं 'आजचा सुधारक'चं संपादन केलं. त्यात कोणतेही विषय वर्ज्य नव्हते. प्रत्येक मराठी वाचकानं अंक संग्रही ठेवला पाहिजे, असा त्याचा दर्जा होता. खरे यांना शेती, माती, पाणी, नगररचना, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, उत्क्रांती हे सगळे विषय अतिशय जवळचे असल्यामुळे 'आजचा सुधारक'मधून अनेक ज्ञानशाखांचा संगम दिसत असे. खरे यांची ग्रंथसंपदादेखील हेच अधोरेखित करते. 'ज्ञाताच्या कुंपणावरून' '२०५०', 'अंताजीची बखर', 'संप्रती', 'जीवोत्पत्ती आणि त्यानंतर', 'दगडावर दगड विटेवर वीट', 'नांगरल्यावीण भुई', 'कहाणी मानवप्राण्याची', 'बखर अंतकाळची', 'वाचताना, पाहताना, जगताना', 'उद्या', 'ऐवजी', 'दगडधोंडे' यांमधून अनेक दिशांनी जगाचं दर्शन होतं. खरे यांनी 'वारूळपुराण', 'इंडिका' ही भाषांतरित केलेली पुस्तकं आहेत. विषयातील विविधतेमुळे त्यांचा आवाका लक्षात येतो. ते आपल्याला अनेक गोष्टींचा उलगडा करून दाखवतात. कारण त्यांना मुळात आतून कुतूहल आहे. मग ते 'जीवोत्पत्ती आणि नंतर' असेल किंवा 'कहाणी मानवप्राण्याची'सारखा अतिशय महत्त्वाचा मोलाचा ग्रंथ. त्यातून ते वाचकाला मुळापर्यंत घेऊन जातात. 'अंताजीची बखर'मधून इतिहासाकडे तटस्थपणे पहाण्याची नजर देताना त्यांची विनोदबुद्धी मनापासून खुलून जाते.

साहित्य अकादमीनं गौरवण्यात आलेल्या 'उद्या' ह्या कादंबरीत नंदा खरे यांनी कमालीच्या अस्वस्थेतून वर्तमानाचा वेध घेत या कादंबरीत भविष्याचा बहुआयामी विशाल पट सादर केला आहे. ललित, वैचारिक, कथा, कादंबरी हे सारे भेद पुसून त्यांचा संगम घडवला आहे.

व्यक्ती व नाती दोन्हींचं वस्तुकरण झाल्यामुळे आपल्याला कुणाशीही जोडून घेण्यासाठी (कनेक्ट) उपयोगिता हा एकमेव निकष झाला आहे. बाजारपेठेत आपल्या 'मूल्यात' वृद्धी कशी होईल, या काळजीनं सगळे ग्रासून गेले आहेत. घरापासून दारापर्यंत, संस्थेपासून यंत्रणेपर्यंत उदारतेची हेटाळणी, सहिष्णुतेची नालस्ती व करुणेची अवहेलना वृद्धिंगत होत आहे. जिव्हाळा आटत जाऊन वरचेवर परिपूर्ण शुष्क (सॅच्युरेटेड ड्रायनेस) होत चाललेल्या वातावरणात संवेदनशीलतेची ससेहोलपट होत आहे. अशा परिस्थितीत सभोवतालच्या असंख्य घटनांचा अन्वय लावणं हे अतिशय यातनादायक असतं. कारण त्यातून आगामी काळाची जीवघेणी चाहूल 'उद्या'त होते.


'उद्या'विषयी नंदा खरे म्हणतात-

''खरं सांगू का? या कादंबरीला मी 'उद्या' हे नाव दिलं त्याच्या ताबडतोब नंतर लोक मला म्हणायला लागले, की 'उद्या' काय म्हणतोयस? ती आज आहे काल आहे. माझा मुलगा मला म्हणाला, ''तुम्ही फक्त पृष्ठभाग खरवडलाय, खोलात कुठंच गेला नाहीत.'' आणि मला ते पटतंय. ते पुस्तक लिहून पूर्ण झालं होतं २०१४ साली आणि ते २०१५ च्या सुरुवातीला प्रकाशित झालं. आता त्यानंतरही पाच वर्षं उलटून गेली आहेत. या काळात परिस्थिती इतक्या झपाट्यानं वाईट झालेली आहे, की कोविड हा फार माझ्या मते दुय्यम प्रकार आहे. आपल्याला कल्पनासुद्धा करवत नाही इतकी विषमता वाढलेली आहे. कोविडची साथ आणि टाळेबंदी सुरू झाल्यानंतर आत्महत्यांचे प्रकार वाढलेले आहेत. अपघात वाढले. जालन्याजवळ १६ माणसं रेल्वेखाली गेली. दोन-तीन माणसं सायकलनं जात होती, त्यांना ट्रकनं धडक मारल्यामुळे गेली. खरं तर, कोरोनानं जेवढी माणसं मरताहेत जवळजवळ तेवढीच माणसं कोरोनाच्या उप-परिणामानं मरत असतील अशी शक्यता आहे. कुणीतरी याचा अभ्यास केला पाहिजे. मला कल्पना आहे, आपल्याकडे माहिती मिळवणं आणि त्यातसुद्धा अंकबद्ध माहिती

मिळवणं खूप कठीण आहे. कारण सगळे लोक खोटं बोलतात, सरकारही खोटं बोलतं. सर्व कंपन्या खोटं बोलतात. त्यातून तुम्हाला खरं काय आहे ते शोधावं लागतं. कोरोनामुळे मरणं आणि कोरोनाच्या उप-परिणामांमुळे मरणं हे जर समप्रमाणात असेल तर मानसिक परिणाम किती वाईट होत आहेत? खूप डिप्रेशन-खिन्नतेचे विकारी लोक वाढत आहेत. मी जवळजवळ त्या पातळीवर अनेक वर्षं आहे. त्यामुळे मला आता लोक म्हणतात, की तुझं हे नेहमीचं रडगाऱ्हाणं असतं. मीही स्वतःला पटवून घेतलेलं आहे, आपण आता असेच रडत राहणार.

''त्याबद्दल एक गमतीदार गोष्ट आहे! आहे. 'हेलन ऑफ ट्रॉयची कहाणी'मधील हेलन ही एक ग्रीक राजकन्या होती. सध्याच्या तुर्कस्थानात ट्रॉम आहे. तिथल्या राजाचा मुलगा पॅरिस यानं तिला पळवून आणलं. पॅरिसचा बाप प्रियान याच्या अनेक मुलांपैकी एक होती कॅसांड्रा! ह्या राजकन्येच्या प्रेमात अपोलो हा देव पडला. त्यानं तिला खुश करण्याकरता 'तुला भविष्य समजेल' असा वर दिला. पण, हा वर देऊनसुद्धा ती काही देवाला वश झाली नाही. त्यामुळे अपोलो संतापला आणि म्हणाला, 'आता मी तुला दिलेला वर परत तर घेऊ शकत नाही. तू भविष्यकथन करशील, पण त्यावर कुणी विश्वास ठेवणार नाही.' कॅसांड्राने तिच्या भावाला- हेलनसला भविष्य कथन करायचं कौशल्य शिकवलं. लोक त्याच्यावर विश्वास ठेवू लागले. परंतु कॅसांड्रावर कुणीही विश्वास ठेवला नाही. कॅसांड्रा म्हणाली, 'तुम्ही दरवाजाबाहेर ठेवलेला लाकडी घोडा घेऊन आला आहात. त्याच्या आतमधे ग्रीक लोक लपून बसले आहेत. ते तुम्हाला रात्रीत येऊन कापून काढतील.' कोणीही ऐकलं नाही आणि ट्रॉयचा सत्यानाश झाला. विषमतेचे आणि हवामानबदलाचे धोके सांगणारे वैज्ञानिक अनेक वर्षांपासून अनेक धोक्याच्या सूचना देत आहेत. लोक म्हणतात, 'तुम्ही नेहमीच असंच सांगत असता. त्याला काही अर्थ नाही.' आम्ही आपलं आडनाव 'खरे'ऐवजी 'कॅसांड्रा' करावं, असं बऱ्याचदा माझ्या डोक्यात येतं.

'' 'पर्सन ऑफ इंटरेस्ट' नावाची एक मालिका आहे. (मेझॉन प्राइमवर पाहायला मिळेल.) त्यामधे एक गोष्ट होती- एखादी व्यक्ती लवकरच हिंसेत गुंतणार आहे हे दाखवणारा प्रोग्राम एक माणूस रचतो. त्यात एक पेच फक्त असा असतो, की ती व्यक्ती दुसऱ्याची हिंसा करणार आहे की ती व्यक्ती स्वतःच हिंसेचा बळी होणार आहे, हे मात्र कळत नाही. त्यामुळे तो माणूस सॉफ्टवेअर इंजिनीयर आहे की सायकॉलॉजिस्ट आहे हे समजत नाही. तो खूप श्रीमंत आहे पण तो फाटका माणूस आहे- लंगडत चालणारा जाड चश्मेवाला, माझ्यापेक्षाही जाड चश्मेवाला आहे. तर तो जुना सैनिक अधिकारी किंवा थोडक्यात सांगायचं तर सत्प्रवृत्त माणूस गुंड गोळा करून म्हणतो, 'ह्या माणसाबद्दल नाव येतंय. ह्या माणसाभोवती हिंसा होणार आहे. तर त्या माणसाजवळ जा. तो हिंसा करणार असेल तर त्याला थांबव आणि जर त्याच्यावर हिंसा होणार असेल तर ती थांबव.' पुढे ही मालिका बरीच चालली. माझ्या दृष्टीनं ह्या सगळ्या मालिका म्हणजे पुढे काय होणार यासाठी केलेली बौद्धिक कसरत






नंदा खरे

आहे. ह्याचा अभ्यास केला पाहिजे की हे तंत्रज्ञान फार दूर नाहीये. कदाचित त्यांची प्रयोगशाळेत चाचणीही चालू झालीही असेल. ते शास्त्रज्ञही आपल्याला सांगणार नाहीत. (ते पैसे मिळाल्याशिवाय काही सांगत नाहीत अशी आजची स्थिती आहे.) आता 'बिलियन' नावाचीही एक मालिका आहे तिचे आजवर पाच भाग झाले असून सहावा भाग येणार आहे. तो तर मला भयंकर घाबरवतोय. त्यात माणुसकी उरलेलीच नाही. फक्त पैशांकरता काय काय करायचं, ह्यावरच ती मालिका बेतलेली आहे. त्या मालिकेचं परीक्षण लिहिण्याचं मनात आहे. कुणी छापेल की नाही, मला माहीत नाही. त्या गोष्टी जरा त्रासदायक असतात. जाहिराती जातील, सरकारी मालक नाराज होतील, ही भीती दाटून आलेली असल्यानं वृत्तपत्रं घाबरलेलीच असतात. आपल्याला घाबरत घाबरतच जगायचं आहे, तर माझ्या दृष्टीनं सुखाची गोष्ट अशी आहे, की मी आता ७४ वर्षांचा आहे. त्याच्यामुळे फार काही नाही; पण तू माझ्यापेक्षा १५ वर्षांनी लहान आहेस. बाकी माझे पुष्कळ मित्र आहेत की, जे माझ्यापेक्षा थेट ३०-४० वर्षांनी लहान आहेत. त्यांना हे सगळं भोगत जगायचंय.

''काही पुस्तकं तर मी उत्साहानं विकत घेतो. वाचायला सुरुवात करतो. प्रस्तावना वाचून झाल्यावर मी इतका खिन्न होतो की म्हणतो, 'जाऊ द्या, हे नको.' 'एमआयटी'मधील (मॅसेच्युसेटस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) प्रो. शोशना झुबॉफ यांनी लिहिलेल्या प्रत्येक पुस्तकानं वाद निर्माण केला आहे. त्यांचं अलीकडचं 'सर्व्हेइलन्स कॅपिटॅलिझम' हे अतिशय महत्त्वाचं पुस्तक आहे. आपण कसे वागतो ह्याची माहिती गोळा केली जाते आणि त्या माहितीवरून व्यापारी उत्तरं काढत असतात. एखाद्या शहरी मध्यमवर्गीय माणसाची साधारणपणे १००० वेळा नोंद होत असणं सहज शक्य आहे. तो डेबिट वा क्रेडिट कार्ड वापरतो, मोबाइल वापरतो, गुगल सर्च करतो तेव्हा अनेक वेळा नोंद होते. असं करता तुमच्याबद्दलची माहिती साठत असते. झुबॉफबाई म्हणतात, 'तुम्ही केवळ ग्राहक नाही आहात. तर तुम्ही विदा (डाटा) आहात.' ते पुस्तक पूर्ण करायची हिंमत होत नाही माझी. पण... मला त्रास होत असला

तरी मला अनेक सोयी आहेत. पण मजुरांचं काय? आज स्थलांतरित कामगारांबद्दल पुष्कळ चर्चा चालू आहेत. या स्थलांतरित कामगारांकरता आगगाडींच्या सोयी करतात. पैसे कोण देणार, अजूनही माहीत नाही. जे त्यांना गुडबाय म्हणतायत त्या राज्यांनी, की ज्या राज्यांत ते गेले त्यांनी पैसे द्यायचे? यावर खूप वर्षं भांडणं होतील. जालन्यात माणसं मेली त्यांना मध्यप्रदेशात जायचं होतं. त्यांना ओळखपत्र, प्रवासाचा परवाना आणि कोविड-१९ नसल्याचं प्रमाणपत्र मागितलं जातं. त्यांचं दूर राहिलं, मलासुद्धा एवढी कागदपत्रं मिळवता येणं शक्य होणार नाही. कारण मला तेवढा अनुभव नाही. तरी मी अडाणी नाही, उत्तम इंजिनीयर आहे. महाराष्ट्रातली खूप महत्त्वाची कामं माझ्या हातून झाली आहेत. मात्र हे तंत्रज्ञान माहीत नसल्यामुळे ते मला करता येणार नाही. हे डिजिटल तंत्रज्ञान इतक्या सहजपणे  सगळ्या लोकांना अवगत होणं शक्यच नाही. हे तंत्रज्ञान शिकण्याकरता त्यांना तसं शिक्षण देणं गरजेचं आहे. परंतु शिक्षण देण्याचा विचार केला जातो का? अजिबात नाही. जी.डी.पी.च्या (सकल राष्ट्रीय उत्पादन) ५ ते ६ टक्के खर्च शिक्षणावर होणं आवश्यक आहे, असं अनेक तज्ज्ञ सांगतात. भारत १ टक्क्याच्या जवळ आहे आणि कमी करण्याचा प्रयत्न चालला आहे. आता हे ऑनलाइन शिक्षणाचंच पाहा ना! स्मार्ट फोन नाही त्याला शिक्षणच नाही? आपल्याला यात काही गैरही वाटत नाही.

''तुम्ही विजेचं बिल भरायला गेलात तर फॉर्मवर तुमचा मोबाइल नंबर लिहून मागतात. माझ्या समोर एक बाई उभी होती. ती म्हणाली, 'मी मोलकरणीचं काम करते. माझ्याकडे मोबाइल नाही.'

'मग तुमचा पत्ता कुठे आहे?'

ती म्हणाली, 'मी ज्यांच्याकडे काम करते त्यांच्याकडच्या आऊट हाऊसमधल्या एका खोलीत राहते. माझी काय दोन माणसे आहेत.'

'त्यांचा मोबाइल नंबर द्या मग!'

''... पण मालक मोलकरणीला मोबाइल नंबर देईल का वापरायला? आपल्या वीज महामंडळाचे खूप नियम आहेत. मोबाइल नंबर असल्याशिवाय वीज मिळणार नाही, असाही नियम आहे. आपण काही तक्रार तरी करतो का ह्याविषयी? आपल्याला काही देणंघेणंच नसतं ह्याविषयी. आपल्या सगळ्यांकडे स्मार्ट फोन आहेत. पण समाजाच्या एका खूप मोठ्या वर्गाकडे तो नाही. भारतातील जवळपास एकचतुर्थांश जनतेला (सुमारे ३० कोटी) ऑनलाइन वा डिजिटल सुविधा उपलब्ध नाही. आपल्या मनात बंधुभाव ही भावना इतकी क्षीण झाली आहे, की आपल्याला ती माणसं आहेत असं वाटतच नाही. आता कोविड चालू झाल्यापासून मी माझ्या कॉलेजमधल्या सगळ्या मित्रांशी बोलतो. मी बोलताना कधीतरी विषय निघतोच. कारण मी बांधकाम क्षेत्रात होतो. तिथं हातावर पोट असणारी माणसंच माझ्या आजूबाजूला असायची. मी कुठंही चुकून जरी बोललो की 'रोजंदारीवर जगणाऱ्या माणसांना त्रास आहे.' तर माझे मित्र ताबडतोब विषय बदलायचे. ते सांगतात, की 'आमच्या सोसायटीच्या खाली भाजीवाला येतो. मग चौकीदार आम्हाला फोन करतो. मग आम्ही खाली जाऊन भाजी घेऊन येतो.'

''लाखो उपाशी माणसं एका ठिकाणाहून आपल्या घराकडे जायला आसुसली आहेत, याच्याकडे आपलं लक्ष जातंय का? अजिबात नाही. प्रेमचंदांच्या गोष्टींवर आधारलेला 'गोदान' नावाचा चित्रपट होता. तुम्ही आयुष्यात कधीतरी एकदा गायीचं दान केलं तर तुम्ही स्वर्गाला जाता. त्यातील पात्राला (अभिनेता - राजकुमार) काहीतरी करून आपल्या हातून एकदातरी गोदान करून स्वर्गाला जाण्याचं भाग्य मिळावं म्हणून तो गोदान करण्यासाठी झटत असतो. त्याचा धाकटा भाऊ (मेहमूद) याच्या तोंडी गाणं आहे-

'पिपरा के पतवासरीखे डोले मनवा,<br>
कि जियरा मां उठत हिलोर<br>
अरे पुरवा के झोंकवा से आयो रे संदेसवा<br>
कि चल आज देसवा की ओर...<br>
पिपरा के पतवा'

''आपल्याला घराकडे जायची इच्छा भयंकर तीव्र असते. 'ने मजसी ने परत मातृभूमीला' हे मराठीतलं उदाहरण आहेच. अशी अनेक उदाहरणं आहेत. त्या माणसांना जाता येत नाहीये. दूर बसून सांगायला काय जातं? की 'त्यांच्या खात्यात पैसे आहेत.' तो म्हणतो, 'हो, माझ्या जनधन खात्यात पैसे जमा झालेत. पण ते जनधन खातं बिहारला आहे आणि मी हरियाणात अडकलो आहे.'  किती पैसे जमा झालेत? ५०० रुपये! पण तेसुद्धा त्याला मिळत नाहीत. कारण तो हरियाणात अडकून पडला आहे. त्याची बायका-पोरं, म्हातारे आईबाप बिहारमधे आहेत, हे आपल्याला दिसतंय का? तर नाही दिसत.''

विख्यात विचारवंत नोम चोमस्की म्हणतात, ''जनतेच्या मनावर नियंत्रण मिळवण्याकरता दरवर्षी हजारो कोटी खर्ची पडत असतात. काय घडत आहे यापासून सर्वसामान्य जनता अनभिज्ञ असते आणि याची त्यांना जाणीवदेखील नसते.'' याची प्रखर जाणीव 'उद्या' करून देते.

(अतुल देऊळगावकर यांच्या 'ऐकता दाट' ह्या साधना प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकातील मुलाखतीतील काही अंश)

**- अतुल देऊळगावकर**<br>
भ्रमणध्वनी : +९१ २३८२ २४२५३१<br>
atul.deulgaonkar@gmail.com



# रंगनाथ पठारे एक अद्वैताचे झाड

दीपक करंजीकर

रंगनाथ पठारेसरांना महाराष्ट्र शासनाचा 'जीवनगौरव' पुरस्कार जाहीर झाला, तो त्यांच्या लिखाणाचा चाहता म्हणून माझ्यासाठी खास आनंदाचा क्षण होता. आरंभी त्याबद्दल त्यांचं मन:पूर्वक अभिनंदन. एखाद्या आशयाच्या आवर्तात विविध शक्यतांची मांडणी करणे आणि कथानकाच्या आसपास सतत हे शोध सुरू ठेवणे हा रंगनाथ पठारे यांच्या लेखनाचा गाभा आहे. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या, कथा ह्या घालमेलीच्या सावलीचे अस्तित्व घेऊन सोबत करतात. पूर्ण न होणारी गोष्ट म्हणजे शोध आणि तिथेच अनेक शक्यतांच्या वाटा असतात. काळाच्या ओघात टिकणारे साहित्य म्हणजे काही जडवलेले दागिने नाहीत तर प्रवाही असणारे आणि अनेक शक्यतांचे जन्म गहाण पडलेले साहित्य म्हणजे टिकणारे, उरणारे साहित्य. पठारे यांची जीवनदृष्टी कोणत्याच विशिष्ट सामाजिक आर्थिक आणि राजकीय अशा विचारप्रणालीशी बांधलेली नाही. ती जीवनविषयक दृष्टिकोनाचा व्यापक विचार करणारी आहे.तीत गणिते, हिशेब नाहीत. जसा माणूस तसेच लिखाण, त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या बेतलेल्या नसतात. एखाद्या उन्मुक्त प्रवाहाचे तितकेच स्वतंत्र आणि असांकेतिक वाहणे असावे असे ते नितळ लेखन आहे. त्यांचा कोणत्याही मतांचा अट्टहास नाही. आग्रह असलाच तर या व्यामिश्र आणि अनाकलनीय आयुष्याकडे माणूस म्हणून थेट आणि खोलवर बघण्याच्या दृष्टीचा आहे. मतप्रवाह हे बंध घालत असतात आणि जे पाणी तुंबते ते सडते इतके साधे तत्त्वज्ञान खरे तर निसर्गातून आले आहे. पठारे यांच्या लेखनप्रक्रियेचा ते स्थायी भाग आहे. मग त्यासाठी सामाजिक चौकटीच्या बाहेर जावे लागले तरी बेहत्तर, चित्र चौकटीबाहेरचे जास्त सांगत असते, गाणे सुरावटीच्या बाहेर बहारदार असते, तसे लेखनाचे आहे. ते चौकटी मानायला लागले की प्रचारकी होते, हेतुत: होते आणि तिथे मग त्याने काही-तरी शक्यता सोडण्याचा मूल्यवान क्षण गमावलेला असतो. ज्यांचे लिखाण बेतलेले असते, त्यांच्या बाबतीत शक्यतांचे शेवट झालेले असतात. कारण बेतण्याच्या प्रक्रियेतच इतर नाकारणे आहे. रंगनाथ पठारे यांनी मात्र हे कटाक्षाने टाळले आहे, इतके की, बेतलेले नसणे हेच त्यांच्या लिखाणाचे मर्म होऊन बसले आहे.

रंगनाथ पठारे यांचे व्यक्तिमत्त्व अगदी उमदे, दिलखुलास, कोणतेही ओझे आणि ओरखडे न घेता वावरणारे आहे आणि हे त्यांच्या चिंतनाचे सार असावे असे वाटते. असे असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक तटस्थपणा आहे. एक अलिप्तता आहे. म्हणजे असलेल्या रंगात नेहमीच मिसळून जाण्याचा त्यांचा पिंड नाही. हे म्हणजे स्वत:चे अस्तित्व वेगळे ठरवण्याचा अट्टहास ते करतात असे नाही तर असणाऱ्या, समोर येणाऱ्या बाबींना आपल्या अंगाने, आपल्या चिंतन-स्पर्शाने बघण्याचे, मोलाचे एकटेपण ते जपून ठेवतात. ते दुसऱ्याला बोचणारे टोकदार असे नसते तर स्वत्व शिल्लक उरेल इतके सहज असते. म्हणून पठारेसरांचा पंथ होत नाही आणि ती फार मोठी गोष्ट आहे. आता गंमत अशी की रंगनाथ पठारे यांच्या बाबतीत व्यक्तिमत्त्व आणि लिखाण हे द्वैत असू शकत नाही. ते अद्वैत आहे. ज्या लिहिण्याच्या निष्ठा त्याच जगण्याच्या. भूमिकांची सरमिसळ नाही, उगाच त्यात कुठलाही आव नाही. हे असे आहे म्हणून ते उमदे आहे. कारण ते निष्कारण अशा गुंतागुंतीच्या जगण्यातून मुक्त आहे. त्यामुळे त्यात शक्यता असू शकतात. ते एकरेषीय राहत नाही. ते बहुपेडी होते. त्याकडे बघण्याची परिमाणे वाढतात. परिमाणे आणि शक्यता ह्या एकमेकांशी जोडलेल्या असतात. माणूस नुसता घेता येत नाही तर त्याच्या त्याच्या संपूर्ण पर्यावरणासकट बघणे हा धागा त्यांच्या बहुपेडी लिखाणातून त्यामुळेच फडफडत असावा. यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांतील वास्तव चित्रण आणि मराठीतील इतर साहित्यातील वास्तववादी लिखाणात फरक आहे. माणसाचे अस्तित्व नेहमीच त्याचे बाह्य जीवन आणि आंतरिक जगणे यांच्या सांध्यावर उभे असते, ही धारणा वेगळा वास्तववाद जन्माला घालते. त्यांच्या कथा-कादंबरीतील व्यक्तिचित्रे एकाच अंगाने सामोरी येत नाही, तर त्यांचे एकूण अवकाश आपल्या मनाला घेरून टाकते. प्रत्येक व्यक्तिरेखा पर्यावरणसमग्र असते आणि त्यामुळे काहीही घटना कादंबरीत घडल्या तरी ते सारे पर्यावरण आपल्या मनात मागे



**रंगनाथ पठारे**

रेंगाळते. म्हणून 'ताम्रपट'मधील सीताआजी, 'दिवे गेलेले दिवस'मधील भास्करराव, 'चोषक'मधील राघव, 'रथ'मधील रावसाहेब निकम, 'टोकदार सावलीचे वर्तमान'मधील प्रा. भांगरे, 'चक्रव्यूह'मधील प्रा सक्सेना आणि संशोधक गोपीचंद रहाणे, 'हरण'मधील हरिभाऊ अशा अनेक व्यक्तिरेखा अख्खे पर्यावरण घेऊन येतात. त्या सुट्या सुट्या येत नाहीत. काळ तर वाहतीच बाब आहे, त्याचा तुकडा नाहीच.

'टोकदार सावली'तील हा उतारा पाहा- 'वर्तमान सुटे वगैरे असे काही नसते. अख्ख्या भूतकाळाची त्याच्यावर सवाली असते. एखाद्या कृष्णविवारासारखा भूतकाळ प्रत्येक वर्तमानाला सारखा गिळतच असतो. मान्य आहे, की हे स्थळकाळाच्या चौकटीत घडत असते, तरी भूतकाळाच्या सर्वभक्षी गाठोड्याची म्हणजे त्याच्या असण्याची जाण ही फारच त्रासदायक गोष्ट आहे आणि भविष्यालाही हे गाठोडे सुविहितपणे नियंत्रित करते म्हणे. ढोबळपणे म्हणायचे तर भूत व वर्तमान आणि भविष्य हे काही अशा कणखर सूत्रांनी बांधलेली असतात.'

अर्थात हे मी म्हणतो, नायक अशा अर्थाने म्हणत नाही. कारण पठारे यांच्या साहित्य-आशयाला नायक, सहनायक असल्या चौकटी नाहीत. त्यांच्या अनेक व्यक्तिरेखा आपल्या स्वतंत्र आणि वेगळ्या आशयसूत्राने येत असतात. त्यांची आयुष्ये एकमेकांत घटनांच्या वाटांवर मिसळतात आणि पुन्हा आपल्या पावलांनी चालू लागतात. हे असले चितारणे सोपे नाही. प्रत्यक्ष आयुष्यातील विस्कळीतपणा असा व्यामिश्रपणे गुंतवून ठेवणे आणि शिवाय त्यांच्या वेगळ्या धाग्यांची फडफड होत राहील असा पट लिहिणे मोठ्या दमाचे काम आहे. 'ताम्रपट' ते 'सातपाटील' या विस्तृत कादंबऱ्यात ते आपल्याला भिडते, जाणवते आणि आपल्या जाणिवांना लपेटून राहते.

आपला समाज जसा मिथकांचा आहे तसा जातीच्या उतरंडीचा आहे. या जातव्यवस्थेचे एक परस्परावलंबित्व आहे. जातीच्या कुठल्यातरी साच्यात जन्माला आलेल्या माणसाची जीवननिष्ठा, जातीच्या संदर्भाचे अवकाश घेऊन येते. यात चांगले आणि वाईट असे काहीही नसून जसे अमेरिकेतील टेक्सास, नॉर्थ डाकोटा, मिसिसिपी, अर्कान्सास अशा विविध राज्यांतील एकाच समाजवर्गाचे लोक आपल्या विशिष्ट जगण्याच्या चौकटी घेऊन येतात आणि त्यांच्या आयुष्याचे आलेख चितारायचे असतील तर त्यांची ही वैशिष्ट्ये यातून वगळता येत नाहीत, असेच आहे ते. जगातील सगळ्या आदिम जमातींच्या जगण्यात आहे ते आपल्याकडे त्याला जात म्हणतात इतकेच. त्या समाजघडीतून होणारे शोषण वगैरे, ही कृत्ये झाली किंवा गतीज बाबी झाल्या. मी समाजाच्या एका स्थितीज अवस्थेचे बोलतो आहे. त्या अर्थाने मराठा असणे हे स्थितीज वैशिष्ट्य आहे. मग जात कोणतीही का असेना.जातीचे अभिमान हे बहुधा शिल्लक राहण्याच्या, आपली वेगळी ओळख जपण्याच्या, नियत आणि भीतीतून उत्पन्न होतात. पण हे जे काही मराठा समाजाचे स्थितीज आहे ते फार महत्त्वाचे आहे आणि आपल्या साहित्यातून ते विस्तृतपणे मांडताना रंगनाथ पठारे सरांची लेखणी अधिक गडद अधिक व्यापक होत जाते. आयुष्यभर जगलेल्या, जपलेल्या मूल्यांचा जयजयकार न करता, त्यांची थेट सखोल चिकित्सा करणे ही अत्यंत प्रामाणिक भूमिका पठारेसर घेतात आणि ती बळ देणारी आहे. सातपाटील कुलवृतांत या त्यांच्या ताज्या कादंबरीत तर हा स्तर वैश्विक होतो. अफगाण, मराठा आणि इंग्रज अशा त्रिपुटीचे अवकाश तो अस्सलपणे शोधतो. असले चिरेबंदी आणि मजबूत, तब्बल आठशे वर्षांच्या एतद्देशीय समाजाचा महाकाय पट चितारणारे लिखाण अनेक वर्षे मागे उरणारे आहे. मराठी साहित्यात या रुंदपणाचे, असल्या मूलभूत धारणेचे आणि बेतलेले नसलेले, असे लिखाण अत्यल्प आहे.

त्यांच्या 'टोकदार सावलीचे वर्तमान'मध्ये माणसांची आर्थिक परावलंबित्व कमी झाले, जगण्याचे मूळ संघर्ष विसावले की माणसे मग छोट्या अस्मितेच्या मागे लागतात, हे निरीक्षण फार विलक्षण आहे.

त्यांच्या 'चोषक फलोद्यान' या कादंबरीचा उल्लेख तर त्यांच्या स्वत्वाचा उच्चार आहे असे मला वाटले आहे, कारण ही अंतरीच्या उजेडाची गोष्ट आहे. ही कादंबरी संपते तेव्हा एखाद्या माळरानावर, जिथे सावलीचे, उन्हाचे कोणतेही हेलपाटे असत नाहीत अशा मोकळ्या माळरानावर आपण पोचतो. आकाश, प्रकाश, पाणी आणि जमीन अशा आपल्याच शरीराला जन्म देणाऱ्या पंचमहाभूतांच्या तावडीत आपण असतो. मनाचे सारे विभ्रम, भावनांच्या फोलकट वाटेवरचे सारे पाणीदार खेळ आणि या सृष्टीच्या भासचक्राचे सारे तोल तेथे गळून पडलेले असतात. एका मानसिक वावटळीची ती अटळ सुरुवात असते. तेथे ही कादंबरी घेऊन जाते. पठारेसरांच्या सहजलेखनाची ताकद अशी की तिथे एकापाठोपाठ येणाऱ्या शब्दांच्या भुरुभुरु वाऱ्याने आपले मन झिरझिरीत होऊ लागते.

बासरीच्या सुराने मनाला लागलेली वाळवी उतरावी तसे आपले होते. एकदम लख्ख प्रकाश पडतो. खरे तर उजेड हा उचित शब्द. उजेडाचे अस्सलपण प्रकाश या शब्दात नाही. प्रकाश परावलंबी आहे, उजेडाचे तसे नाही. 'चोषक' वाचताना अशा उजेडाची लागण होते.

'दिवे गेलेले दिवस' या आणीबाणीच्या काळात माझ्यासारख्या लोकांची आयुष्ये ही थरथर अवस्थेत होती, त्याचे चित्रण असणारी ही कादंबरी. मनात लपेटून बसलेले ते दिवस. 'दुःखाचे श्वापद', 'नामुष्कीचे स्वगत' या कादंबऱ्या तर मनात एखाद्या अश्वत्थवृक्षासारख्या रुतून राहिल्यात. सार्वकालिक असे हे सर्व लिखाण आहे. जीवनाबद्दलची एक अतूट असोशी आहे. हे असे सगळे साहित्यातून झिरपत असल्याने पठारेसरांच्या कादंबरीला त्यामुळे सामाजिक, वास्तववादी, मनोविश्लेषणात्मक अशी गोंधळी लेबले लावणे हा भंपकपणा ठरावा.

विस्तीर्ण वाचन, १४ कादंबऱ्या, सात कथासंग्रह, सात समीक्षा, दोन अनुवाद, अशी त्यांच्या साहित्याची अत्यंत खोल-रुंद अशी सर्जनाची संपृक्त नदी तिच्या काठावर तीन पिढ्या पोसल्या गेल्या. त्यांच्या कादंबऱ्यांचे कन्नड, हिंदी आणि इंग्रजी भाषांत अनुवाद झाले आहेत. त्यांच्या साहित्यावर नऊ पीएचडी प्रबंध, चार पुस्तकं, आहेत. बरे हे सगळे लिहीत असताना, ३७ वर्षे भौतिकशास्त्र अशा केवळ तर्कशुद्ध विषयाची प्राध्यापकी करणारा, ब्रह्मांड ते पिंड असा विलक्षण परीघ मनात घेऊन जगलेला हा माणूस. लेखक आणि माणूसपणाच्या सांध्यावर दणकटपणे उभा ठाकलेला असा हा अद्वैत प्रवासी. चार पावले सरांबरोबर चालायला मिळत आहेत याचे अप्रूप जपत थांबतो.

**- दीपक करंजीकर**
भ्रमणध्वनी : +९१ ९८८१५४६५७८
deepak.karanjikar@gmail.com

ग्रंथाली




**माध्यमयात्रेतील माणसं**

रविराज गंधे

सिनेमा, साहित्य, संगीत आदी विविध क्षेत्रांतील नामवंत दिग्गजांच्या मुलाखती-संस्मरणाचा संग्रह

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

ग्रंथाली

**डॉ. अनंत देशमुख यांची दोन पुस्तके**




**नाट्यविचार**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

एकोणिसाव्या शतकातील मराठी नाटक आणि रंगभूमी हा डॉ. अनंत देशमुख यांचा अभ्यासाचा आणि आस्थेचा विषय आहे. त्यांची निरीक्षणे आणि त्यांनी काढलेले निष्कर्ष मराठी नाटक आणि रंगभूमीविषयक जिज्ञासूंचा आणि जाणकारांचा निश्चितच विचारांना खाद्य पुरविणारी आहेत.

**नाट्यसमीक्षा**




**मूल्य ५०० रु.**
**सवलतीत ३०० रु.**

एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातील मराठी नाटक आणि रंगभूमीचा अभ्यास हे डॉ. अनंत देशमुख यांच्या आवडीचे एक कार्यक्षेत्र. त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीमुळे, अभ्यासपणामु आणि स्वतंत्र विचारप्रकटीकरणामुळे आपल्याला अंतर्मुख करते. आजुबाजूला परंपरागत आणि वरवरचे समीक्षालेखन होत असताना त्याचे मोल डोळ्यांत भरल्याशिवाय राहत नाही. अभ्यासकांना त्यामुळे हे पुस्तक उपयुक्त ठरावे अशी खात्री वाटते.



# सुमती लांडे एक अफलातून व्यक्तिमत्त्व

**श्रद्धा बेलसरे**

सुमती लांडे म्हटले की एक गोरीपान, अपऱ्या नाकाची, उत्सुक डोळ्यांची, केस काहीसे अस्ताव्यस्त आणि चेहऱ्यावर पसरट हसू असलेली साध्याशा पांढऱ्या साडीतली मुलगी माझ्या डोळ्यांसमोर येते. आणि हो, तिच्या डोक्यावर एक भलीमोठी टोपली असते. त्या टोपलीत दाबून भरलेली पुस्तके असतात. टोपली सांभाळताना ती खांद्याला अडकवलेली शबनम ही सावरत असते आणि तशाही अवस्थेत कायम धावण्याच्या 'मोड'मध्येच असते!

तिची-माझी ओळख होऊन आता किमान चार दशके झाली असावीत. तिला १९८०-८१मध्ये श्रीरामपूरजवळील अशोकनगर साखरकारखान्यात साहित्यसंमेलन घ्यायचे होते. ती त्या कार्यक्रमाची संयोजक होती. औरंगाबाद येथील साहित्यिकांना भेटण्यासाठी आणि निमंत्रित करण्यासाठी ती आणि अभिनंदन थोरात माझ्या घरी आले होते.

खरे सांगायचे म्हणजे पहिल्या भेटीत आम्ही एकमेकीना बिलकूलच आवडलो नाही. पुढे मात्र आमच्यात गाढ मैत्री कशी होत गेली ते आम्हाला कळलेच नाही. ती आजवर टिकून आहे, निरपेक्षपणे!

त्यावेळी 'ग्रंथाली' वाचक चळवळ नुकतीच जोम धरू लागली होती. आम्ही दोघी काहीतरी नवे करू पाहत होतो. समोरचे राजमार्ग सोडून वेगळे मार्ग चोखाळायचे होते. श्रीरामपूरचे ग्रंथालीचे केंद्र सुमतीकडे तर औरंगाबादचे केंद्र माझ्याकडे देण्यात आले होते. त्याचे अनेक कार्यक्रम आम्ही करायचो. विजय तेंडुलकर यांच्या 'संवादयात्रे'चे आयोजन आम्ही केले होते. त्यानिमित्ताने मुंबईला जावे लागायचे.  ग्रंथाली चळवळीत आमची जोडी त्यावेळी प्रसिद्ध झाली होती.

त्यावेळी राज्य शासनाची 'सुशिक्षित बेरोजगार योजना' होती. त्यात सुमतीने पंचवीस हजार रुपयाचे कर्ज घेतले आणि श्रीरामपूर येथे पहिले 'ललित साहित्य' विक्रीचे दुकान सुरू केले.  हे फार मोठे धाडस होते. पण तिने ते केले. त्यापूर्वी मी 'स्वरूप' नावाचा एक दिवाळी अंक काढत होते. सुमती दुसऱ्या अंकापासून माझ्याबरोबर होती. पुढे मग मी सरकारी नोकरीत लागले आणि माझे अंक काढणे बंद पडले. सुमतीने मात्र तो वसा टाकला नाही. तिच्या 'शब्दालय' या दुकानाबरोबर तिने 'शब्दालय' नावाने एक दिवाळी अंकही काढायला सुरुवात केली. सतत पंचवीस वर्षे अंक काढून तिने साहित्यविश्वात एक विक्रम निर्माण केला. 'शब्दालय' हा अनेक वर्षे दिवाळी अंकांतील एक मानदंड ठरला होता.

पुस्तकविक्री आणि दिवाळी अंकाबरोबर तिने प्रकाशन-व्यवसाय सुरू केला आणि अनेक नामवंतांची पुस्तके प्रकाशित केली. आतापर्यंत एक हजाराहून जास्त पुस्तके प्रकाशित केली आहेत. उस्मानाबाद येथील साहित्यसंमेलनात 'शब्दालय'ला उत्कृष्ट प्रकाशकाचा पुरस्कार मिळाला. तिने काढलेली अनेक पुस्तके विविध विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट झाली आहेत. अनेक लेखकांचे लेख आणि कविता शालेय अभ्यासक्रमात लागल्या आहेत.

पुस्तके विकणे ही मराठी साहित्यविश्वात फार अवघड बाब आहे. त्याही काळी दुकानात येऊन पुस्तके खरेदी करणारे लोक विरळाच असायचे. त्यातही श्रीरामपूरसारख्या तालुक्याच्या ठिकाणी फार कमी विक्री व्हायची. मग सुमतीने एक शक्कल लढवली. एका जीपमध्ये पुस्तके भरून तिने जिल्हावार दौरे सुरू केले. या दौऱ्यात रात्री कधीही झोपली तरी तिचा दिवस सकाळी सहाला सुरू व्हायचा. ती सात वाजता कुठल्या तरी कॉलेजच्या वाचनालयात गेलेली असायची. अख्ख्या महाराष्ट्रात गावागावातल्या छोट्या-मोठ्या वाचनालयांना आणि कॉलेजांना भेटी देऊन ती पुस्तके विकत असे. वर्षातील सहा महिने तिचा हा कार्यक्रम सुरू असतो.

सुमती चांद्यापासून बांद्यापर्यंतच काय तर महाराष्ट्राची सीमा पार करून ती बेळगाव, गोवा येथेही जाते. तिच्या लाघवी आणि साध्या वागणुकीमुळे तिने असंख्य माणसे जोडली आहेत. साहित्यावरच्या प्रेमामुळे नव्याने लिहीत असलेल्या कवी-लेखकांना ती शोधत असते आणि त्यांच्या साहित्याला प्रकाशात आणते.



**सुमती लांडे**

सुमती उत्तम संघटक आहे. कायम तिच्या घरी छोट्या-मोठ्या साहित्यिकांचे, मान्यवरांचे येणेजाणे असते. तिचा ऐसपैस पाहुणचार लेखकांना सुखावतो. मीसुद्धा अनेकदा तिच्याकडे राहून पाहुणचार घेतला आहे. तिचे आईवडील, पती आणि मुले हेसुद्धा आथित्यशील आहेत.

सुमती तिचा व्यवसाय अतिशय नेटाने करते. दररोज संध्याकाळी छोट्या डायरीत तिचा हिशोब लिहिलेला असतो. ती कुठलाही वायफळ खर्च करत नाही. घरी गाड्या आहेत म्हणून गरज नसताना ती गाडी वापरत नाही. लहान काम असेल आणि पुस्तकांचे ओझे नसेल तर सुमती आजही एस.टी. बसने प्रवास करते. पूर्वी तर ती बस मिळाली नाही तर ट्रकमध्येही बसून दौऱ्यावर गेलेली आहे.

कधी-कुठे-काय करायचे याचे तिचे ठोकताळे असतात. तिचा विचार ठरलेला असतो आणि कुणाच्या प्रभावाने ती विचार बदलत नाही. तिच्या निर्णयावर ती ठाम असते.

आजवर 'शब्दालया'च्या दिवाळी अंकाला अनेक पुरस्कार मिळाले. आतापर्यंत तिने शेकडो पुस्तके प्रकाशित केली आहेत. छोट्यामोठ्या लेखकांबरोबरच साहित्य अकादमी पुरस्कार विजेते रंगनाथ पाठारे यांची सर्व पुस्तके प्रकाशित करण्याचा मान तिला मिळाला आहे. नुकताच शब्दालय प्रकाशनाला महाराष्ट्र शासनाचा तीन लाख रुपयांचा 'श्री.पु. भागवत पुरस्कार' मिळाला तेव्हा आम्हा सर्वांना खूप अभिमान वाटला.

सुमती मुळात कवयित्री आहे. तिचे 'वाहते अंतर' आणि 'कमळकाचा' हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. महाविद्यालयीन काळात तिने लिहिलेली 'गेंडा' ही कविता खूप गाजली होती. स्त्रियांना त्यांचे अधिकार देण्यासाठी बंड केलेल्या महिलांबाबत तिला अतिशय आदर होता. त्यांचे प्रातिनिधिक वर्णन करताना ती एका कवितेत म्हणते-

शेणामेणाची व्हायचे तिने नाकारले.
आणि मग तिच्या उडत्या पदराची चर्चा,
गावभर झाली...

अशा प्रकारच्या अनेक मनस्वी आणि भावगर्भ कविता तिने लिहिल्या आहेत.

कवितेबरोबरच तिने अनेक ग्रंथांचे संपादनही केले आहे. स्त्रीवाद, स्त्रीपुरुष नातेसंबंध, वाङ्मयीन चळवळी आणि दृष्टिकोन, रंगनाथ पठारे साहित्य समीक्षा भाग १ आणि भाग २ या ग्रंथांचे लेखन आणि संपादन तिने केले आहे. महाराष्ट्रातील जुन्या-नव्या लेखकांशी ती कायम संपर्कात असते. ती एक चांगली श्रोताही आहे. ती विविध परिसंवाद ऐकण्यासाठी जाते. त्याची टिपणे काढून ठेवते.

व्यक्तिगत आणि व्यावसायिक आयुष्यात अनेक दु:खांचा, संकटांचा सामना करावा लागूनही त्याबाबतची खंत तिच्या बोलण्यातून कधी व्यक्त होत नाही. तिच्या चेहऱ्यावरचे हसू कधीही कमी झाले नाही. आजही ती दिवसभर व्यवसायाच्या इतर कामांबरोबर नव्याने येणाऱ्या पुस्तकांची प्रूफे निगुतीने तपासत असते.

पूर्वी आम्ही खूप भेटायचो. काव्यवाचनासाठी अख्खा महाराष्ट्र आम्ही पालथा घातला आहे. जळगाव येथील साहित्यसंमेलन अजूनही आठवते. तेथे आम्ही उसाचा रस आइस्क्रीमसह घेतला होता. संमेलन संपल्यावर बसस्टँडवर आलो तर औरंगाबादला जाणारी बस नव्हती. आता काय करायचे असे वाटले तर सुमती म्हणाली, 'थांब काळजी करू नकोस.' मग तिने कुणाशीतरी बोलून आम्हाला म्हणजे मी व माझ्या बहिणीला सांगितले, 'पुण्याचा पुस्तके घेऊन जाणारा एक ट्रक परत जात आहे. आपण त्यात जाऊया.' मी घाबरले तर ती म्हणाली, 'काय घाबरतेस. मी आहे ना?' मग आम्ही तिघी ट्रकच्या मागच्या भागात पुस्तकांच्या गठ्ठ्यांबरोबर प्रवास करून औरंगाबादला आलो. त्यावेळी मी प्रथमच रात्री धाब्यावर जेवले. खूप मजा आली होती. अशी धाडसी कामे सुमतीबरोबर करताना फार मजा येत असे.

आता आम्ही दोघीही खूपच निवळलो आहोत. फोन, भेटी कमी होतात. पण, भेट होते तेव्हा सुखदु:खाच्या गोष्टी करताना वेळ अपुरा पडतो. अनेकदा न बोलता, न सांगता, अंतरीचे अंतरीला कळत जाते. कदाचित हीच खऱ्या मैत्रीची खूण असावी!

**- श्रद्धा बेलसरे खारकर**
भ्रमणध्वनी : ८८८८९५९०००
shraddhabelsaray@yahoo.com



# सानेगुरुजींच्या भूमीतला बालसाहित्यिक

**नरेंद्र लांजेवार**

**आ**बा गोविंद महाजन यांच्या 'आबाची गोष्ट' या पुस्तकाला २०२० या वर्षीचा बाल साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आणि खानदेशच्या मातीचा, अहिराणी बोलीचा व सातत्यपूर्ण बालसाहित्य लेखनाचा सन्मान झाला आहे. संपूर्ण बालसाहित्याच्या क्षेत्रातून योग्य व्यक्तीची निवड झाल्याने आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

जळगाव जिल्ह्यातील एरंडोलमध्ये सालदाराच्या घरात जन्मलेल्या आबा गोविंद महाजन यांनी शिक्षक, नायब तहसीलदार ते तहसीलदारपदापर्यंत मजल मारली. त्यांनी बालसाहित्यात राज्य पुरस्काराची हॅटट्रिक केल्यानंतर 'आबाची गोष्ट' या कथासंग्रहावर बालसाहित्यातील साहित्य अकादमीची मोहोर उमटली.

आबा गोविंद महाजन यांचे अभिनंदन केल्यावर, प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करणाऱ्या जिद्दी मुलांच्या या कथासंग्रहाची दखल साहित्य अकादमीने घेतल्याने मनस्वी समाधान वाटल्याचे आबा महाजन यांनी सांगितले. ''एरंडोलमध्ये सालदाराच्या कुटुंबात माझा जन्म झाला. आबाची गोष्ट या कथासंग्रहातील सतरा कथांपैकी निम्म्या कथा एरंडोलच्या वातावरणातील खानदेशी बोलीत आहेत. प्राथमिक शिक्षण तेथेच झाले. नोकरी लवकर मिळण्यासाठी मी डी.एड. केले जामनेर व एरंडेल तालुक्यांत प्राथमिक शिक्षक म्हणून काम केले. तेथे सानेगुरुजी, बालकवी, बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्याचा लळा लागला. स्वतः मुलांसाठी लिहावे असे वाटू लागले. तेथूनच बालसाहित्याचा प्रवास खऱ्या अर्थाने सुरू झाला. १९९४ मध्ये माझी पहिली कविता. 'किशोर' मासिकात प्रसिद्ध झाली. सन २००१ मध्ये 'गमतीच्या राज्यात' हे माझे पहिले पुस्तक महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेतून प्रकाशित झाला. त्याला अनेक पुरस्कार मिळाले. राज्य शासनाचे तीन वेळा पुरस्कार बालसाहित्य विभागाचे माझ्या तीन कवितासंग्रहांना मिळाले. मी २०१० मध्ये नायब तहसीलदार झालो तोपर्यंत पारंपारिक साचेबंद पद्धतीने बालसाहित्य लिहित होतो. बाल साहित्यामध्ये प्रयोग करणे आवश्यक असल्याचे मत मला वाटू लागले. तोच तो प्रकार मुले वाचत नाहीत, म्हणून मी विविधांगी प्रयोग करायला सुरुवात केली. 'मन्हा मामानंगावले जावू' या पुस्तकात अहिराणी मराठी अशा द्विभाषिक प्रयोग केला. याही पुस्तकाला राज्य शासनाचा बालकवी पुरस्कार मिळाला. 'मन्हा गावले' अहिराणी बोलीतील पुस्तक प्रकाशित झाले. आबाची गोष्ट हा कथासंग्रह प्रमाण भाषेतील असला तरी खानदेशी बोलीतील शब्द त्यात पेरले आहे, मुलं सहज वाचतील अशा कथा या संग्रहात आहेत.'' हा कथासंग्रह वाचल्यानंतर अनेक मान्यवरांच्या प्रतिक्रिया चांगल्या होत्या, असे मत पुरस्काराचा आनंद व्यक्त करताना आबा महाजन यांनी व्यक्त केले

आबा गोविंद महाजन हे बालसाहित्यातील सर्व वाङ्मयप्रकार हाताळणारे व्यक्तिमत्त्व आहेत. अतिशय गरिबीतून, कष्टातून, ग्रामीण भागातून आलेल्या या मुलाने शिक्षणाच्या भरवशावर तहसीलदारपदापर्यंतची मजल गाठली आहे. तहसीलदार होण्यापूर्वी ते खानदेशमध्ये शिक्षक होते. शिक्षक असल्याने विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी त्यांचा जवळचा संबंध आला. त्यातूनच साहित्यवाचन आणि लेखनाचा छंद त्यांनी जोपासला. त्यांना बालसाहित्या-लेखनाची नेमकी नस गवसली.. त्यातच त्यांनी अनुभवलेल्या बालपणातील कडूगोड आठवणी आणि अनुभवसाठा याद्वारे ते बालसाहित्यलेखनात व्यक्त होत गेले. ग्रामीण भागातील वास्तव आणि विपरीत परिस्थितीला सातत्याने तोंड देत राहिल्याने ती परिस्थिती इतरांसाठी प्रेरक बणू शकते या अनुषंगाने त्यांनी बरेच बाल-कुमार कथा आणि काव्यलेखन केले आहे. त्यांचे साहित्य आज उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठांमध्ये आणि आठवी सुलभभारती, चौथी बालभारती या पाठ्यपुस्तकांतील अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट झाले आहे.

सानेगुरुजींच्या बालसाहित्याशी नाते सांगत सांगत त्यांनी

‘गमतीच्या राज्यात’, ‘रिमझिम गाणी’, ‘लई मज्जा रे’, ‘बिस्कीटचा बंगला’... इत्यादी त्यांचे कवितासंग्रह आणि ‘मौजमजा’ हा शिशुगीतसंग्रह प्रकाशित आहे. ‘चिऊचा मोबाईल’ आणि ‘वाघोबाची गांधीगिरी’ हे दोन बालविनोद कवितासंग्रह प्रकाशित आहेत. चार ओळींचा द्विभाषिक बालकविता संग्रह असा आगळावेगळा, प्रयोग गमतीदार खेळांचा खजिना आणि किशोर-कुमारांसाठी कवितासंग्रह आपल्याला बघायला मिळतो. अहिराणी बोलीभाषेतील ‘मन्हा मामाच्या गावले जाऊ, मन्हा गावले’ हे त्यांचे बालकवितासंग्रह प्रकाशित आहे. त्यांची ‘ठोंब्या’ ही बालकादंबरी बालसाहित्यात विशेष आहे. त्यांचा शेखचिल्लीची ‘फुल-टू-धमाल’, ‘बाबाची गोष्ट’ हे दोन कथासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या काही पोस्टर कवितासुद्धा प्रकाशित आहेत. त्या अनेक शाळा, महाविद्यालयांमध्ये आणि ग्रंथालयांमध्ये बघावयास मिळतात. यामध्ये शाळा, आपले घर, शिक्षक, शेतकरी राजा, ग्रंथ महिमा, इत्यादी विषय मांडले आहेत.

त्यांनी ‘ऑपरेशन भोंदूबाबा’ हे बालनाट्य आकाशवाणी जळगाव केंद्र यासाठी लिहिले आहे. त्यांच्या साहित्यावर अनेकांनी पुस्तके संपादित केली आहेत. त्याध्ये डॉ. संगीता म्हसकर, कविता महाजन, संगीता माळी, डॉ. किसन पाटील, जगदीश पाटील, मैत्री लांजेवार अशा अनेकांनी संपादने केली आहेत. त्यांच्या बऱ्याच कविता अहिराणी भाषेत प्रकाशित झाल्या आहेत. अहिराणी भाषा ही जळगाव खानदेशमध्ये बोलली जाणारी बोलीभाषा आहे. या भाषेत प्रचंड गोडवा आहे. सानेगुरुजी, बहिणाबाई चौधरी, निसर्गकवी ना.धों. महानोर, विंदा, पाडगावकर यांच्या जातकुळीशी नाते सांगणारी बालकविता आबा महाजन यांनी पुढे नेली आहे. महाराष्ट्र शासनाचे तीन वेळा राज्य पुरस्कार त्यांना मिळाले






आबा महाजन

आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषद, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य परिषद, बापूसाहेब ठाकरे बालवाङ्मय पुरस्कार, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य पुरस्कार, पृथ्वीराज तौर उत्कृष्ट मातोश्री पुरस्कार, शशिकला आगाशे स्मृती पुरस्कार आदी पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

खानदेशमधील एरंडोल या गावात त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. घरी पाच एकर कोरडवाहू जमीन. वडील दुसऱ्याच्या शेतात सालदार, काबाडकष्ट करून आयुष्य गेलं. बालपणीच आई वारली. आत्या, मावश्या, काकूंनी त्यांचा सांभाळ केला. सुटीमध्ये शोधतात काम, कधी ढोरामागे जाणे, भाजीपाला विकणे, बोरे विकणे, असे करत करत कसबसे शिक्षण पूर्ण केले. इतर मोठे श्रीमंत शेतकरी मालक, ‘शिकून काय तू मामलेदार होणार आहेस? ढोरं ओढ...’ असे बोलत त्यावेळेस आबा महाजन यांचे मन दुखायचे.

वाचनाशिवाय पर्याय नाही. आपण वाचत, अभ्यास करत


ग्रंथाली




# सोलो

**सोनाली लोहार**

असं म्हणतात, की प्रचंड गर्दीचा भाग असूनही प्रत्येक माणूस खरंतर आतून एकटाच असतो. तो आतला माणूस हाच ‘खरा माणूस’. जो विशुद्ध आहे, मंगल आहे, प्रचंड ऊर्जेचा स्रोत आहे. त्यातल्या आतल्या शुद्ध आवाजाचा शोध म्हणजेच... सोलो!


**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

# करोनांगुली

**विवेक मोहन गद्रे**

‘करोनांगुली’ हा वेगळ्याच नावाने संग्रह असला, तरी ह्या संग्रहातील कवितांचा करोनाशी तसा फार संबंध नाही. गद्रे यांच्या मनात साचून राहिलेल्या कैक वर्षांतील सुप्त भावना व्यक्त करण्यासाठी त्यांनी केलेली काळाची ही पाठराखण.

**– अरुण म्हात्रे, कवी**




**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

राहिले पाहिजे.. शिकत राहिले पाहिजे या ध्येयाने प्रेरित होऊन बारावीनंतर त्यांनी शिक्षकी पेशा स्वीकारला आणि स्पर्धापरीक्षेची तयारी सुरू ठेवली. २००९ मध्ये महाराष्ट्र एमपीएससीमार्फत ते तहसीलदार बनले. सालदाराचा मुलगा ते तहसीलदार हा प्रवास त्यांना खूप अनुभवांची शिदोरी घेऊन गेला. याच अनुभवांच्या पेरणीवर त्यांनी 'आबाची गोष्ट' लिहिली आहे. हे पुस्तक पुण्याच्या दिलीपराज प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले आहे. या पुस्तकात स्वानुभवावर आधारित सतरा सत्य गोष्टी त्यांनी लिहिल्या आहेत. जीवनात जे काही अनुभव घेतलेले आहेत, जे मनाला भावले आहेत, ते त्यांनी लिहून काढले आहेत. या पुस्तकाची पाठराखण बालसाहित्यिक डॉ. रणजित शिंदे यांनी केलेली आहे.

'आबाची गोष्ट' या पुस्तकात शाळकरी मुलांच्या भावविश्वाच्या कथा आहेत. संस्कार व बोधकथा असे त्याचे स्वरूप आहे. या कथांचा चित्रणप्रदेश आहे. ग्रामीण निमशहरी असा प्रतिकूल अवस्थेत धडपडणाऱ्या परिस्थितीशी दोन हात करणाऱ्या प्रमाणिक, जिद्दी मुलांच्या या संघर्षकहाण्या आहेत. या मुलांच्या जोडीला पालकांचे एक जग त्यांच्या भल्या-बुऱ्यासह या कथांमध्ये चित्रित झाले आहेत. किशोरवयीन मुलांच्या चित्रणात प्रेरक दृष्टी आहे. सामाजिक सहिष्णुता, समता, सत्य, सचोटी चांगुलपणा या तत्त्वांचा आविष्कार करणारी दृष्टी या गोष्टींमध्ये आहे.

सानेगुरुजींच्या शिक्षकी पेशात राहिल्यामुळे सानेगुरुजींच्या शाश्वत मूल्यांची पेरणी करणाऱ्या गोष्टी आणि स्वतः बालसाहित्यात विविधांगी प्रयोग करून स्वतःची विकसित करत गेलेली बालसाहित्याची लेखनशैली, यामुळे आबा गोविंद महाजन यांचे बालसाहित्य बालकांनाच आवडते असे नव्हे तर शिक्षकांना आणि पालकांनाही ते मनापासून भावते. त्यांचा 'ठोंब्या' हा बालनायक बालवाचकांना विशेष भावतो.

'आबाची गोष्ट' या कथेमध्ये आबा गोविंद महाजन यांनी त्यांच्या बालपणीच्या आठवणी सांगितल्या आहेत. चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे पुस्तक विकत घ्यायला पैसे नसताना शेतातील बोरे विकून त्यातून आलेल्या पैशांतून त्यांनी पुस्तक विकत घेतले. दिवस-रात्र वाचून काढले, परीक्षा दिली तरी परीक्षेत यश आले नाही. मग त्यांच्या गोरेगुरुजींनी धीर आणि आधार दिला. पुढच्या परीक्षांमध्ये यश मिळव, चांगला अभ्यास कर...हा त्यांना सल्ला दिला. आबांचे पुढे अभ्यासाशी नाते अधिक घट्ट जोडून आले. शिक्षकी पेशा स्वीकारल्यावर त्यांनी स्पर्धापरीक्षेचा मार्ग निवडला आणि पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होऊन ते तहसीलदार म्हणून नियुक्त झाले. आपण घेतलेल्या कष्टांची परतफेड झाल्याचा आनंद त्यांना झाला. ही सत्यघटनाच त्यांनी 'आबाची गोष्ट' या साहित्य आकादमी पुरस्कारप्राप्त शीर्षक कथेमध्ये सांगितली आहे. हा कथासंग्रह त्यांनी आपल्या आई-वडिलांना, भाऊ-बहीण आणि आत्याला समर्पित केला आहे. 'गारपीट' या गोष्टीत, शेतकरी व गायवासरू गारपिटीमध्ये मृत्यू पावतात ही हृदयद्रावक कथा वाचकांना भावविभोर करते. रिक्षावाल्याचा प्रामाणिकपणा, मराठी सहावा मॅट्रिक, मला शिकायचं, बोलका वर्ग, कष्टाळू चोर, गुरढोरं आणि पुस्तक, दोस्ती रामरहीमची इत्यादी सर्वच कथांमधून आबा महाजन बालवाचकांमध्ये बंधुभावाची पेरणी करतात. बालवाचकांची नेमकी नस आणि बालसाहित्यलेखनाची भाषाशैली त्यांना गवसल्यामुळे त्यांचे बालसाहित्य बालकांच्या आणि पालकांच्या पसंतीस उतरले आहे. आबा गोविंद महाजन नावाच्या या कष्टकरी व्यक्तिमत्त्वाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व त्यांच्यातील बालसाहित्य लेखनातील प्रयोगशीलता अशीच विकसित होत जावो यासाठी त्यांना मनापासून सदिच्छा...

**– नरेंद्र लांजेवार**
भ्रमणध्वनी : +९१ ९४२२१८०४५१
l_narendra2001@yahoo.com

**ग्रंथाली**



**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २५० रु.**

## चंबुखडी ड्रिम्स


डॉ. जगन्नाथ पाटील

अत्यंत सामान्य स्थितीतील तरुण अपयशाच्या अनेक झटक्यांतून सावरून फिनिक्स पक्ष्याप्रमाणे कसा भरारी मारतो, याची ही चित्तवेधक कहाणी आहे.


## एकला चलो रे!

बी.जी. वाघ

'एकला चलो रे' हे पुस्तक म्हणजे लेखकाने जीवनभर घेतलेले अनुभव आणि मानव व निसर्ग यांच्या परस्परसंबंधातील केलेले चिंतन म्हणजे 'एकला चलो रे'
**– रावसाहेब कसबे**



**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २५० रु.**




# प्रवास!

## अरविंद हाटे

**ब**ऱ्याचदा मला विचारलं जायचं, तुमचं गाव कोणतं? विचारणाऱ्याचा मला हेवा आणि असूयाही वाटायची, कारण विचारणाऱ्याचं कोणतंतरी गाव असणार हे नक्कीच, आणि त्याचा त्याला सार्थ अभिमान असणार. उत्सुकतेपोटी ती व्यक्ती विचारत असणार, त्यात काहीच वावगं नव्हतं. मग मी मात्र मनाला आवर घालून शांतपणे सांगायचो, मला गाव नाही. खरं तर मी दोन्हीकडच्या आजीआजोबांना कधी पाहिलं नाही, त्यामुळे सहवास तर दूरच. आजोळ नाही की गाव नाही. आजोबांची पाठीवर थाप नाही की लाड नाही. किंवा अंधाऱ्या रात्री मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशात आजीचा पदर घट्ट धरून राक्षसाच्या, परीच्या, राजकुमार, राजकुमारीच्या गोष्टी कधी ऐकल्या नाहीत. मी ठाणेकर, ठाण्यात जन्म झाला. बालपणापासून ठाण्यातील महागेरीतील खाडे निवास इथे वास्तव्य. एसएससीपर्यंतचे शालेय शिक्षण ठाण्यातील प्रख्यात सेंट जॉन द बॅप्टिस्ट हायस्कूलमध्ये झालं. त्यावेळी ठाण्यातील मातीला एक आगळावेगळा सुगंध होता, आता मात्र तो हरवला आहे. तलावांचं गाव म्हणून प्रसिद्ध होतं, आता तळी किती राहिलीत माहीत नाही. जांभळीनाका येथील तलावपाळी म्हणजे ठाण्याचा मानबिंदू. ठाण्यात अनेक वाडे होते, त्यात प्राजक्त, बकुळ, जांभूळ, शेवग्याची झाडं हमखास आसायची. सेन्ट्रल मैदान हे आमचं हक्काचं खेळण्याबागडण्याचं ठिकाण. रोज शाळा सुटल्यानंतर न चुकता क्रिकेट खेळायला जात असे आणि पावसाळ्यात फूटबॉल! चिखलात माखल्यानंतर जेलच्या तळ्यात डुंबायला मजा यायची. त्यावेळी ठाण्याचे रस्ते पाण्यानं धुतले जायचे, आता मात्र सगळं रूपडंच बदलून गेलं आहे. ठाणं मोठं झालं, खूप विस्तारलं, पण वैभव हरवून बसलं.

खऱ्या अर्थानं आपल्या आयुष्याचे साक्षीदार आपले शिक्षकच असतात. शाळेत माझ्या शिक्षकांनी माझ्यातल्या सुप्त चित्रकारची मलाच ओळख करून दिली. भगत टीचर, शेळकेसर, पावसकरसर ह्यांनी माझ्यातल्या चित्रकाराला दिशा दाखवली. शाळेत असताना माझ्याकडून महात्मा गांधीजी, रवींद्रनाथ टागोर, पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांची चित्रं काढून घेऊन, फ्रेम करून शाळेच्या हॉलमधे लावल्या, त्याचा आजमितीस मला खूप अभिमान वाटतो. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे, एसएससीची परीक्षा दिल्यानंतर सुट्टीत नवनीत पब्लिकेशनमध्ये सेल्समनची नोकरी करून पुढच्या शिक्षणासाठी थोडेफार पैसे जमवले. नंतर एसएससीचा रिझल्ट घेऊन शाळेच्या आवारातून बाहेर पडत असताना पाठकसर, गुजराथेसर आणि शेट्टेसर ह्यांनी सर जेजे स्कूल ऑफ आर्टचे दरवाजे तुझी वाट पाहत आहेत, म्हणत जेजेची दिशा दाखवून दिली. १९७२ साली ६५ टक्के म्हणजे बऱ्यापैकी मार्क होते. सरांची आज्ञा प्रमाण मानून सर जेजे स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश घेतला.

त्या भव्य ब्रिटिशकालीन वास्तूमध्ये प्रथमच प्रवेश करत होतो. तिथली हिरवळ, बाहेर ठेवलेली शिल्पं, भव्या कमानी, एक वेगळाच सुगंध व नीरव वातावरण, अगदी भारावल्या सारखं झालं होतं. क्षणात मनात विचार घोळत राहिला, आपण पाच वर्षं ह्या वातावरणात असणार आहोत. मनात अनेक भावना दाटून आल्या होत्या. शाळेतल्या शिक्षकांनी दिशा आखून दिली, तर जेजेतील प्राध्यापकांनी दिशा रुंदावल्या. फाऊंडेशनमध्ये गजानन भागवत, शानभाग, अवर्सेकर, प्रभाकर कोलते, काशिनाथ साळवे, रमेश कांबळी, पॉल कोळी, सीता कपूर, कुंभार, साब्बणवार, परेश दरू अशा दिग्गज शिक्षकांनी मिळून टू डी, थ्री डी, शिल्पकला, मेटल अँड क्राफ्ट, प्रिंट मेकिंग, सिरॅमिक असे अनेक विषय हाताळायला दिले. त्यामुळे फाऊंडेशनमध्ये आमचा पाया भक्कम रोवला गेला. मग पुढच्या वर्गात सोलापूरकर, संभाजी कदम, मृगांक जोशी, प्रभाकर कोलते, काशिनाथ साळवे, चंद्रकांत चन्ने, अवर्सेकर ह्या सर्वांनी मिळून साहित्य, सौंदर्यशास्त्र, कलेचा इतिहास, मूर्त-अमूर्त चित्रकला ह्यांचा मेळ घालून या चरित्रघटकांकडे सौंदर्यभावनेनं पाहण्याची क्षितिजं वाढवली. आमच्या लायब्ररियन आशा सरदेशपांडे ह्यांनी तर अलिबाबाच्या गुहेतील पुस्तकांचा खजिनाच उघडून दिला, त्यामुळे विचार करण्याचा व पेंटिंग करण्याच्या कक्षा रुंदावल्या. तर तत्कालीन डीन शंकर पळशीकरांच्या संभाषणातून



24 x 24 Inch Landscape



In search of Green 20 x 20 Inch

व प्रात्यक्षिकातून व्यक्तिचित्रण (पोर्ट्रेट पेंटिंग) समृद्ध झालं. त्यांची काही प्रात्यक्षिकं तर अविस्मरणीयच होती, एका वेगळ्याच कलाविष्काराची अनुभूती होती. अजूनही त्यांनी केलेलं त्यांच्या प्यून गायकवाडच पोर्ट्रेट पाहायला मिळणं मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो. ह्याची डोळा ह्याची देही मी पाहिलं आणि अनुभवला तो कलाविष्कार. ती पाच वर्षं म्हणजे तिथल्या जादुई वातावरणानं मंतरलेली होती. जेजेच्या मुख्य हॉलमध्ये लावलेली गायतोंडे, मोहन सामंत, लक्ष्मण पै, बाबूराव सडवेलकर, पळशीकर ह्या दिग्गजांची चित्र पाहून पाच वर्षं शिकत गेलो. देऊस्कर, एम.आर. आचरेकर, डी.जी. कुलकर्णी, जतीन दास, आलमेलकर ह्यांच्याशी झालेला संवाद व त्यांची प्रात्यक्षिकं एक मंत्रमुग्ध करणारी समाधी होती.

त्या जेजेच्या हिरवळीवर अनेक संध्याकाळ व रात्री घालवल्या आहेत. त्या चंद्रप्रकाशात कोलते, साळवेसरांबरोबरचा साधलेला संवाद, कोलतेसरांच्या हळुवार धीरगंभीर आवाजात उलगडून दाखवलेला भावुक खलील जिब्रान ऐकताना असं वाटायचं की साक्षात जिब्रान आमच्यासमोर बसून त्याच्या भावनिक संवेदना प्रकट करतोय. एखादी कविता अथवा साहित्य कसं वाचावं ते आम्ही त्या बैठकीत शिकलो. तर मधूनच कधीतरी कदमसर, सोलापूरकरसर आमच्यात सामील व्हायचे, मग कांट, फ्रॉईड, ॲरिस्टॉटल, ॲरिस्टोक्रॅट, प्लेटो हे पाश्चात्त्य विचारवंत तर चि.त्र्यं. खानोलकर, मर्ढेकर, जी.ए. कुलकर्णी, शिरवाडकर, वसंत बापट ह्या भारतीय कवी, लेखक व विचारवंतांच्या विचारंची ओळख करून द्यायचे. काही वेळेस काम आटपून डीनच्या बंगल्यात जाताना पळशीकरसर अमच्यात येऊन बसायचे. त्या वेळेस मात्र नीरव शांतता असायची आणि फक्त आध्यात्मिक संवाद असायचा पळशीकर सरांचा. नुकतच वाचलेल्या पुस्तकातील तत्त्वज्ञान आमच्यासामोर मांडायचे. तत्त्वज्ञान व आध्यात्मिकतेची ओढ, त्या अनुभूतीतून आलेली संवेदनशीलता व त्यातून झालेली निर्मिती, हे पळशीकरांच्या कालाविचारांचं वैशिष्ट्य होतं. रंग, रेषा, रूप, आकार, भावना, पोत, आणि अवकाश या चित्रघटकांकडे सौंदर्यभावनेच्या दृष्टीनं पाहण्यास आम्ही त्या संवादातून शिकलो. घड्याळानेही त्यांच्याकडून वक्तशीरपणा शिकून घ्यावा इतके वक्तशीर. एखादा प्रसंग अगदी जसाच्या तसा समोर उभा करण्याचं सामर्थ्य त्यांच्या वाचनात होतं.

जेजे स्कूल ऑफ आर्टचं वार्षिक प्रदर्शन व 'रुपभेद' अंक हे जेजेचं मोठं आकर्षण असायचं. त्यात पारितोषिक विजेत्या चित्रांचे व शिल्पांचे फोटो असायचे आणि प्राध्यापक व शिक्षकांचे खास लेख असायचे. १९७४ च्या वारली चित्रकला विशेष अंकासाठी डहाणू येथील वारली लोकांमध्ये राहण्याचा अविस्मरणीय अनुभव मिळाला. तर १९७५ च्या रुपभेद विशेषांकावेळी सावंतवाडीचे चितारी व त्यांच्या कलेचा रसास्वाद घेता आला. त्या काळात परेश दरूसरांनी भटकंतीचा नाद लावला. त्या भटकंतीत महाराष्ट्राची श्रीमंती कळली. हिमालयातही भटकंतीही केली. अनेक छोटेमोठे ट्रेक केले.

त्या पाच वर्षांत अनेक प्रदर्शनांत भाग घेतला. अनेक स्पर्धा व कार्यशाळांतून कामं केली. अनेक पुरस्कार मिळाले. पाच वर्षांत अनेक कॅनव्हास रंगवले. कोलते, साळवेसरांचा व पॉल क्लीचा माझ्या कामावर खूप प्रभाव होता. प्लास्टर ऑफ पॅरिसचं लेपन करून मिळालेली पोत व त्यावर रंगलेपन करायचं स्वतंत्र तंत्र आत्मसात केलं. १९७७ साली फायनल परीक्षेत प्रथम वर्गात तिसरा आलो, ते सर्टिफिकेट घेऊन बाहेर पडलो तेव्हा पुढील आयुष्याचा प्रचंड मोठा कोरा कॅनव्हास डोळ्यांसमोर उभा राहिला. वडील रिटायर होऊन बरीच वर्षं झाली होती. अर्थार्जनासाठी नोकरी करणं भाग

होतं. त्यात सगळे भाऊ आपापला संसार घेऊन वेगळे झालेले. मी भावंडात सर्वांत लहान, त्यामुळे आईवडिलांची जबाबदारी माझ्यावर आली होती. आईवडिलांनी निक्षून सांगितलं, आम्ही तुझ्याच बरोबर राहणार, जसं ठेवशील तसे राहू. ह्याला नोकरी हाच एक पर्याय होता. काही महिने इंटेरिअर डिझायनर ह्याच्याकडे डिझायनरचं काम केलं, महिना चारशे रुपये पगार. चार महिने होऊन गेले तरी पगाराचं नाव नाही, मनही रमत नव्हतं. कसंबसं पाच महिने काम केलं आणि रुपये दोन हजार घेऊन आईच्या हातावर पगार ठेवला. मग मात्र खऱ्या अर्थानं प्रवास सुरू झाला. काही वर्षं यशोदा भागवत, (भागवतसरांच्या पत्नी) यांच्या दीप डिझाईन ॲडव्हर्टायझिंग एजन्सीमध्ये काम केलं. त्यानंतर सिस्टास, ॲड्रॉईट, एन्टरप्राइझ, एएसपी, आणि शेवटी स्वतःची फोल्कलोर ॲडव्हर्टायझिंग असा प्रवास झाला. मात्र मनाशी दृढनिश्चय केला होता, की पेंटिंग सोडायचं नाही. जाहिरात कंपनीत कामं केली तरी पेंटिंगचा घेतलेला वसा टाकला नव्हता. पैसे मिळायचे पण मनात पूर्णवेळ पेंटिंग करता येत नाही ही सल होतीच. नियतीला मी ॲडव्हर्टायझिंगमध्ये काम करणं मान्य नव्हतं. कालातारानं एका शिखरावर पोचलेली स्वतःची फोल्कलोर एजन्सी इतकी कोसळली की तीन वर्षं मी डिप्रेशनमध्ये गेलो. त्या काळात माझी पत्नी वंदना खंबीरपणे माझ्या पाठीशी उभी राहिली नसती तर आज मी नसतो. घर गेलं होतं, सगळं कमावलेलं संपलं होतं. अशा वेळेस भागवतसरांचे मित्र आणि माझ्या पत्नीला मुलगी मानणारे रत्नाकर सोहनी एखाद्या देवदूतासारखे उभे राहिले. त्यांनीच मला ह्या सगळ्या संकटातून बाहेर काढलं. माझं कुटुंब व मी त्यांचे शतश: ऋणी आहोत.

ह्या सगळ्या प्रवासात निसर्गानं खूप काही शिकवलं, ट्रेकच्या दरम्यान वाटेतील दगड, गोटे, आकाशाचे विविध रंग, धरेचे रंग, झाडांची सळसळ, त्यांच्या पानाचे रंग, समुद्राचं वेगवेगळे रूप. डोंगरदऱ्याचे अनेक रूप, पक्षांची किलबिल, नदीचं संगीतमय वाहणं, बर्फाच्छादित शिखरं, तिथली निरागस माणसं, त्याचं वागणं. हे सर्व आठवलं की आपल्या अस्तित्वाची जाणीव होते, आपण कित सूक्ष्म आहोत ही जाणीव मनात एखाद्या भ्रमरासारखी गुंजन करत राहते. अहंपणा, 'मी'पण विरून जातं. ह्या सर्व भावभावनांची प्रतीकं माझ्या चित्रात कळतनकळत येत राहतात, जाणीवनेणिवांच्या पलीकडे ती संवाद साधत असतात.

माझ्या चित्रांची उलगडणारी परिभाषा ही निसर्गाच्या तरल तत्त्वज्ञानाच्या अर्थानं पोहोचण्यासाठी अमूर्त भाषेतून सतत काम व विचार करत असतो. निसर्ग माझ्या हृदयाच्या जवळ आहे. माझ्या चित्रात फॉर्मचं अस्तित्व एका अमूर्त भाषेमध्ये रुपांतरीत होतं. मी माझे डोळे बंद करतो तेव्हा ते आकार माझ्या भोवती तरंगताना दिसतात. नाईट स्केप, डार्क अल्ट्रामरीन आभाळ, चमकणारे दिवे, चंद्रप्रकाशात दिसणारा समुद्र किंवा नदीचं पात्रं तिथली नीरव अबोल शांतता यातून वेगळ्या विश्वाची अनुभूती येते. अंधारची शांतता मला नेहमीच वेगळ्या अवकाशाकडे आकर्षित करते. पेंटिंग माझा श्वास आहे, पेंटिंग म्हणजे एक मर्मज्ञपणे वैचारिक समाधी आहे.

माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा पुरस्कार म्हणजे प्रभाकर बर्वेंचा मला आलेला फोन– 'हाटे, रत्नाकर सोहोनीकडचं तुझं पेंटिंग पाहिलं. अप्रतिम आहे. असच काम करत राहा, माझ्या तुला शुभेच्छा.'

**– अरविंद हाटे**
भ्रमणध्वनी : ९८१९०४२६५६
arvindhate@yahoo.com

**॥ग्रंथाली॥**



# ओंजळभर शिंपले

**शशिकांत जागीरदार**

'कॅलिडोस्कोप'नंतरचा, निवडक सतरा लेखांचा हा संग्रह. शशिकांत जागीरदार यांचा 'ओंजळभर शिंपले' हा दुसरा लेखसंग्रह वाचकांना वेगळ्या वाचनाचा आनंद देईल.

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

# जाना कुमारी

**रेमंड मच्याडो**



लेखक रेमंड मच्याडोंनी वसई-मुंबईत बोलली जाणारी ईस्ट-इंडियन या बोलींचा वापर करून या बोलीचे शब्दभांडार मराठी वाचकांसाठी खुले केले आहे.

**– फादर फ्रान्सिस दिब्रिटो, ज्येष्ठ साहित्यिक**

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## गझलच्या उजेडात गझल

**चंद्रशेखर सानेकर**



**आँखों के सामने**
**आँख से काजल**
**चुरा ले जाना**

''गझल म्हणजे दर्शकाचा आभाळ झालेला डोळा. सगळं काही बघू शकणारा, सगळ्या सजीव-निर्जीवातलं स्थूलातलं स्थूल, सूक्ष्मातलं सूक्ष्म... त्या एका डोळ्यांच्या दोन पापण्या म्हणजे शेराच्या दोन ओळी, जे काही 'अर्थविश्व' आहे ते या दोन ओळींच्या मधल्या पोकळीत म्हणजे दोन पापण्यांमधलं जसं बुब्बुळ महत्त्वाचं तसा दोन ओळींचा आशय महत्त्वाचा. तोच त्या दोन ओळींचा जीव.''

गझल हा विषय खूप हळुवार आणि तितकाच बांधेसूद काव्यप्रकार. याचे विषय पूर्वी तत्त्वज्ञान, ऐहिक जीवन-मृत्यू, दु:ख, प्रेम याभोवती केंद्रित होते. त्यावर अरबी, फारसी भाषेचा आणि त्याच्या सुफी संप्रदायाचा प्रभाव होता. पुढे ही उर्दूमध्ये आली. त्यानंतर हिंदी, मराठी भाषेत हा प्रवाह केवळ भाषेचा वा काळाचा, इतकाच मर्यादित राहिला नाही. त्यात विषय, काफिये, रदीफ, वृत्त, लय हे सांभाळत अनेक बदल होत गेले. कवीच्या वृत्ती, मानसिकता, प्रतिभा यांच्या सामर्थ्याने हा पट विस्तारीत गेला आणि त्यातून सशक्त, कसदार, आशयपूर्ण अशी गझल मराठीत स्थिरावली. यात अनेक मान्यवर, प्रतिभावान कवींच्या योगदानाची नोंद निश्चितपणे घ्यायला हवी. या मांदियाळीत एक नाव अधोरेखित करायला हवे, ते आहे चंद्रशेखर सानेकर यांचे.

चंद्रशेखर सानेकर गेली चार दशके गझलेच्या आराधनेत निमग्न आहेत. गीतकार, गझलकार म्हणून सर्वश्रुत आहेत. गझललेखन हा त्यांचा केवळ छंद आहे असे म्हणणे त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. आपण ज्या विषयाचा छंद जोपासतो, त्याचे संदर्भ, अभ्यास, संशोधन आणि मनन-चिंतन याची साथसंगत कष्टपूर्वक आणि ध्यास म्हणून जोपासावीच लागते. तर आणि तरच त्या छंदाला सशक्त कसदार दर्जा लाभू शकतो. हे भान सानेकर यांनी व्रतासारखे जपले आहे. त्याच्या प्रतिपूर्तीसाठी ते अखंड प्रयत्नशील आहेत. त्यामुळेच त्यांच्या गझलने स्वत:चे अधिष्ठान निश्चित केलेले आहे. त्यांची गझल त्यांच्या सामर्थ्याचे दर्शन घडवते, तसे त्यांच्या व्यासंगाचे दर्शन त्यांच्या ज्या पुस्तकातून घडते, त्या पुस्तकाचे नाव आहे 'गझलच्या उजेडात गझल!'

हे गझलविषयीचे मुक्त चिंतन असलेले पुस्तक. गझलविषयी किती प्रकारे आणि कशा प्रकारे चिंतन करता येते, नव्हे तिचे खरे अंतरंग समजून घेण्यासाठी तिच्या अणूरेणूत किती खोलवर स्वत:ला एकजीव होता येते, त्याचा वस्तुपाठ म्हणजे हा व्यासंग. त्यामुळेच या प्रकाशात पुढील मार्गक्रमण यथायोग्यतेने करणे शक्य झालेले आहे.

गझल म्हणजे काय, या व्याखेपासून या चिंतनाला सुरुवात होते. तिची तंत्रानुगामी बांधणी; तिच्यातले नियम, वृत्ती, तत्त्वज्ञान, प्रकृती, मानसिकता, शेर, मात्रा, तिचा काव्य, कथा, कादंबरीशी असलेला जवळचा स्नेहभाव, गझलियत, अंदाजे बयाँ, परंपरा, ग्रामीणत्व, नेणीव, जाणीव, संजीवनी अशा अनेक पैलूंचा, टप्प्यांचा, मैलाचे दगड ठरावेत असे मुक्त तरी गम असे विचारधन या लेखातून वाचकांच्या हाती सुपूर्द केलेले आहे. यासाठी आवश्यक तेथे संदर्भ दिलेले आहेत. गालिब, मीर, फैज, दृष्यंतकुमार, सुरेश भट यांच्या सशक्त गझल-शेरांचे दाखले दिलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक लेखातील मतांना पुष्टी मिळतेच, त्यांचे संदर्भमूल्यही वृद्धिंगत झाले आहे.

'गझलच्या उजेडात गझल' हा लेखसंग्रह गझलच्या अभ्यासकांना संदर्भग्रंथ म्हणून अभ्यासता येईल, इतके दर्जेदार असे याचे मोल आहे. यातील विचार व्यक्त करताना कुठेही अभिनिवेशाचा आव नाही. एक प्रामाणिक आणि रसाळ ललितशैलीचा अनुभव हे लेखन देते. जणू आपण गझलच अनुभवत आहोत असा हा अनुभव आहे.

'शेर सुचण्याची प्रक्रिया आणि किनाऱ्यावर समुद्राच्या लाटा धडकण्याची प्रक्रिया यांच्यात साम्य असावं', 'शेर आणि भाषेचा संबंध जसा वीज आणि आभाळाचा संबंध', 'वीज म्हणजे आभाळाला आलेला शहारा', 'संवेदना, विचार, भावना, अनुभव यांना दोन ओळींच्या रूपातला भाषिक शहारा म्हणजे शेर', 'गझल म्हणजे कार्यकारणभावाचा अद्‌भुत असा प्रत्ययकारी साक्षात्कार आणि गझलेतर कविता म्हणजे संवेदनांच्या सौंदर्याचा भाषिक आविष्कार.' अशा सुंदर प्रत्ययकारी सौंदर्याने नटलेला हा गझलविषयीचा दर्जेदार असा आविष्कार असलेला संग्रह आहे. तरीही यातून कसदार, यशस्वी गझलकार होण्याचा मार्ग सापडेल असा दावा नाही, अशी विनम्र भावना त्यांनी व्यक्त केलेली आहे. हे त्यांचे स्वत:चे चिंतन आहे, ज्यातून त्यांनी स्वत:ला उत्तरे देण्याचा प्रयत्न केलेला आहे, ही त्यांच्या प्रस्तावनेतील भूमिका अंतर्मुख करणारी आहे.

यशस्वी गझलकाराचे हे लेख गझलविषयीच्या दिशा उजळून दाखवते आहे. या वाटेवरून चालणाऱ्या वारकऱ्यांसाठी ते दीपस्तंभाची भूमिका बजावतील, हे निश्चित!

छायाबिंबाची सुंदर कल्पना साकारणारे चंद्रकांत गणाचार्य यांचे मुखपृष्ठ आशयाला आपल्या तळहातावर जोजवीत आहे, इतके सुंदर झाले आहे.

**मूल्य २५० रुपये   सवलतीत १५० रुपये**



# ग्रंथपान

**वादळवाट**
**एम.डी. देशमुख**



## जिद्द आणि ध्यासाने तुडवलेली वाट

''आपण पदामुळं सन्मानित व्हावं यासारखा दुसरा अपमानच असू शकत नाही. मात्र आपल्यामुळे पद सन्मानित व्हावं यासारखा सन्मान दुसरा असू शकत नाही, याचं पुरतं भान मला होतं. पद हे मिरवण्यापुरतं नसावं; ते उदात्त हेतू साध्य करणारं, प्रेरक साधन म्हणून त्याचा वापर व्हावा, हा थोरामोठ्यांचा विचार माझ्या जडणघडणीत मोलाचा ठरला.''

आयुष्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतचा प्रवास हा ज्याचा त्याचा असतो. तो होत राहतो, पाय चालत असतात, मैलांचे दगड भेटतात, मागे पडतात, अनेक वाटा छेद देत मुख्य वाटेला चकवा देण्याचा प्रयत्न करतात. वाटेवरची अनेक स्थळे कधी ओळखीची कधी अनोळखी म्हणून भेटतात. ऊन, वारा, पाऊस यांच्या लहरीनुसार खेळवत राहतात. तरी प्रवास सुरूच असतो आणि कधीतरी मुक्कामाचे इच्छित स्थळ पावलांना विश्रांती देते. या प्रवासात मागे पडतो तो काळ, अनेक घटनांनी गुंफलेला, नात्याच्या बंधांनी आवळलेला, यशापयश, श्रम, सोशिकपणा, पराकाष्ठा, मानापमान तर कधी हळवा आपलेपणा यांनी काठोकाठ भरलेला. असे सर्वकाही ठासून ज्यात भरलेले आहे, अशा काळाचे चित्रण हे त्या व्यक्तीचे संचित असते. हे संचित म्हणजे समृद्ध अनुभवांचे सार, जडणघडणीच्या पैलूंनी घाव घालून आकार दिलेले व्यक्तित्वाचे संपन्न कणखरपण आणि समाधानाचे न मोजता येणारे मोल. त्याचेच नाव ठरते आयुष्य. त्याचे कथन ठरते चरित्र. एम.डी. देशमुख यांचे 'वादळवाट' हे असेच संचित आहे, जे त्यांच्या शीर्षकातूनच सारे काही सांगून जाते.

शिक्षणक्षेत्र हे तीर्थक्षेत्र आहे असे ज्यांना मनोमन वाटत आले आहे, त्यांनी त्यांचे नुसते पावित्र्य जपले नाही, तर आचरणाद्वारे सत्यम्–शिवम्–सुंदरम्चे दर्शन घडवले, अशा गुरुवर्य देशमुखसरांचे 'वादळवाट' हे आत्मकथन म्हणजे एका महर्षीची अनुभवसंपन्न अशी स्फूर्तिदायी मार्गदीपिका आहे. स्वतःची ज्ञानसंपत्ती नोकरीपायी दुसऱ्याच्या चरणी अर्पण करण्याऐवजी ती स्वतंत्र संस्था स्थापन करून स्वतंत्र अस्तित्व उभे करण्यासाठी खर्च केली तर तिचा सदुपयोग अनेकांसाठी होईल, हा हेतू सिद्धीस नेण्यासाठी देशमुखसरांनी जिद्दीने आणि ध्यासाने जे सुफल प्रयत्न केले, ते त्यांच्या दुर्दम्य इच्छेला साजेसे आहेतच. या वाटेने ज्यांना प्रवास करायचा असेल, त्यांच्यासाठी प्रत्येक मैलाच्या दगडाच्या खुणा सुकर प्रवासाची हमी घेऊन उभ्या आहेत. देशमुखसरांनी केलेल्या कार्याचा गौरव राज्य शासनाने 'आदर्श शिक्षक' हा पुरस्कार देऊन केला.

देशमुखसरांनी केवळ शिक्षणक्षेत्रच पावन केले असे नाही, अनेक सामाजिक कार्यांत त्यांनी नेतृत्व केले. इतरांसाठी आपले ज्ञान आणि आयुष्य उपयुक्त ठरले पाहिजे, या सद्हेतूने सतत विद्यार्थी, पालक, राजकारण आणि समाजकार्यात देहभान विसरून एकरूप झाले. परंतु या टप्प्यावर येईपर्यंत आणि पोहोचल्यानंतरही त्यांच्या सत्त्वपरीक्षेला पारावार नव्हता. एकेकाळी गावचा कारभार पाहणारे देशमुख घराणे अशा खाईत लोटले गेले की, तिथून वर येण्यासाठी संपूर्ण कुटुंबाला त्याची किंमत मोजावी लागली. घरातली जबाबदारी ओळखून कुटुंबाला आधार देण्यासाठी देशमुखसरांना किती अनवाणी वणवण करावी लागली, ती वाचताना आपल्याच काळजाला पीळ पडत जातो. तरीही पन्नास मैलांहून अधिक पायी चालणे नशिबी येणे म्हणजे काय, हे जो चालून जातो त्यालाच ठाऊक असते. तरीही शिक्षणाची कास सोडली नाही. त्यातून भाऊ–बहिणीची प्रगती झाली. संघर्ष हा जणू पाचवीला पूजलेला होता. त्याने शेवटपर्यंत पाठ सोडली नाही. तरीही देशमुखसर ताठपणे त्याला प्रत्येकवेळी सामोरे गेलेले आहेत. हे सारेच विलक्षण आहे. त्या अर्थाने ही संघर्षाची गाथा आहे.

देशमुखसरांनी आत्मकथन करताना आयुष्यात आलेल्या प्रत्येक प्रसंगाचे तपशिलासह वर्णन केलेले आहे. गाव, प्रथा, लग्न, हुंडा, शिक्षण, नातेसंबंध, शेती, ग्रामीण जीवन, निसर्ग यांचे चित्रण प्रत्ययकारी आहे. चित्रदर्शी अशी ही वर्णने आहेत. तशीच आयुष्याला उभारणी देणारे उद्धवकाका, त्यांचे राजकारण, इतर सहकारी यांची व्यक्तिचित्रणे उत्तमच साकारलेली आहेत. कुटुंबातील वडील, आई, बहीण, भाऊ, यांच्या जोडीला आहेत उषा, सरांच्या सौभाग्यवती. सोशिकपणा म्हणजे काय, तो का आणि कसा जपायचा, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे उषा. त्या एकदाच स्वतःविषयी सर्व काही सांगून जातात, ते संपूर्ण आयुष्याला व्यापून टाकणारे ठरते.

देशमुखसरांच्या लिखाणात एक सहजपणा आहे. त्याला नितळ–पारदर्शक असा साज आहे. 'रीन फिटेल पण हीन फिटत नसतं.' 'खायला आधी, झोपायला मधी अन् कामाला कधीकधी.' 'काय गे वेजं राहिली.' असा अनेक वाक्यांतून त्यांच्यातला लेखक व्यक्त होतो. आपण हे लेखन का केले याविषयी त्यांनी मनोगतात स्पष्ट केले आहे. कवी इंद्रजित भालेराव यांची मनोज्ञ प्रस्तावना या लेखनाला लाभलेली आहे.

सुप्रसिद्ध चित्रकार सतीश भावसार यांनी सुंदर मुखपृष्ठ साकारले आहे.

**मूल्य ४०० रुपये सवलतीत २५० रुपये**

# ग्रंथपान

**नाट्यविचार**
**डॉ. अनंत देशमुख**




**नाटक या विषयावरील तर्कशुद्धविषयक विवेचन**

''नाटक हा एक कलाप्रकार आहे नि कोणत्याही कलाकृतीचा आस्वाद विशिष्ट काळापेक्षा अधिक काळ सातत्याने रसिक घेऊ शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मध्यंतरीच्या काळात रात्री ९–१० वाजता सुरू झालेले नाटक 'प्रिये पाहा, रात्रीचा समय सरून येत उषःकाल हा' असे चालत असे. हे विशुद्ध कलानंदाचे द्योतक आहे का? त्यातही भरताच्या नाट्यशास्त्राचा वा ॲरिस्टॉटलच्या 'पोएटिक्स'मधील तत्त्वांचा शेक्सपेरिअन तंत्राचा किती आदर राखला जात असेल नि त्यानुसार प्रयोग सिद्ध होत असतील?''

नाटकाचा विचार करताना दोन स्तर प्रथम निश्चित असतात; एक नाट्यसंहिता आणि दुसरा नाट्यप्रयोग. रंगभूमीवर हा प्रयोग सादर होतो तेव्हा त्याची संहिता हे मूलद्रव्य आणि जोडीला अभिनय, नेपथ्य, संगीत, प्रकाश, पात्रयोजना, रंगभूषा, वेशभूषा अशा अनेक घटकांचा ज्यात समावेश होतो तो दुसरा स्तर. म्हणजेच नाटकाची एकूण एक वैशिष्ट्ये एकसंघपणे विचारात घ्यावी लागतात. तसा आणखी टप्पा ठरतो तो तंत्राचा. काळाला अनुसरून कथानकाचा. आपल्याकडे संस्कृत नाटकांची परंपरा होती. पुढे शेक्सपीयरसारख्या थोर नाटककाराच्या नाटकांची अनुवाद स्वरूपात भर पडली. परंतु मराठीत आपल्या रंगभूमीवर स्वतंत्र नाट्यलेखन कधी झाले, कसे झाले, कोणते झाले, त्याचा पहिला प्रयोग कुणी सादर केला, केव्हा झाला. दरम्यानच्या काळात नाटक होत असे त्याचे स्वरूप कसे होते, त्याबाबत असणारी माहिती त्रोटक आणि ऐकीव स्वरूपातली होती. त्याविषयीचे सखोल असे संशोधन आणि त्याची चिकित्सा मोठ्या प्रमाणावर वाचकांसमोर नव्हती. ती उणीव काही प्रमाणात दूर व्हावी असा ऐवज आता हाती आला आहे, 'नाट्यविचार' या पुस्तकरूपात.

एकोणिसाव्या शतकातील 'नाटक आणि रंगभूमी' या विषयांवर केलेले संशोधन असे या पुस्तकाचे स्वरूप आहे. संशोधनासाठी आवश्यक आणि उपलब्ध असलेली साधने मोजकीच असूनही त्यांचा धांडोळा किती सखोलपणे घेता येऊ शकतो, याचा प्रत्यय हे लेख वाचताना येतो. विष्णुदास भावे यांनी सादर केलेले 'सीतास्वयंवर' हे नाटक संदर्भासाठी नेहमीच प्रथमस्थानी असते. परंतु त्यांची ही नाट्यकथा कविताश्रयी होती आणि विशेष म्हणजे तिची संहिता लिखित स्वरूपात नव्हती, याकडे लेखकाने वाचकाचे लक्ष वेधले आहे. मराठीत पहिले संपूर्ण लिखित नाटक, ज्याचे 'मराठी ज्ञानप्रसारक सभे'पुढे वाचन झाले, त्याचे नाव आहे, 'थोरले माधवराव पेशवे', हेही ते निदर्शनास आणतात. त्याचवेळी ते स्पष्ट करतात, 'तृतीय रत्न' हे फुले यांनी लिहिलेले नाटक (१८५५) त्याच्याअगोदरचे आहे, परंतु त्याची छापील प्रत १९७९ साली प्रकाशित झालेली आहे.

सुरुवातीच्या काळातील नाटके ही पुराणकथांवर आधारित होती, नंतर सामाजिक आशयाकडे ती आली. त्याला कारण महाविद्यालयीन शिक्षण. त्यातून कालिदास–एल्फिन्स्टन ड्रॅमॅटिक सोसायटी, पारशी एल्फिन्स्टन ड्रॅमॅटिक सोसायटी यांचा उदय झाला. थिएटर हा विषय खरा संशोधनाचा. १७७० साली 'बॉम्बे अम्यॅचुअर्स थिएटर' ही इंग्रजांनी मुंबईत सुरू केलेली नाट्यचळवळ, तिचे प्रयोग 'बॉम्बेग्रीन'वर होत. तिथे सादर झालेल्या नाटकांची यादी लेखात दिलेली असून ती बरीच मोठी आहे. जगन्नाथ शंकरशेठ यांच्या पुढाकाराने पुढे १८४६मध्ये 'बादशाही थिएटर' उभे राहिले.

'नाटक आणि रंगभूमी' या विषयावरील चार लेख, 'तृतीय रत्न', 'संगीत सौभद्र', 'गुळवे आणि किर्लोस्कर', 'कालिदास–एल्फिन्स्टन सोसायटी' असा आठ लेखांचा संग्रह आहे. 'तृतीय रत्न' या नाटकाचा विषय, नाटक लिहिण्यामागची प्रेरणा, शीर्षकामागील हेतू, ज्योतिराव फुले आणि धनंजय कीर यांच्या संहितेतील फरक, नाटकाची वैशिष्ट्ये, अशा वेगवेगळ्या बाबी समोर ठेवून लेखकाने विचार मांडलेले आहेत. तीच गोष्ट 'संगीत सौभद्र'बाबतची आहे. 'हे मूलतः कीर्तन आहे' असे व.दि. कुलकर्णी, 'एक सुंदर फार्स' असे द.ग. गोडसे म्हणतात. या दोन्ही विधानाचा लेखकाने परामर्ष घेत स्वतःची मते मांडलेली आहेत. तात्कालिक पदे आणि लावण्या यांची परस्पर साम्येही दाखवलेली आहेत.

नाटकासाठी प्रेक्षकांचा आश्रय आवश्यक तसा आर्थिक आश्रयदात्याचे पाठबळ. शेठ विठोबा खंडाप्पा गुळवे यांच्या स्नेह आणि पाठबळामुळे 'किर्लोस्कर नाटक मंडळी' कशी सुस्थिर राहिली, या विषयीचा हा स्वतंत्र लेख आहे.


डॉ. अनंत देशमुख यांचा साहित्यिक पिंड हा चरित्रात्मक लेखनाचा आणि समीक्षा–संशोधनाचा. त्यांची विपुल अशी साहित्यसंपदा याच साहित्यप्रकारातील आहे. र.धों. कर्वे यांच्यावरील आठ खंडात केलेले लेखन हा संशोधनातला सर्वोत्तम उपक्रम. नाटक या विषयावरील चार पुस्तके प्रकाशित आहेत. संशोधनासाठी आवश्यक ठरावीत अशी त्यांची एकूण पंचवीसहून अधिक पुस्तके प्रकाशित आहेत. प्रत्येक विषयाची चिकित्सक मांडणी, एकेक पैलू तर्कशुद्ध पद्धतीने उलगडून दाखवताना स्वतःच्या मतांचा वेगळा दृष्टिकोन ठामपणे सादर करण्याची प्रतिभा, संशोधनासाठी घेतलेली प्रचंड मेहनत आणि जिज्ञासू वृत्ती, आवश्यक तेथे स्पष्टीकरणासाठी टिपा, भाषेवर असलेले प्रभुत्व आणि तल्लख स्मरणशक्ती आदींचा प्रत्यय म्हणजे 'नाट्यविचार' होय.

रंगभूमीवर स्वतःचा अवकाश निर्माण करण्याची कल्पकता आशयाचा गाभा कवेत घेऊन आली आहे. सतीश भावसार यांची ही मुखपृष्ठाची कल्पकता सुंदरच!

**मूल्य १५० रुपये   सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

**सहा दशकांची पत्रकारिता**
**वसंत वासुदेव देशपांडे**




**एका कालखंडाचा दस्तऐवज!**

''जानेवारी १९९१मध्ये मुख्यमंत्री शरद पवार यांच्याविरुद्ध त्यांच्याच मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांनी पुकारलेल्या बंडाचे आणि त्यानंतरच्या आठ-दहा दिवसांत झालेल्या घडामोडींचे इत्थंभूत वार्तांकन हा आकाशवाणीच्या माझ्या सेवेतील सर्वच दृष्टींनी कळसाध्याय म्हणता येईल. शासकीय यंत्रणामध्ये चांगल्या कामाबद्दल वरिष्ठांकडून लेखी प्रशंसापत्र मिळणे हा दुर्मिळ योग असतो, तो या वार्तांकनानंतर माझ्या बाबतीत घडून आला.''

पत्रकारिता हा लोकशाहीचा आधारस्तंभ समजला जातो. समाजात देशविदेश पातळीवर घडणाऱ्या घटनांपासून राजकारण-समाजकारण-अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रांना आपल्या कवेत घेणारा तरीही समाजभान राखून तटस्थ वृत्तीने हाताळला जाणारा हा विषय. या क्षेत्रात-माध्यमात वावरणारी माणसे ही सदैव सजग, चौकस आणि सातत्याने थेट वेध घेणारी वृत्ती जोपासणारी मंडळी म्हणून ओळखली जातात. सामान्य वाचक ते थेट बातमीचा स्रोत असणाऱ्यांच्या दरम्यानचे हे प्रतिनिधी जिज्ञासा, कुतूहल ते सातत्यापर्यंतचा शोध असे अवघड, निर्भीड प्रवासाचे मानकरी असतात. प्रत्येकाचा एक स्वतंत्र ठसा जनमानसावर उमटतो तो त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यशैलीमुळे, अविरत ध्यासवृत्तीमुळे. एका कालखंडाचा माहितीचा खजिना असलेले हे एक स्वतंत्र विद्यापीठ असते, असे म्हणणे वावगे ठरू नये. वसंत वासुदेव देशपांडे हे असे एक विद्यापीठ आहे, ज्यांच्याकडे या माध्यमाचा प्रदीर्घ असा अनुभवसाठा आहे, तो त्यांनी 'सहा दशकांची पत्रकारिता' या पुस्तकाद्वारे वाचकांसाठी खुला केला आहे.

देशपांडे यांनी आकाशवाणीवर सुमारे एकतीस वर्षे पत्रकार म्हणून सेवा पूर्ण केली आहे. ९ ऑगस्ट हा क्रांतीदिवस त्यांच्यासाठी परिवर्तनाचा ठरला असे ते नमूद करतात. याच दिवशी आकाशवाणीवर न्यूजरिपोर्टर म्हणून त्यांना नेमणूक मिळाली ते वर्ष होते १९६०. त्या अगोदर ते आचार्य अत्रे यांच्या 'मराठा'मध्ये होते. येथे त्यांच्या पत्रकारितेचा पाया भक्कम झाला. आचार्य अत्रे यांच्या सहवासाचा, मार्गदर्शनाचा आणि पत्रकारितेतील नेमकेपणाची शिस्त याचा आदर्श त्यांच्यासाठी मोलाचा ठरला. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, झालेल्या निवडणुका, आचार्य विनोबा यांची भूदान चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निधन, प्रतापगडावर पं. जवाहरलाल नेहरू यांच्या विरोधात निदर्शने, अशा अनेक घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदार होण्याचे, त्यांचे वार्तांकन करण्याचे भाग्य देशपांडे यांना लाभले. 'मराठा'विषयीचा तपशील आणि अत्रे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांनी जवळून घेतलेला अनुभव यांचे वर्णन त्या कालावधीत घेऊन जाते.

आकाशवाणीतील नोकरीमुळे मला स्थैर्य आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली, अशी ते नम्रपणे कृतज्ञता व्यक्त करतात. विधिमंडळातील वार्तांकन हा खास विभाग त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कौशल्याने यशस्वीपणे सांभाळला. वार्तांकनांसाठी आवश्यक असणारी संवेदनाशील पथ्ये त्यांनी संयमपूर्वक निष्ठेने जपली. कार्यक्रमास उपस्थित राहूनच वृत्त देण्याचे पथ्य शक्य तितके पाळले. त्यामुळे वार्ताहरवर्तुळात माझ्या बातम्यांचा खात्रीशीरपणाबद्दल विश्वास निर्माण झाला, असे ते ठामपणे नमूद करतात.

विधिमंडळाचे कामकाज आणि त्याविषयीची माहिती, मंत्रिमंडळाच्या साप्ताहिक बैठकीतील निर्णयाची माहिती ही राज्यातील जनतेसमोर यावी यासाठी विश्वासार्ह वार्तांकन महत्त्वाचे ठरते. त्याचवेळी राजकारण, त्यातून सत्तासंघर्ष, घडणारे सत्तांतर, हा तर सर्वांच्या दृष्टीने मोठा पट असलेला विषय. १९६० पासून राज्यात घडलेली सत्तांतरे, दत्ता सामंतांचा गिरणी संप, वादळी पर्व असलेले जॉर्ज फर्नांडिस, मृत्यूपूर्वीच नेत्यांच्या निधनाचे वृत्त, १९७२चा दुष्काळ, राज्य व दिल्लीच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावणारे यशवंतराव चव्हाण, शरद पवार यांच्यासह अनेक नेत्यांचे राजकारण, असा एक कालखंड उभा करणारे सहा दशकांचे अनुभव या पुस्तकात ग्रथीत झालेले आहेत. प्रत्येक घटनेचा तपशील देताना त्यात सहभागी असलेल्या व्यक्ती आणि घटनेची तारीख याबाबत काटेकोरपणा जपलेला आहे. जे सांगायचे ते स्पष्टपणे तरी तटस्थपणे, त्यामुळे कुणा एकाची बाजू घेतली, असे एकांगीपण टळलेले आहे.

मुंबईतील कामगार चळवळ डॉ. दत्ता सामंत यांचा उदय होण्यापूर्वी वैचारिक पायावर मार्गक्रमण करत होती. डॉ. दत्ता सामंत यांच्या झंझावातामुळे ती व्यक्तिवादी झाली. काही प्रमाणात झुंडशाहीने कामगार चळवळीत प्रवेश केला. मात्र जातीय, प्रांतीय किंवा धार्मिक चेहरा डॉक्टरांच्या आंदोलनांना नव्हता, यासारखी निरीक्षणे त्यांच्या सखोल अभ्यासाचे दर्शन घडवतात.

देशपांडे यांचे हे अनुभवविश्व संपन्न पत्रकारितेचे आदर्श उदाहरण आहे. फापटपसारा न मांडता नेमकेपणाने मोजक्या शब्दांत विषय मांडण्याची शैली भावणारी आहे. पत्रकारितेने त्यांना अनेक सन्मानजनक कार्यसदस्य म्हणून सन्मान बहाल केलेले आहेत. 'महाराष्ट्राची सुवर्णगाथा' यासारखा गौरवास्पद ग्रंथ त्यांनी सिद्ध केलेला आहे. 'सहा दशकांची पत्रकारिता' हा तसाच गौरवग्रंथ आहे. सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ सुंदर साकारले आहे.

**मूल्य २५० रुपये  सवलतीत १५० रुपये**

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

सारस्वत बँक

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)

आमचे
कमीत-कमी
व्याजदर, आता
आणखीनही कमी !



नवे दर

| | |
|---|---|
| होम लोन | 6.70 % प्रतिवर्ष |
| कार लोन | 7.50 % प्रतिवर्ष |
| एज्युकेशन लोन | 8.00 % प्रतिवर्ष |
| लोन अगेन्स्ट प्रॉपर्टी | 8.80 % प्रतिवर्ष |

नियम व अटी लागू, मार्च 2021

अधिक माहितीसाठी
आपल्या नजीकच्या शाखेशी संपर्क करा.

www.saraswatbank.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.